


सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

धाराशिव | रविवार, २३ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २६३ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# महाविकास आघाडीत काँग्रेस एकाकी

मनपा निवडणूक रणधुमाळी



**मुंबई, २२ नोव्हेंबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांचा उबाठा आणि राज ठाकरे यांची मनसे एकत्र येण्याचे आधीच निश्चित झाले आहे. मात्र, महाआघाडीतील घटक पक्ष काँग्रेसला मनसेसोबत जायचे नव्हते. आता आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर शरद पवार गटाच्या बैठकीत उबाठा आणि मनसेसोबत जाण्याचे संकेत पवारांनी दिले. आघाडीत काँग्रेस एकाकी पडला आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत उबाठासोबत युती करण्यासंदर्भात चर्चा करण्याचा निर्णय पवारांनी एकमताने घेतला. भाजपासोडून इतर कोणासोबतही जाण्यास हरकत नसल्याचे त्यांनी सांगितले. समाजवादी पक्ष, मनसेसोबत एकत्र येण्यास हरकत नाही, अशी भूमिका पवार गटाच्या बैठकीत घेण्यात आली. मात्र काँग्रेसने एक वेगळी भूमिका मांडली आहे. मागील आठवड्यात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पवारांची भेट घेतली.

**(उर्वरित वृत्त पान ७ वर)**













सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ३७ माओवाद्यांची तेलंगणात शरणागती

## दंडकारण्य विशेष क्षेत्र समितीच्या सदस्यांचा समावेश



पोलिसांसमोर शस्त्रे टाकून शरण आलेले माओवादी

**हैदराबाद, २२ नोव्हेंबर**

तेलंगणात ३७ माओवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यापैकी तीन जण राज्य समितीचेसदस्य आहेत, अशी माहिती तेलंगणाचे पोलिस महासंचालक बी. शिवधर रेड्डी यांनी शनिवारी दिली. आत्मसमर्पण करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये तीन राज्य समिती सदस्य, तीन विभागीय समिती सदस्य, नत्र क्षेत्र समिती सदस्य आणि २२ इतर सदस्यांचा समावेश आहे.

कोय्याडा संबैय्या उर्फ आझाद, अप्पासी नारायणा उर्फ रमेश आणि मुचकी सोमादा हे तीन राज्य समिती सदस्य आहेत. संबैय्या आणि नारायण हे तेलंगणा समितीचे सदस्य होते, तर सोमडा हा माओवाद्यांच्या दंडकारण्य विशेष क्षेत्रीय समितीचा भाग होते. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांनी एक एके-४७ रायफल, दोन एसएलआर रायफल, चार .३०३ रायफल, एक जी-३ रायफल आणि ३४६ राऊंड जिवंत दारुगोळा सोपवला.

शरण आलेल्या माओवाद्यांवर एकूण १.४० कोटी रुपयांचे बक्षीस होते. त्यापैकी सम्बैयाह आणि नारायणच्या शिरावर एकूण २० लाख रुपयांचे बक्षीस होते. (वृत्तसंस्था)

# भारतीय मूल्यांमुळे प्रगतीला चालना : पंतप्रधान

## चार नवीन उपक्रमांचा प्रस्ताव



### दहशतवादाच्या विरोधात एकत्र या

मादकपदार्थांच्या तस्करीच्या आव्हानावर मात करण्यासाठी तसेच फेंटानिलसारख्या धोकादायक पदार्थांचा प्रसार थांबवण्यासाठी आणि दहशतवादाच्या संबंधाचा सामना करण्यासाठी जी-२० ने पुढाकार घ्यावा, असे नरेंद्र मोदी यांनी सुचवले.

**जोहान्सबर्ग, २२ नोव्हेंबर**

भारतीय मूल्ये प्रगतीला चालना देऊ शकतात, असे स्पष्ट करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येथे झालेल्या जी-२० नेत्यांच्या शिखर परिषदेत जागतिक विकासाच्या उद्देशाने चार नवीन उपक्रम प्रस्तावित केले. यात जागतिक पारंपरिक ज्ञान भांडाराची स्थापना, आफ्रिका कौशल्य गुणक उपक्रम, जागतिक आरोग्य सेवा प्रतिसाद पथक आणि औषध-दहशतवाद संबंधांना तोंड देण्यासाठी पुढाकाराचा समावेश आहे.

या उपक्रमांमुळे सर्वांगीण विकास साध्य होण्यास मदत होईल, असे त्यांनी समावेशक आणि शाश्वत विकासावरील पहिल्या सत्रात सांगितले आणि भारताची संस्कृतिविषयक मूल्य पुढे जाण्याचा मार्ग दाखवतात, असे स्पष्ट केले.

जी-२० ग्लोबल ट्रेडिशनल नॉलेज रिपॉझिटरी पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण करेल, जे शाश्वत जीवनाचे कालाधारित चाचणी केलेले मॉडेल प्रदर्शित करते आणि भविष्यातील पिढ्यांपर्यंत ते पोहोचवले जाईल, हे सुनिश्चित करते.

या बाबतीत भारताचा इतिहास समृद्ध आहे. यामुळे आपल्याला चांगले आरोग्य आणि कल्याणासाठी आपले सामूहिक ज्ञान पुढे नेण्यास मदत होईल, असे नरेंद्र मोदी यांनी शिखर परिषदेला संबोधित करताना सांगितले. जागतिक प्रगतीसाठी आफ्रिकेचा विकास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि भारत नेहमीच या खंडासोबत एकजुटीने उभा राहिला आहे. मोठ्या प्रमाणावर कौशल्य वाढवण्यासाठी आफ्रिकेने घेतलेल्या पुढाकारामुळे पुढील दशकापर्यंत आफ्रिकेत दहा लाख प्रमाणित प्रशिक्षक निर्माण होतील, असे मोदी म्हणाले.

आमचे सामूहिक ध्येय पुढील दशकात आफ्रिकेत दहा लाख प्रमाणित प्रशिक्षकांना प्रशिक्षित करण्याचे आहे. हे प्रशिक्षक लाखो कुशल तरुणांना प्रशिक्षित करतील. या उपक्रमाचा बहुआयामी परिणाम होईल. यामुळे स्थानिक क्षमता वाढेल आणि आफ्रिकेचा दीर्घकालीन विकास बळकट होईल, असे नरेंद्र मोदी यांनी जी-२० नेत्यांना सांगितले. (वृत्तसंस्था)

# तुमच्याकडे मत, तर माझ्याकडे निधी : अजित पवार

**पुणे, २२ नोव्हेंबर**

माझ्या पक्षाच्या उमेदवारांना निवडून दिले तर, मी शहरासाठी निधीची कमतरता भासणार नाही हे सुनिश्चित करेल. पण, तुम्ही माझ्या पक्षाला नाकारले, तर मी देखील नकार देईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मालेगाव जिल्ह्यात प्रचार करताना म्हटले.

बारामती तहसीलमधील मालेगाव नगर पंचायतमध्ये ते प्रचार करीत होते. महायुतीच्या सरकारमध्ये त्यांच्याकडे अर्थखाते आहे, हे विशेष. तुम्ही राकाँच्या सर्व १८ उमेदवारांना निवडून दिले तर, निधीची कमतरता भासणार नाही, याची मी खात्री करेल. जर तुम्ही सर्व १८ उमेदवारांना निवडून आणले, तर दिलेले वचन पूर्ण करेल. तुमच्याकडे मते आहेत, तर माझ्याकडे निधी आहे, असे अजित पवार म्हणाले.

त्यांच्या या वक्तव्यावर विरोधी पक्षांनी टीका केली. अजित पवार यांनी मतदारांना धमकावल्याचा आरोप उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी केला. निधी हा सर्वसामान्यांनी भरलेल्या करातून दिला जातो. अजित पवार तो घरातून देत नाही. अजित पवारांसारखा वरिष्ठ नेता मतदारांना धमकावत असेल, तर निवडणूक आयोग काय करीत आहे, असा सवाल त्यांनी केला. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### दिल्लीत कोंडला श्वास; वर्क फ्रॉम होम सुरू

**नवी दिल्ली :** दिल्ली-एनसीआरमध्ये हिवाळ्याच्या सुरुवातीपासूनच प्रदूषणाची स्थिती भयावह बनली असून शनिवारी सकाळी जाहीर झालेल्या ताज्या एअर क्वालिटी इंडेक्सनुसार अनेक मॉनिटरिंग स्टेशन्समध्ये एक्यूआय ३०० ते ४३० दरम्यान नोंदवला गेला. नोएडा आणि गाझियाबादसह संपूर्ण एनसीआरमध्येही प्रदूषणाची पातळी धोकादायक स्तरावर पोहोचली आहे. या वाढत्या धुरक्याच्या संकटाच्या पृष्ठभूमीवर दिल्ली सरकारने तातडीची कारवाई करत ५० टक्के कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमचे आदेश दिले. एअर क्वालिटी मॅनेजमेंट कमिशनने वातावरणातील ही गंभीर स्थिती ओळखून महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. या निर्देशांमध्ये सरकारी, महानगरपालिका तसेच खाजगी कार्यालयांना ५० टक्के कर्मचाऱ्यांसह कामकाज सुरू ठेवण्याचा पर्याय देण्यात आला असून उर्वरित कर्मचाऱ्यांना घरून काम करण्यास प्राधान्य देण्याचे सुचवले आहे.

### अजित पवारांच्या ताफ्याची दुचाकीला धडक

**बीड :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील वाहनाने बीड जिल्ह्यात धुनकवाड फाट्याजवळ एका दुचाकीला धडक दिली. यात चार जण गंभीर जखमी झाले. हा अपघात तेलगाव-धारूर रस्त्यावर झाला. प्राथमिक माहितीनुसार, अजित पवारांचा ताफा तेलगावहून केजकडे जात असताना त्यांच्या ताफ्यातील वाहनाने एका दुचाकीला धडक दिली. या दुचाकीवर भोगलवाडी येथील विष्णू दामोदर सुदे, त्यांची पत्नी कुसुम सुदे आणि दोन लहान मुली प्रवास करत होते, जे सर्व गंभीर जखमी झाले आहेत. अपघात इतका तीव्र होता की दुचाकीचा पूर्णपणे चुरडा झाला. ताफ्यातील वाहनालाही मोठे नुकसान झाले. जखमींना सुरुवातीला धारूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारांसाठी नेण्यात आले, परंतु गंभीर स्थितीमुळे त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातात अजित पवारांचा सुरक्षा रक्षकही जखमी झाला असून त्यावर उपचार सुरू आहेत.

### भाजपाच्या स्नेहा तमशेट्टे सर्वात तरुण नगरसेविका

**नांदेड :** भाजपाच्या स्नेहा तमशेट्टे या महाराष्ट्रातील सर्वात तरुण नगरसेविका ठरल्या आहेत. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांमध्ये अर्ज माघारीची मुदत संपल्यानंतर अनेक ठिकाणी बिनविरोध निवडणुका पार पडल्या. नांदेड जिल्ह्यातील मुखेड नगरपरिषदेतून केवळ २१ वर्षांच्या स्नेहा तमशेट्टे यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांनी राज्यातील सर्वात तरुण नगरसेविका बनण्याचा मान मिळवला आहे. मुखेड नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ४ हा महिला ओबीसीसाठी राखीव असून भाजपाने या प्रभागातून स्नेहा तमशेट्टे यांना उमेदवारी दिली होती. सुरुवातीला काँग्रेस आणि दोन अपक्ष उमेदवारांसह एकूण चार उमेदवार रिंगणात होते. मात्र छाननीदरम्यान काँग्रेसचा आणि एका अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद झाला. अशा परिस्थितीत स्नेहा तमशेट्टे आणि त्यांची चुलती जयश्री तमशेट्टे यांच्यात थेट सामना होणार असे चित्र होते.



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२४,१०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५५,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.२ | १९.0 |
| अमरावती | ३२.० | १३.१ |
| भंडारा | २८.० | १२.० |
| बुलडाणा | ३१.६ | १५.० |
| चंद्रपूर | ३२.२ | १५.६ |
| गडचिरोली | ३०.६ | १३.४ |
| गोंदिया | ३०.० | १२.६ |
| नागपूर | ३०.३ | १३.५ |
| वर्धा | ३२.० | १४.२ |
| वाशीम | ३१.० | ११.८ |
| यवतमाळ | ३२.६ | १२.५ |

# सचिन तेंडुलकर पुन्हा एकदा ताडोबात

## दोन दिवसांत केली जंगल सफारी



**चंद्रपूर, २२ नेव्हेंबर**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर पुन्हा एकदा त्याच्या आवडत्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या दौऱ्यावर आला होता. सोबत पत्नी अंजली आणि दोन मित्रांच्या कुटुंबासह तो शुक्रवारी सकाळी १० वाजता ताडोबात दाखल झाले. दोन दिवसांची जंगल सफारी करून शनिवारी सायंकाळी तो परतला.

मुंबईहून नागपूरमार्गे तो चिमूरजवळील एका रिसॉर्टमध्ये पोहोचला. दुपारी ३ वाजता त्याने कोलारा कोअर झोनमध्ये पहिली सफारी केली. त्याच्यासोबत मित्र जगदीश, नागपूरमधील आणखी एक मित्र आणि त्यांच्या परिवारातील सदस्य होते. पहिल्या सफारीत एकाही वाघाचे दर्शन झाले नाही. शनिवारी सकाळी आणि सायंकाळी दोन सफारी केल्यानंतर रविवारी सकाळची आणखी सफारी करून दुपारी नागपूरमार्गे मुंबईकडे परतला. त्याला वाघाचे दर्शन झाल्याची माहिती आहे.

सचिन तेंडुलकर दरवर्षी ताडोबाला भेट देत असून, येथील वाघांविषयी त्याला विशेष आकर्षण आहे. कोअर झोनमधील प्रसिद्ध छोटीतारा, बिजली, रोमा, मोगली, युवराज आणि बलराम यांच्या हालचालींबाबत तो नेहमीच रस घेतो. सध्या बिजली वाघिणीला तीन तर रोमा वाघिणीला चार बछडे असून, रोमा वाघीण पर्यटकांना वारंवार दिसत असल्याने या परिसरात पर्यटनाला विशेष भर पडली आहे.

ताडोबातील सचिनचा वार्षिक दौरा नेहमीच चर्चेचा विषय असतो. गेल्या वर्षी त्याने ताडोबातील एका शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत भेटवस्तू दिल्या होत्या. (तभा वृत्तसेवा)

# जगाला शांततेच्या मार्गावर नेण्याची जी-२० देशांमध्ये क्षमता : गुटेरेस

## समस्या सोडविण्यासाठी शक्तीचा वापर करा

**जोहान्सबर्ग, २२ नोव्हेंबर**

आफ्रिकन देश आर्थिक संकटात असून, त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात कर्ज आहे. जागतिक वित्तीय व्यवस्था त्यांचे पुरेसे प्रतिनिधित्व करण्यात अपयशी ठरत आहे. जी-२० देशांमध्ये जगातील समस्या कमी करण्याची आणि जगाला शांततेच्या मार्गावर आणण्याची क्षमता आहे. या देशांनी गरीब आणि विकसनशील देशांच्या समस्या कमी करण्यासाठी त्यांच्या शक्तीचा वापर करावा, असे संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस म्हणाले.



दक्षिण आफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरात आयोजित जी-२० परिषदेला संबोधित करताना, जगभरात सुरू असलेला संघर्ष, हवामान बदल, आर्थिक अनिश्चितता, असमानता आणि घटत्या जागतिक मदतीवर भाष्य करताना गुटेरेस म्हणाले, संघर्षामुळे शस्त्रास्त्रांची सुरू असलेली स्पर्धा जगाच्या शांततेसाठी धोकादायक आहे. वाढता लष्करी खर्च विकास संसाधनांचा ऱ्हास करत आहे. जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था असलेले, जी-२० देश अडचणी कमी करण्यावर आणि आर्थिक वाढ समावेशक असल्याची खात्री करण्यावर महत्त्वपूर्ण परिणाम करू शकतात, ज्यामुळे आपले जग भविष्यासाठी एक चांगले, अधिक शांततापूर्ण मार्गावर जाईल.

### आफ्रिकेला जागतिक मंचावर योग्य स्थान मिळावे

गुटेरेस म्हणाले, आफ्रिकेला आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या मंडळांपासून ते संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील कायमस्वरूपी सदस्यत्व आणि आणि इतर जागतिक संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळणे गरजेचे आहे. निर्णय घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक मंचावर आफ्रिकेला त्याचे योग्य स्थान मिळायला हवे. जी-२० हा ऐतिहासिक अन्याय दूर करण्यास आणि विकसनशील देशांना, विशेषतः आफ्रिकेला, जागतिक धोरणनिर्मितीत सहभागी करून घेण्यास मदत करू शकते.

### संघर्ष थांबविण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्या

येणाऱ्या काळात जागतिक आर्थिक प्रशासन अधिक समावेशक, न्याय्य आणि प्रभावी बनविण्याची गरज आहे. सुदान, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, माली, युक्रेन, गाझा, हैती, येमेन आणि म्यानमारसह जगभरातील विनाश आणि अस्थिरता निर्माण करणारे संघर्ष संपवण्यासाठी ते जी-२० सदस्य देशांनी त्यांचा प्रभाव आणि आवाज वापरण्याचे आवाहन गुटेरेस यांनी केला. (वृत्तसंस्था)

# सात कोटींच्या दरोड्याचा पोलिसच निघाला सूत्रधार

## आरबीआयचे अधिकारी सांगून लुटली रोख



**बंगळुरू, २२ नोव्हेंबर**

कर्नाटकची राजधानी बंगळुरूत आरबीआय अधिकारी असल्याचे सांगून एटीएम कॅश व्हॅनमधील साडे कोटींची रोख लुटण्याच्या प्रकरणात पोलिसांनी तीन जणांना अटक केली. त्यात गोविंदपुरा पोलिस ठाण्यातील पोलिस कॉंस्टेबलचा समावेश असून, तोच या प्रकरणातील सूत्रधार असल्याचे तपासात समोर आले.

पोलिस आयुक्त सीमांत कुमार सिंह यांनी शनिवारी पत्रपरिषदेत सांगितले की, आरबीआय अधिकारी असल्याचे सांगून आरोपींनी एटीएम कॅश व्हॅनला महामार्गावर रोखण्यात आले. व्हॅनमधील तीन जणांना अटक करीत असल्याचे सांगत एका कारमध्ये बसविले आणि व्हॅनमधील ७.११ कोटींची रोख घेऊन आरोपींनी पोबारा केला. सीसीटीव्ही कॅमेराच्या आधारे आरोपींची ओळख पटल्यावर त्यांना पकडण्यासाठी अकरा पथके स्थापन करण्यात आली, त्यात २०० पोलिस अधिकारी आणि कर्मचारी सहभागी होते. याप्रकरणात मुख्य आरोपी पोलिस कॉंस्टेबलसह रोख असलेल्या वाहनाचा चालक, सीएमएस इन्फोसिस्टम्स कंपनीचा माजी कर्मचाऱ्याला गोवा येथून अटक करण्यात आली. आरोपींकडून ५.७६ कोटींची रोख जप्त करण्यात आली आणि उर्वरित रकमेचा शोध घेतला जात आहे. या टोळीने तीन महिन्यांपूर्वी दरोड्याची योजना आखली होती. त्यांनी कॅश व्हॅनचा मार्ग तपासला आणि सीसीटीव्ही कॅमेरा नसलेल्या मार्ग निवडला. (वृत्तसंस्था)

# १४ महिन्यांत निर्यातीत घसरण : क्रिसिल

**कोलकाता, २२ नोव्हेंबर**

ऑगस्ट २०२४ पासून ऑक्टोबरमध्ये भारताच्या व्यापारी मालाच्या निर्यातीत ११.८ टक्क्यांनी घसरून ३४.३८ अब्ज डॉलर्स झाल्याचे क्रिसिलने अहवालात म्हटले आहे. या वर्षी २७ ऑगस्ट रोजी अमेरिकेने ५० टक्के कर वाढवल्याने सलग दुसऱ्या महिन्यात निर्यात मंदावली आहे, असे अहवालात म्हटले आहे.

निर्यातीत झालेली घट पेट्रोलियम उत्पादने, रत्ने आणि दागिने आणि प्रमुख क्षेत्रांमध्ये व्यापक होती. पेट्रोलियम उत्पादनांच्या निर्यातीत ऑक्टोबरमध्ये वार्षिक आधारावर १०.४ टक्के घट झाली, तर सप्टेंबरमध्ये ती १५.१ टक्के वाढली होती. त्याचप्रमाणे, मुख्य निर्यात सप्टेंबर २०२५ मध्ये ६.१ टक्के वाढीच्या तुलनेत १०.२ टक्क्यांवर घसरली, असे अहवालात म्हटले आहे. अमेरिकेला वस्तू निर्यात ऑक्टोबरमध्ये ८.६ टक्क्यांनी घटून ६.३ अब्ज डॉलर्स झाली. अहवालानुसार, सप्टेंबरमध्ये झालेल्या ११.९ टक्क्यांची घसरणीत ही सुधारणा आहे. १६ नोव्हेंबर रोजी अमेरिकेने २५४ अन्नपदार्थांवरील आयात शुल्क कमी करण्याची घोषणा केल्याने चहा आणि मसाल्यांसारख्या काही कृषी निर्यातीसाठी चांगले संकेत मिळतात, असे अहवालात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# गीतेतील संपूर्ण १८ वा अध्याय कंठस्थ

## प्रिया देशमुख यांना सुवर्ण पदक



गीता कंठस्थ परीक्षेत मिळालेल्या प्रमाणपत्र व पारितोषिकांसह प्रिया देशमुख

**चिखली, २२ नोव्हेंबर**

प.पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराजांच्या प्रेरणेतून गीता परिवारातर्फे साधकांसाठी विविध परीक्षांचे आयोजन केले जाते. त्यापैकी गीताव्रती ही एक परीक्षा आहे. यात गीतेतील १८ वा अध्याय कंठस्थीकरण परीक्षेत येथील प्रिया देशमुख यांनी सुवर्ण पदक पटकाविले. त्यांना पदकासोबत पू. स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र, कार्याध्यक्ष संजय मालपाणी यांचे अभिनंदनपर पत्र मिळाले आहे.

त्यानंतर श्लोकांक ही दुसरी परीक्षा आहे. यात १८ अध्यायातील ७०० श्लोकांमधील श्लोक, अध्याय क्रमांक व श्लोक क्रमांकावरून श्लोक ओळखून तो म्हणायचा असतो. ही परीक्षा ९ नोव्हेंबरला झाली. या परीक्षेत प्रिया देशमुख यांनी ७०० पैकी ६९५.५ गुण मिळवून अत्युत्कृष्ट श्रेणी प्राप्त केली आहे.

### श्रृंगेरी परीक्षा

गीताव्रती झालेल्या साधकांनाच श्रृंगेरी येथे श्री शंकराचार्यांद्वारा स्थापित मंदिरात परीक्षा देण्याची संधी मिळते. ही परीक्षा १६ नोव्हेंबरला झाली. ही परीक्षासुद्धा प्रिया देशमुख यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. त्यांना श्री शंकराचार्यांच्या हस्ते प्रमाणपत्र, कृष्णाची प्रतिमा व २१ हजार रु. रोख पारितोषिक प्राप्त झाले. हे सर्व श्रीकृष्ण कृपा, गीता परिवार, थोरामोठ्यांचे आशीर्वाद, कुटुंबाचे सहकार्य यामुळेच शक्य झाले, असे त्यांनी सांगितले. ४ वर्षांपासून त्या गीता परिवारात सेवा देत आहेत. सध्या त्या लेव्हल ४ मध्ये प्रशिक्षक म्हणून सेवा देत आहेत. (तभा वृत्तसेवा)

# ताडोबा व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचे होणार पर्यावरणीय पुनरुज्जीवन

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला ‘झिरोधा’चा प्रतिसाद ● वन विभाग, फार्मर्स फॉर फॉरेस्ट व झिरोधा यांच्यात होणार करार



### रिवाईल्डिंग म्हणजे काय?

रिवाईल्डिंग म्हणजे जंगल, गवताळ प्रदेश किंवा जलक्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून तेथील नैसर्गिक भूभाग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करणे होय. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबविण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्या सहकार्याने झिरोधा व रेनमॅटर फाऊंडेशन ही संस्था काम करणार आहे.

**मुंबई. २१ नोव्हेंबर**

विदर्भातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प झिरोधा कंपनी व रेन मॅटर फाऊंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून राबविल्या जाणार आहे. यासाठी वन विभाग, फार्मर्स फॉर फॉरेस्ट व झिरोधा यांच्यात होणार करार असून, झिरोधाने १०० कोटींचा निधीदेखील जाहीर केला आहे.

विदर्भातील पर्यावरणाच्या संवर्धनासाठी रिवाइल्डिंगसारखे प्रकल्प उपयुक्त आहेत. अशा कामांमध्ये झिरोधा सारख्या कार्पोरेट कंपन्या सहभागी होत असून हा पर्यावरणपूरक उपक्रम केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर देशातील कॉर्पोरेट क्षेत्रासाठीही एक आदर्श ठरणार आहे. या उपक्रमाबद्दल अत्यंत उत्साही आहोत. महाराष्ट्र शासन आणि वन विभागासोबतचे हे सहकार्य फलदायी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

झिरोधा आणि ‘रेनमॅटर फाऊंडेशन’ या संस्थांच्या माध्यमातून पर्यावरणीय व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

रेनमॅटर फाऊंडेशनमार्फत हवामान बदल व पर्यावरणीय ऱ्हास या समस्यांवर कामे करण्यात येतात. यासाठी झिरोधा ही कंपनी आपल्या नफ्यातील १० टक्के निधी सामाजिक उत्तरदायित्व व पर्यावरणीय कामांसाठी राखीव ठेवते. या राखीव निधीतून झिरोझाने संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त १०० कोटी रुपये गुंतवणुकीचा ‘झिरोधा रिवाइल्डिंग फंड’ जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत देशातील पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या परिसरातील निसर्गाचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. त्यामध्ये देशात विविध ठिकाणी मोनोकल्चर वृक्षलागवडी ऐवजी जैवविविधता टिकवणाऱ्या पद्धतीने निसर्गाचा समतोल राखण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये विदर्भातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकरच्या प्रकल्पाचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, २३ नोव्हेंबर २०२५
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आमच्या येथे वाद नाही याचे इतरांना मोठे आश्चर्य वाटते. लोक तर कधी कधी वाद उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतात. परंतु, सर्व जण ध्येयाप्रति समर्पित असल्यामुळे त्यांचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत.

- डॉ. आबाजी थत्ते
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचारक प्रमुख

# ‘मानवी बॉम्बर’ला ‘जैश’चे प्रशिक्षण



- पाठवल्या ४० पेक्षा जास्त चित्रफिती
- तपास संस्थांच्या चौकशीतून उघड झाली माहिती

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. डॉक्टरांच्या मॉड्युलला स्फोटके तयार करण्याचे प्रशिक्षण पाकिस्तानातील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदने दिल्याची माहिती चौकशीतून समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली. स्फोटके तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी जैशने डॉक्टरांना ४० पेक्षा जास्त चित्रफिती पाठवल्या होत्या. एवढेच नव्हे तर जिहादचे धडे देत ‘मानवी बॉम्बर’ ही तयार केल्याचे डॉ. उमर नबीवरून उघड झाले आहे. नबीनेच स्वतःला उडवित दिल्ली बॉम्बस्फोट घडविला.

फरिदाबादच्या धौज आणि फतेहपूर तगाचा वापर या मॉड्युलने स्टोरेज हबच्या स्वरूपात केला होता. घरगुती यंत्रे स्फोटके तयार करण्यासाठी रुपांतरीत करण्यात आल्याचे डॉ. मुझम्मिल शकील गनी आणि डॉ. उमरच्या घरातून जप्त केलेल्या पुराव्यांतून समोर आले.



ठार झालेला डॉ. उमर नबी

जैश-ए-मोहम्मदच्या पाकिस्तानील सूत्रधारांनी दोन्ही डॉक्टरांना ४० पेक्षा जास्त चित्रफिती पाठवल्या होत्या. यात स्फोटकांच्या निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया आणि तंत्राची तपशीलवार माहिती देण्यात आली.

पाकिस्तानातून पाठवण्यात आलेल्या चित्रफिती पाहून युरियातून अमोनियम नायट्रेट वेगळे करण्याची प्रक्रिया डॉक्टर शिकले. नूह येथील एका चक्कीतून युरिया दळण्यात आला आणि नंतर इलेक्ट्रिक यंत्रांचा वापर करीत तो रिफाईन करण्यात आला. त्यानंतर ही स्फोटके फरिदाबाद येथील धौज आणि फतेहपूर तगा येथील ठिकाणांवर जमा करण्यात आली. स्फोटके तयार करण्यासाठी वापरण्यात आलेली यंत्रे एका टॅक्सी चालकाच्या घरातून जप्त करण्यात आली.

### अल-फलाह विद्यापीठातून रसायनांची चोरी?




**हरयाणा आरोग्य विभागाच्या पथकाने अल-फलाह विद्यापीठाच्या परिसरातील प्रयोगशाळा, ऑपरेशन थिएटर आणि वॉर्डांचे निरीक्षण केले. प्रयोगशाळांमधील रसायनांची चोरी करून त्याचा मॉड्युलला पुरवठा केला जायचा, अशी शंका वर्तवली जात आहे. याबाबतचा अहवाल लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केला जाईल.**

**इलेक्ट्रिशियनला अटक**

दिल्लीतील कार बॉम्बस्फोट प्रकरणात काश्मीर पोलिसांनी शनिवारी पुलवामा येथून एका इलेक्ट्रिशयनला अटक केली, तुफैल नियाज अहमद, असे त्याचे नाव आहे. तो जैश या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचा संशय आहे. दिल्ली स्फोटातील उच्चशिक्षित दहशतवादी मॉड्युलच्या चौकशीतून तुफैलची माहिती मिळाली होती. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### ११ वर्षीय मुलाची बिबट्याशी झुंज

**पालघर** : पालघर जंगलात एका ११ वर्षांच्या शाळकरी मुलाने बिबट्याशी धैर्याने झुंज दिली. शाळेचे दफ्तर त्याच्यासाठी ढाल ठरले. मित्राच्या मदतीने आरडाओरड व दगडफेक केल्यामुळे अखेर बिबट्या जंगलात पळून गेला. मयंक कुवरा, असे या बिबट्याच्या हल्ल्यातून बचावलेल्या मुलाचे नाव आहे. मयंक कुवरा शाळेचे दफ्तर घेऊन नसता तर बिबट्याचे हल्ले थोपविणे कठीण झाले असते. शुक्रवारी सायंकाळी माला पडवीपाडा परिसरात बिबट्याने त्याच्यावर झडप घातली, असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शनिवारी सांगितले. बिबट्याने पंजा मारल्यामुळे कुवराच्या हाताला दुखापत झाली आणि सध्या तो विक्रमगड ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत आहे. मुलाला दुखापतीमुळे टाके पडले आहेत.

## दिल्ली पोलिसांनी जप्त केला शस्त्रसाठा, चौघे अटकेत

**नवी दिल्ली** : दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने शस्त्रास्त्रांची अवैध तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सिंडिकेटचे पाळेमुळे खोदत चार सदस्यांना अटक केली. हे सिंडिकेट पाकिस्तानातून ड्रोनच्या माध्यमातून चिनी आणि तुर्कीतील पिस्तूल आणून त्याचा पुरवठा गुंडांच्या कुख्यात टोळ्यांना करायचे.

या टोळीचा संबंध पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयसोबत होता. अजय मंदीप, दलविंदर आणि रोहन अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. ही टोळी तुर्की आणि चीनमधील महागड्या पिस्तूल पाकिस्तानच्या मार्गे भारतात तस्करीच्या माध्यमातून आणायची. ड्रोनने आलेली ही शस्त्रास्त्रे पंजाबमध्ये पाडली जायची. त्यानंतर त्याची विक्री केली जायची. या टोळीकडून पोलिसांनी १० महागड्या पिस्तूल आणि ९२ काडतुसे जप्त केली आहेत. ही शस्त्रे दिल्ली आणि जवळपासच्या राज्यांतील गुन्हेगारांना विकली जायची, अशी माहिती पोलिसांनी दिली. अटक केलेल्या आरोपींपैकी दोन जण पंजाबमधील आहेत. (वृत्तसंस्था)



मयत पुजा शिंदे

# देवदर्शनापूर्वीच देवाज्ञा...

- क्रुझर जीपचे टायर फुटून अपघात; तीन महिला ठार, १२ जण जखमी
- हैद्राबाद रस्त्यावरील चिवरी फाट्याजवळील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या क्रुझर जीपला टायर फुटून देवदर्शनापूर्वीच झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर १२ जण जखमी झाले. ही दुर्घटना हैदराबाद रस्त्यावरील चिवरी फाट्याजवळ शनिवारी साडेअकराच्या सुमारास घडली. मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. या अपघातातील जखमींना अधिक उपचारासाठी सोलापुरातील सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पुजा हरी शिंदे (वय ३०, रा. ऊळेगांव), सोनाली माऊली कदम (वय २२, रा. हडपसर), साक्षी बडे (वय १९, रा. हडपसर) अशी मृतांची नावे आहेत. तर कुणाल लक्ष्मण भिसे (वय ३२), अंजली रवी अमराळे (वय १५), आकाश दत्ता कदम (वय २५), माऊली कदम ( वय ३०, सर्व रा. हडपसर), कार्तिक रवींद्र आमराळे (वय १३), कार्तिकी रवींद्र आमराळे (वय १५), शिवांश माऊली कदम (वय 0१ वर्षे, सर्व रा. हडपसर), ओमकार हरी शिंदे (वय १0), रुद्र हरी शिंदे (वय १२), बालाजी पांडुरंग शिंदे, हरी बाळकृष्ण शिंदे (वय ३६) (वय ४७), श्लोक हरी शिंदे (वय ८, सर्व रा. ऊळे) अशी जखमींची नावे आहेत.

शनिवारी सकाळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील ऊळेगाव येथील भाविक आणि त्यांचे पुणे येथील हडपसरचे नातेवाईक एमएच २४ व्ही ४९४८ या क्रुझर जीपमधून नळदुर्गजवळील खंडोबा मंदिराकडे निघाले होते. चिवरी गावाजवळ त्यांच्या जीपचे पुढील टायर अचानक फुटल्याने चालकाचे जीपवरील नियत्रंण सुटले व जीप पलटी होऊन अपघात झाला.

या अपघातात क्रुझर जीपमधील तीन भाविकांचा मृत्यू झाला तर इतर १२ जण जखमी झाले. अपघातातील जखमींना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातातील जखमींची नोंद सोलापूरच्या सिव्हील पोलिस चौकीत करण्यात आली आहे.

# टेंभुर्णीची एंजल कोकरे शालेय धनुर्विद्या स्पर्धेत देशात दुसरी

महात्मा फुले विद्यालयाची विद्यार्थिनी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२२ नोव्हेंबर-**

वाराणसी (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या (आर्चरी) स्पर्धेत रिकर्व्ह राऊंड या प्रकारामध्ये टेंभुर्णी येथील महात्मा फुले विद्यालयाची विद्यार्थिनी कु.एंजल सुनील कोकरे ही इयत्ता सातवीची विद्यार्थिनी देशात दुसरी आली आहे. १४ वर्षे वयोगटाच्या स्पर्धेत रौप्य (रजत) पदक पटकाविले.



वाराणसी येथील स्पर्धेत संपूर्ण भारतातून सुमारे १ हजार २00 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्या स्पर्धेत एकूण १३ पदके मिळवून महाराष्ट्र राज्य देशात अव्वल ठरले आहे. यापूर्वी यवतमाळ येथे झालेल्या राज्यस्तरीय आर्चरी स्पर्धेत एंजल कोकरे ही महाराष्ट्रातून प्रथम आली होती. तिने मिळवलेले हे यश टेंभुर्णीकरांसाठी अभिमानास्पद आहे. तिला येथील सह्याद्री आर्चरी अॅकॅडमीचे सागर सावंत व पालक सुनील विठ्ठल कोकरे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल माजी आमदार बबनराव शिंदे तसेच आमदार अभिजीत पाटील, जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजीतसिंह शिंदे, टेंभुर्णीचे माजी सरपंच प्रमोद कुटे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे, विद्यालयाचे प्राचार्य विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान, क्रिडा शिक्षक शरद सातव तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# चाटी गल्लीतील आर.एस. मोगले दुकानात चोरी

- १० लाख ७० हजारांची रोकड लंपास; शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

शहरातील मंगळवार पेठ पोलिस चौकीच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या चाटी गल्लीतील आर.एस. मोगले या साडी विक्रीच्या दुकानातील १० लाख ७० हजारांची रोकड चोरट्याने चोरुन नेली. ही घटना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दीपक अरविंद येलदरी (वय-४५, रा.प्लॉट नं. ११, नाथ रेजन्सी, भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, पश्चिम मंगळवार पेठेतील चाटी गल्लीमध्ये आमचे आर.एस.मोगले हे साडी विक्रीचे दुकान आहे. शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान बंद करुन घरी गेलो होतो. मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास चोरट्याने दुकानाच्या टेरेसवर असलेल्या लोखंडी पत्र्याला लावलेले नट बोल्ट खोलून पत्रा उचकटून दुकानात प्रवेश केला. दुकानात असलेल्या कॅश काउंटरमधील रोख ७० हजार रुपयांची रक्कम तसेच तळमजल्यावरील



खोलीतील तिजोरीत असलेली १० लाखांची रोकड चोरट्याने चोरुन नेली. कॅश काऊंटर व तिजोरीची चावी ही दुकानातच होती. त्या चावीच्या मदतीने कॅश काऊंटर व तिजोरी उघडून चोरट्यांनी रोकड चोरुन नेली.

शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास दुकान उघडून दुकानात आल्यानंतर चोरी झाल्याचे दिसून आले, असे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली असून तपासाच्या सूचना दिलेल्या आहेत. महिला पोलिस उपनिरीक्षक शेख पुढील तपास करीत आहेत.

**चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद;**

सहा पोलिस पथकाकडून तपास सुरु

आर.एस.मोगले यांच्या दुकानात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे आहेत. या कॅमेऱ्यांमध्ये चोरटे चोरी करताना कैद झाले आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील चित्रीकरणाच्या आधारे जोडभावी पेठ पोलिस ठाण्यांची दोन व शहर गुन्हे शाखेची चार पोलिस पथके चोरांच्या मागावर असल्याचे पोलिस निरीक्षक सुरज मुलाणी यांनी सांगितले.



# पंतप्रधान मोदी तपपूर्तीनिमित्तच्या तरुण भारत विशेषांकासाठी मुख्यमंत्री फडणवीसांशी चर्चा

- मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून तरुण भारतच्या उपक्रमाचे कौतुक
- विशेषांक तरुण पिढीसाठी प्रेरणादायी, वाचकांना पर्वणी

**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. २२ नोव्हेंबर-**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या तपपूर्ती निमित्त तरुण भारत परिवारातर्फे प्रकाशित होणाऱ्या विशेषांकाबाबत आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषांकाची मुख्य संकल्पना, विषयवैशिष्ट्ये, मांडणी आणि संपादकीय दिशा याबाबत मुख्यमंत्र्यांना तपशीलवार माहिती देण्यात आली.

याप्रसंगी विधानसभेचे अध्यक्ष अॅड.राहुल नार्वेकर, मंत्री पंकजा मुंडे, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार अभिमन्यू पवार, अर्चना पाटील, मेघराज पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे यांच्यासह तरुण भारत धाराशिव जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे आणि उपसंपादक विपीन वीर उपस्थित होते. विशेषांक अधिक सर्वसमावेशक, दर्जेदार आणि प्रेरणादायी व्हावा यासाठी संपादकीय टीमने केलेल्या तयारीची माहिती त्यांनी मुख्यमंत्र्यांना दिली.

विशेषांकात नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील प्रवास, नेतृत्वक्षम कार्यशैली, निर्णायक धोरणनिर्मिती, विकासाभिमुख उपक्रम आणि राष्ट्रनिर्मितीसाठी दिलेल्या योगदानाचा सखोल वेध घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तरुण भारतच्या या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले. विशेषांकात मोदी यांच्या कार्यशैलीचा सर्वांगीण आढावा, शासन व्यवस्थेत आणलेले नवोन्मेष, तसेच समाजामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणाऱ्या त्यांच्या उपक्रमांचा समावेश करण्याचा सल्ला त्यांनी दिला. हा विशेषांक तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल आणि वाचकांना विचारप्रवर्तक दृष्टी देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांनी संपादकीय टीमला शुभेच्छा देत विशेषांक तथ्यपूर्ण, अभ्यासपूर्ण आणि जनसामान्यांसाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तरुण भारत परिवाराच्या या पुढाकारामुळे विशेषांकाबाबतची उत्सुकता अधिक वाढली असून, लवकरच तो वाचकांच्या हाती येणार आहे.

# ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष बोल्सोनारो यांना अटक

**साओ पाउलो, २२ नोव्हेंबर**

ब्राझीलच्या संघीय पोलिसांनी शनिवारी माजी राष्ट्राध्यक्ष जैर बोल्सोनारो यांना अटक केली. त्यांच्यावर त्यांच्याच देशात सत्तापालट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होता. ब्राझीलच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या अटकेच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

त्यांना २७ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली असून पुढील आठवड्यात त्यांना तुरुंगवासात पाठवण्यात येणार आहे. माजी राष्ट्राध्यक्षांना ब्राझिलिया येथील पोलिस दलाच्या मुख्यालयात नेण्यात आले. त्यांनी



ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई केली, असे बोल्सोनारो यांचे नाव न घेता, दलाने एका निवेदनात म्हटले आहे. ब्राझीलच्या संघीय पोलिस आणि सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची अधिक माहिती दिली नाही. बोल्सोनारो यांचे सहाय्यक आंद्रेली सिरिनो यांनी शनिवारी सकाळी ६ वाजताच्या सुमारास अटक झाल्याची पुष्टी केली.



पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या ‘एसआयआर’मुळे घुसखोरांनी पलायन करणे सुरू केले आहे. कारवाईच्या भीतीने दररोज शेकडो घुसखोर सीमेवर जमत आहेत. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील हकीमपूर चेकपोस्टवर जमलेले बांगलादेशी

# भाजपाला लवकरच मिळणार नवा राष्ट्रीय अध्यक्ष

◆ **नवी दिल्ली, २२ नोव्हेंबर**

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला दणदणीत यश मिळाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाकडे लागले आहे. नवीन वर्षात भाजपाला नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे.अध्यक्षपदासाठी धर्मेंद्र प्रधान यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे.

भाजपाचे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचा अध्यक्ष म्हणून कार्यकाळ कधीच संपला आहे. जानेवारी २०२० मध्ये नड्डा यांची भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. अध्यक्ष म्हणून त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ जानेवारी २०२३ मध्ये संपला. मात्र २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक असल्यामुळे नड्डा यांच्या अध्यक्षपदाला मुदतवाढ देण्यात आली.




**धर्मेंद्र प्रधान यांचे नाव आघाडीवर**

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर भाजपाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जाईल, असे वाटत असतांना वेगवेगळ्या कारणांनी नड्डा यांना मुदतवाढ देण्यात आली. जानेवारी २०२६ मध्ये नड्डा यांच्या अध्यक्ष म्हणून मुदतवाढीचे आणखी तीन वर्ष पूर्ण झाले. म्हणजे भाजपा अध्यक्ष म्हणून नड्डा यांचा सहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होत आला आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीनंतर भाजपाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष निवडला जाईल, असे संकेत ज्येष्ठ भाजपा नेते आणि संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी निवडणुकीच्या आधी दिले होते. त्यामुळे आता भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक लवकरात लवकर होईल, अशी चर्चा सुरु झाली आहे.

आतापर्यंत भाजपाच्या विविध राज्यातील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण न झाल्याचे कारण अध्यक्षपदाची निवडणूक पुढे ढकलण्यासाठी दिले जात होते. पण आता जवळपास ९० टक्के राज्यातील भाजपाची संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आता कोणतीही तांत्रिक अडचण उरली नाही. जास्तीत जास्त जानेवारी महिन्यापर्यंत भाजपाला नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे. (तभा वृत्तसेवा)

### हरयाणा ते बिहारमधील विजयात प्रधानांची मोठी भूमिका

भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी अनेक नावे चर्चेत असली तरी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. प्रधान बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाचे निवडणूक प्रभारी होते. बिहारमध्ये भाजपाला मिळालेल्या लक्षणीय यशात त्यांचे मोठे योगदान आहे. प्रधान हरयाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाचे निवडणूक प्रभारी होते, हरयाणात भाजपाची सत्ता पुन्हा आणण्यात प्रधान यांचे योगदान उल्लेखनीय होते. प्रधान यांच्या नावावर संघ भाजप यांच्यात सहमती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होतील, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

रोखठोक

दिनेश गुणे

# समानतेचे सूत्र!

सुमारे ८० वर्षांपूर्वी, १९४५ मध्ये, जॉर्ज ऑर्वेल नावाच्या इंग्लिश लेखकाने लिहिलेल्या 'ॲनिमल फार्म' नावाच्या कादंबरीने जगभर खळबळ माजविली. एक भेदक राजकीय रूपक म्हणून गाजलेल्या या कादंबरीचे कथानक हे कालातीत वास्तव म्हणून आजही सर्वमान्य ठरले आहे. 'सारे प्राणी समान आहेत, पण काही जण अधिक समान आहेत', हे या कादंबरीतील समानतेचे (खोचक) सूत्र आहे. त्यामुळेच, जेव्हा जेव्हा सामान्य नागरिकांना आपल्या समानतेच्या अधिकारांची स्वप्ने पडू लागतात, तेव्हा त्या हक्काची पडताळणी करण्याची त्याची इच्छा जागी होते. घटनेने दिलेल्या समानतेच्या अधिकाराचे आपण हकदार आहोत, याची जाणीवही जागी होते. आपल्याला मिळालेल्या समानतेच्या अधिकाराची सर्वत्र संपूर्ण अंमलबजावणी झाली पाहिजे, ही त्याची अपेक्षा असली, तरी आपल्याहून अधिक समान असलेल्यांचा त्या अधिकारावर पहिला हक्क आहे, हे त्याला उमगते आणि समानतेचे हे सूत्र कोणत्या ना कोणत्या रूपात अंमलात आहे, या जाणिवेने तो समाधान पावतो. निवडणुकांच्या मार्गाने जनतेने निवडून दिलेला लोकप्रतिनिधी हा केवळ त्यास मतदान करणाऱ्यांचे प्रतिनिधित्व करण्यापुरता मर्यादित नसतो, तर तो त्याच्या संपूर्ण मतदारसंघातील सर्व जनतेचे प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे, लोकप्रतिनिधीचा आदर करणे म्हणजे, तो ज्या जनतेचे प्रतिनिधित्व करतो त्या जनतेचा आदर करण्यासारखेच असते, ही सर्वमान्य समजूत असल्यामुळेच, लोकप्रतिनिधींना द्यावयाच्या आदराचे काही संकेत शिष्टाचारसंमत असतात. कदाचित म्हणूनच, सामान्य जनतेस सर्वत्र, विशेषतः सरकार दरबारी समानतेची वागणूक मिळाली नाही तरी लोकप्रतिनिधीस ती मिळालीच पाहिजे यासंबंधी काही नियम केले जातात, तेव्हा ती सन्मानाची वागणूक आपल्यासच मिळाली आहे असे समजून सामान्य जनता समाधानी होते. असे समाधान वाटण्याजोग्या एका नव्या शासकीय निर्णयामुळे, आपल्या प्रतिनिधीस मिळणारा प्रातिनिधिक आदर हाच आपला सन्मान आहे, ही भावना जनतेमध्ये रुजण्यास मदत होणार आहे. कोणत्याही कामानिमित्त सरकारी कार्यालयात गेलेल्या सामान्य माणसास समानतेच्या सूत्रानुसार अपेक्षित असलेला सन्मान, आदर किंवा समाधानकारक वागणूक नेहमी मिळतेच असे नाही. सरकारी कार्यालयांतील कोणतेही काम विनाविलंब पूर्ण झाल्याचा किंवा सरकारी कर्मचाऱ्यांनी आत्मीयतेने व तत्परतेने त्यासाठी संपूर्ण सहकार्य केल्याचा अनुभव एखाद्यास आलाच, तर ते अभूतपूर्व असल्याचे समजून त्याने सत्यनारायण सोहळा करून आनंद साजरा करावा असे साधारण समाजात म्हटले जाते. सामान्य नागरिकांशी सरकारी कर्मचाऱ्यांनी कसे वागावे, याची काही नियमावली अनेक दशकांपासून अस्तित्वात आहे. नागरिकांशी सौजन्याने वागावे, त्याच्या कोणत्याही कामात त्याला सहकार्य करून त्याच्या समस्या सोडवाव्यात, अशा अपेक्षा या नियमावलीने आखून दिलेल्या आहेत. याबाबतचे एक साधे उदाहरण बोलके आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी, २३ जुलै २०२१ रोजी, शासकीय कार्यालयांत कर्मचाऱ्यांनी फोनवरील संभाषणाबाबत कोणती पथ्ये पाळावीत याच्या स्पष्ट सूचना देणारा एक आदेश सरकारने जारी केला होता. मोबाईलवर बोलताना सौजन्यपूर्वक बोलावे, कार्यालयीन कामकाजासाठी शक्यतो खाजगी मोबाईल न वापरता कार्यालयातील लॅण्डलाईनचा प्राधान्याने वापर करावा, फोनवर बोलताना वेळेचे तारतम्य बाळगावे, वरिष्ठ किंवा लोकप्रतिनिधींच्या फोनला तत्काळ उत्तर द्यावे, वैयक्तिक स्वरूपाचे संभाषण मोबाईलवर करावयाचे असेल तर कक्षाबाहेर जाऊन बोलावे, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कक्षात असताना किंवा कोणत्याही बैठकीच्या वेळी उपस्थित असताना मोबाईल, व्हॉट्सॲप किंवा मोबाईल ॲप्सचा अनावश्यक वापर टाळावा, मोठ्याने बोलू नये, वाद घालू नये, आसपास इतरही लोक उपस्थित आहेत याची जाणीव ठेवावी, असंसदीय -म्हणजे वाईट किंवा शिवीगाळीच्या- भाषेचा वापर करू नये व कमीत कमी वेळेत सौम्य शब्दांत संवाद साधून पलीकडच्या व्यक्तीच्या भावना आपुलकीने जाणून घ्याव्यात आदी सूचना या आदेशाद्वारे करण्यात आल्या होत्या. त्यासंबंधीचे वृत्त प्रसिद्ध झाल्यावर सामान्य नागरिकांच्या मनात समाधानाची भावनी उमटली होती. हा निर्णय वरवर पाहता सामान्य वाटत असला, कोणत्याही समंजस समाजाकडून अपेक्षित असलेली सभ्यतेची वागणूकच अधोरेखित करणारा असला, तरी तो लिखित स्वरूपात आदेशाच्या रूपाने जारी झाल्याने आता समानतेच्या अधिकारास बळ मिळणार अशा भावनेने सामान्य जनता सुखावलीदेखील होती.

राज्य सरकारने जारी केलेल्या एका ताज्या आदेशामुळे सामान्य जनतेस चार वर्षांपूर्वीच्या त्या निर्णयाची आठवण झाली असेल यात शंका नाही. महाराष्ट्र शासन हे सुशासन, पारदर्शकता आणि कार्यक्षमता यांना सर्वोच्च प्राधान्य देत असल्याने, सुशासनाच्या दृष्टिकोनातून व शासनाच्या प्रक्रिया पुनर्रचना उपक्रमाचा एक भाग म्हणून लोकप्रतिनिधींना सन्मानपूर्वक वागणूक, त्यांच्या पत्रव्यवहारांस त्वरित प्रतिसाद, शासकीय कार्यक्रमांतील त्यांच्या सहभागाची निश्चिती व लोकप्रतिनिधींशी होणारा संवाद अधिक सुसंगत, सुलभ व विश्वासार्ह करण्याकरिता काही सूचना शासनाने या निर्णयाद्वारे जारी केल्या आहेत. अर्थात, याच हेतूने गेल्या सुमारे दहा वर्षांपासून वेळोवेळी करण्यात आलेल्या सर्व सूचनांचे एकत्रीकरण करून नव्याने सूचना जारी करण्याची शासनाची गरज कर्मचाऱ्यांनी समजून घेतली असेल हे ध्यानात घेतले, तर त्याची नव्याने अंमलबजावणी सुरू झाल्यास समानतेच्या सूत्रातील अधिक समान असलेल्यांना तरी सन्मानाची वागणूक मिळेल अशा नव्या अपेक्षांची भर सामान्यांच्या मनात पडली असेल यातही शंका नाही. विधानमंडळ सदस्य किंवा संसद सदस्य जेव्हा कोणत्याही सरकारी कार्यालयास भेट देतील तेव्हा संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांनी त्यास आदराची व सौजन्याची वागणूक द्यावी, त्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकावे



व शासकीय नियम व प्रक्रियेनुसार शक्यतो त्यास तत्काळ मदत करावी, असे आदेश नव्याने जारी करण्यात आले आहेत. लोकप्रतिनिधींचे शासकीय कार्यालयांत आगमन झाल्यावर त्यास सन्मानपूर्वक वागणूक देण्यासाठी अधिकाऱ्यांनी उभे राहून त्याचे स्वागत करावे तसेच कार्यालयातून परतताना त्यास अभिवादनपूर्वक निरोप द्यावा, असेही सुचविण्यात आले आहे. अशाच आशयाच्या काही सूचना देणारा निर्णय याआधी तब्बल दहा वर्षांपूर्वी, २७ जुलै २०१५ रोजी जारी करण्यात आला होता. पुढे दोन वर्षांनी, १७ एप्रिल २०१७ रोजी नवे परिपत्रक जारी करण्यात आले. गेल्या दहा वर्षांत अशी तब्बल आठ परिपत्रके जारी करण्यात आली आणि तीन दिवसांपूर्वी, २० नोव्हेंबर रोजी या सर्व परिपत्रकांचे एकत्रीकरण करून नवे, नववे परिपत्रक जारी करण्यात आले.

समानतेच्या सूत्रानुसार सामान्य समाज ज्यांना अधिक समान समजतो, त्यांना द्यावयाच्या सौजन्याच्या वागणुकीसंबंधात दहा वर्षांत नऊ परिपत्रके जारी करून सूचना देण्याची गरज सरकारला का भासली असावी, याची उत्तरे गेल्या काही वर्षांतील अन्य काही निर्णय व आदेशांतूनही शोधणे शक्य आहे. तीन वर्षांपूर्वी, २०२२ मधील स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येस तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी मंत्रालयीन कर्मचाऱ्यांकरिता एक अनोखी सूचना केली. या सूचनेचा उद्देश खरोखरीच स्तुत्य होता. स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवाकडे वाटचाल सुरू झाल्यानंतरही अद्याप इंग्रजाळलेल्या मानसिकतेचा पगडा अजून मानगुटीवरून उतरलेला नाही, तो झुगारून द्यायला हवा, याकरिता आता फोनवरील संभाषणाची सुरुवात करताना 'हॅलो' असे न म्हणता, 'वंदे मातरम्' म्हणावे असा निर्णय तत्कालीन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्रिपदाची सूत्रे हाती घेताच जारी केला. त्यांच्या कार्यकालातील या पहिल्याच निर्णयाचे जोरदार स्वागतही झाले. आता सरकारी कर्मचारी आणि सामान्य जनता यांच्यातील संवादाची जवळीक अधिक वाढेल अशी भावनाही व्यक्त झाली, पण मंत्रालयात दूरध्वनीवरून संपर्क साधणाऱ्या सामान्य माणसाच्या कानावर 'हॅलो'ऐवजी 'वंदे मातरम्' हे शब्द अभावानेच पडल्याचे अनुभव येऊ लागले. मंत्र्यांच्या आदेशाचे किंवा सरकारच्या निर्णयांचे शब्द हवेत विरण्याआधीच त्यांची अशी अवस्था होत असल्याच्या अनुभवामुळे समानतेच्या सूत्रातील 'अधिक समानां'हून आपला स्तर खालचा आहे, या जाणिवांची खंतदेखील बोथट होत असावी.

मंत्रालयातील किंवा अन्य सरकारी कार्यालयांतील कारभार अधिकाधिक समाजाभिमुख असावा यावर राज्य सरकारचा कटाक्ष आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्याबाबत अधिक जागरूकही असतात. त्यामुळेच सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये सामान्य जनतेसोबतच्या सौहार्दाचे संस्कार घडविणारे काही उपक्रमही त्यांनी सुचविले, राबविले आहेत. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांनी कामावर असताना अधिकाधिक वेळ कामकाजावर लक्ष केंद्रित करावे, यासाठी त्यांनी राबविलेला एक अभिनव उपक्रम आजही शासन निर्णयाच्या रूपाने अस्तित्वात आहे. कर्मचाऱ्यांच्या खाण्याच्या सवयींना संयमाचा लगाम घालण्याच्या सुप्त हेतूने सुमारे साडेसहा वर्षांपूर्वी, ४ जून २०१९ रोजी जारी करण्यात आलेले हे परिपत्रक सामान्य जनतेने सरकारी कार्यालयांत जाताना कायम सोबत ठेवावे, असेही काही माध्यमांनी त्यानंतर सुचविले होते. उन्हातान्हातून राज्याच्या खेडोपाड्यातून ग्रामस्थ मंडळी पायपीट करून कामासाठी शासकीय कार्यालयात येतात. आपली कागदपत्रे घेऊन टेबलाजवळ जातात परंतु खुर्चीत साहेब नसतात. 'साहेब जेवायला गेले' अशी उत्तरे मिळतात. प्रत्येक शासकीय कार्यालयात सोयीनुसार दुपारच्या जेवणाची वेळ ठरवली जाते. कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीत शिस्त यावी आणि ग्रामस्थांची कामे वेळेत व्हावीत याकरिता शासकीय कार्यालयात दुपारच्या भोजनाची वेळ निश्चित करण्यात आली होती. दुपारी एक ते दोन वाजण्याच्या दरम्यान अर्ध्या तासाची भोजनाची सुट्टी घेण्याची मुभा सामान्य प्रशासन विभागाने या परिपत्रकात दिली आहे. तरीही अनेक ठिकाणी अर्धा तास उलटून गेला तरी या सरकारी बाबूंचा 'लंच टाईम' आटपत नसल्याचा अनुभव नागरिकांना येत असतो. राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी, कर्मचारी वर्गाकरिता कार्यालयीन वेळेत भोजनासाठी दुपारी एक ते दोन या दरम्यान जास्तीत जास्त अर्ध्या तासाची वेळ असावी. भोजनासाठी अधिकारी, कर्मचारी अधिक वेळ घेणार नाहीत. तसेच एकाच शाखेतील सर्व अधिकारी, कर्मचारी एकाच वेळी भोजनासाठी जाणार नाहीत. याबाबत कार्यालय प्रमुखांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. असे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्धीस दिल्यानंतरही जनतेच्या समान व सन्मानपूर्वक वागणुकीच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. काही शासकीय कार्यालयात कोणते तरी निमित्त शोधून 'सेलिब्रेशन' केले जाते. एखाद्या अधिकारी-कर्मचाऱ्याची पदोन्नती, बदली किंवा निवृत्ती असल्याचा खास भोजनाचा बेत असतो. यावेळी सर्वच टेबले रिकामी असतात. कामे घेऊन आलेल्या ग्रामस्थांना त्यांचे 'सेलिब्रेशन' पाहात ताटकळत बसावे लागते. अशा सेलिब्रेशसाठीदेखील जास्तीत जास्त अर्ध्या तासाची मर्यादा असावी किंवा कार्यालयाच्या वेळेत अशी सेलिब्रेशन नकोत अशी अपेक्षाही त्या वेळी नागरिकांकडून व्यक्त होत होती. त्या परिपत्रकानुसार विविध शासकीय कार्यालयांतील अधिकारी, कर्मचारी यांनी भोजनासाठी नियोजन करून भोजनाच्या वेळेतदेखील कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे वादाचे प्रसंग कमी होतील. शिवाय सर्वसामान्य जनतेची कामे मार्गी लावण्यास मदतच होईल. यातून राज्य शासनाची प्रतिमा निश्चितच उंचावेल, असेही मत व्यक्त होत होते. लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक देण्यासंबंधात राज्य शासनाने जारी केलेल्या नव्या, नवव्या परिपत्रकानंतर, जुन्या अपेक्षांना पुन्हा उजाळा मिळणार आहे यात शंका नाही. समानतेचे सूत्र अंमलात आणावयाचे असेल, तर अशा अनेक जुन्या, नव्या परिपत्रकांचे पठन सरकारी स्तरावर व्हावयास हरकत नाही.

सरकारी कार्यालयीन कामकाजात शिस्त आणण्यासाठी प्रशासकीय स्तरावर सुरू झालेल्या काही प्रयत्नांची दखल घ्यावीच लागेल. लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक मिळावी या अपेक्षेचा नव्या परिपत्रकाने केलेला पुनरुच्चार हा त्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. राज्याच्या मंत्री किंवा राज्यमंत्र्यांकडून विधिमंडळ अधिवेशनात दिल्या जाणाऱ्या आश्वासनांची पूर्तता वेळेवर का होत नाही, यावरही अशाच प्रयत्नांमधून प्रकाश पडला आहे. अशा आश्वासनांची वेळेत पूर्तता करण्याची वैधानिक जबाबदारी संबंधित विभागाची असते. या आश्वासनांची ९० दिवसांच्या कालावधीत पूर्तता करणे संबंधित विभागावर बंधनकारकही असते. मात्र, ही आश्वासने पूर्ततेच्या प्रक्रियेतील घोळामध्ये अडकल्याने विहित वेळात पूर्ण होतच नाहीत, ही बाबही आता स्पष्ट झाली आहे. अशी आश्वासने कोणी हाताळावीत या वादामुळे ती अनिर्णीतच राहतात असे विधिमंडळाच्या आश्वासन समितीच्या बैठकीत उघड झाले. एवढेच नव्हे, तर या आश्वासनांसंदर्भातील आवश्यक पाठपुरावा करण्यात संबंधित विभाग उदासीनच असतो, हेही स्पष्ट झाले. या उदासीनतेमुळेच अनेक आश्वासने दीर्घकाळ प्रलंबितही राहिल्याने आता आश्वासने निकाली काढण्यासाठी प्रत्येक विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक मिळावी, सरकारने जनतेला दिलेल्या आश्वासनांची वेळेत पूर्तता व्हावी हे समानतेच्या किमान अपेक्षांचेच एक सरकारी रूप आहे. त्यासाठी सरकारी स्तरावर आदेश जारी करावे लागतात व समानतेच्या वर्तणुकीचे संस्कार घडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो, ही बाबही सातत्याने स्पष्ट होत गेली आहे. सरकारी कर्मचारी व समाज यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी आता जोमाने काम करण्याखेरीज पर्याय नाही. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतरच्या पहिल्याच जाहीर भाषणात नरेंद्र मोदी यांनी सरकारी कर्मचाऱ्यांस एक सज्जड इशारा जाहीरपणे दिला होता. 'परफॉर्म ऑर पेरिश' या त्यांच्या इशाऱ्याचा विसर पडू नये, अशीच सामान्यांची अपेक्षा आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### शिक्षक पात्रता परीक्षा : एक चिंतन

शिक्षक पात्रता परीक्षा या अनुषंगाने बऱ्याच बातम्या प्रसिद्ध होत आहेत. अशा पवित्र पदाची पात्रता परीक्षा घेण्याचे ऐकूनच आश्चर्य वाटले. सध्या आपण ज्या देशात राहतो त्याला पूर्वी आणि आताही जम्बोद्वीप म्हणतात. अनादिकाळापासून या सनातन भूमीमध्ये हीच शिक्षक मंडळी गुरू, मास्तर, भाऊसाहेब, सर, प्रोफेसर या विविध नावांनी होती आणि ज्ञानदानाचे कर्तव्य पार पाडीत होती. त्या काळात कुठे शिक्षक पात्रता परीक्षा झाल्याचे निदान माझ्या वाचनात नाही. याही काळात ज्ञानदानाचे काम शिक्षकच करीत आहेत; पुढेही त्यांनाच करावयाचे आहे. स्वातंत्र्योत्तर काळात डोकावून पाहिल्यास कधी पात्रता परीक्षा घेण्याचा विचारसुद्धा आला नाही. मग आताच ही पाळी का आली? कुठलीही नोकरी-व्यवसाय उदरभरणासाठी असतो. मात्र कौशल्य असल्याशिवाय या जगात अर्थार्जन शक्य नाही. पूर्वीच्या काळात ऋषिमुनींच्या आश्रमात विद्यार्थी ज्ञान ग्रहण करण्यासाठी जात. अगदी आताच्या काळातील बोलायचे झाले तर गणितज्ञ रामानुजन झालेत, जयंत विष्णू नारळीकर झाले. या उलट गेल्या ३०-४० वर्षांतील आपल्याकडील शैक्षणिक दर्जा अवमूल्यित झाला. चौथा वर्ग पास झालेली (की केलेली) मंडळी विद्यार्थी मंडळी साधं सोपे मराठी वाचू शकत नाही. १०० रुपयाचा जमा-खर्च अचूक करू शकत नाही. क्रमित विषयापलीकडे काही विषय आणि ज्ञान आहे. याची त्यांना सुतराम कल्पना नाही. प्राथमिक स्तर, माध्यमिक स्तर, उच्च माध्यमिक स्तर सर्वच ठिकाणी कमीत कमी अपेक्षासुद्धा हा विद्यार्थी पूर्ण करू शकत नाही. अवती-भोवती घडणाऱ्या नैसर्गिक गोष्टी यांना माहिती नाही. यासाठी पाल्य जबाबदार असेलही, पण शिक्षण क्षेत्र जबाबदारी नाकारू शकत नाही. शिक्षण विभागाचा एकूण कारभार समजा १०० टक्के आहे तर ८० टक्के शिक्षक त्या कारभारात भागीदार आहेत.

सर्वसाधारण शाळांमधून शासनाचे शालान्त उच्च शालान्त परीक्षेत सन्माननीय अपवाद वगळता गुणवत्ता यादीत आपली मुले अत्यल्प असतात; याला कारणीभूत कोण? प्रशासनाचे दोष हे काही प्रमाणात असतीलही तरी प्रामुख्याने शिक्षकांवर ही जबाबदारी जास्त आहे आणि ती त्यांनी पार पाडावी व ती कृती दिसावी अशी अपेक्षा करणे म्हणजेच आपली पात्रता तपासणे हे शासनापेक्षा तुम्हा शिक्षकांनाच वाटले पाहिजे. माझ्या वर्गातील दरवर्षी किमान १० मुले गुणवत्ता यादीत आलीच पाहिजे, ही धारणा पाहिजे, पोटतिडीक पाहिजे, याकडे पाहिले तर हे अशक्य नाही. उच्च शालान्त परीक्षेनंतर अतिउच्च शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या आयआयटी प्रवेश परीक्षेत सुमारे ४-५ लाख विद्यार्थी बसतात. त्यात अतिशय कमी विद्यार्थी ९३ टक्क्यांच्या कटऑफ प्राप्त करून घेतात, हे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणजे एक टक्का सुद्धा नाही, ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे. ते आतापर्यंत पास झाले (की केले) याचे मूलभूत कन्सेप्ट स्पष्ट नसतात आणि हे मूलभूत कन्सेप्ट स्पष्ट करणे हेच १ ते ८ पर्यंत शिकविणाऱ्या गुरुवृंदांचं काम आहे. म्हणून शिक्षक पात्रता परीक्षा देणे गरजेचे आहे व तुम्हीसुद्धा त्याला आनंदाने स्वीकारावं, ही अपेक्षा आहे. या अगोदर झालेल्या परीक्षेत शासनाने प्रसिद्ध केलेला निकाल लाजिरवाणा होता. सुमारे ९६ ते ९८ टक्के शिक्षक नापास झाले. अशा शिक्षकांकडून अपेक्षित दर्जाचे विद्यार्थी कसे बाहेर पडतील, हे न सुटणारं कोडं आहे.

**प्रमोद कराडे**/८३०८६६३९४०

### आजची, उद्याची गोष्ट

आधी आजची गोष्ट.नवरा-बायको दोघे मिळून चांगले तीस/चाळीस लाखांचा वर्षाचे पॅकेज मिळवतात. सकाळी लवकरच नोकरीस जातात. रात्री उशिरा परत घरी येतात. सगळा दिवस काम केल्याने रात्री थकून, चिडून येतात आणि त्यामुळे कौटुंबिक नात्यांपासून दूर राहतात. एकएकटे राहून फक्त करीअर घडवतात. कोणी काही मदत/पैसे/वेळ मागू नये म्हणून तोंड लपवतात. गर्दीत असूनही एकटेच राहतात. मोठ्या पगाराची नोकरी सोडू शकत नाहीत कारण हजारो रुपयांचे कर्जाचे हफ्ते असतात. स्वतःच्या लेकराला वाढवू शकत नाहीत. फुल- टाईम मेड एजन्सीतून आणतात. त्याच्याच हवाली लेकरू सोडतात.

कुटुंबातील कोणीच मुलाला ठावूक नसतं. फक्त 'आया आंटी'लाच तो ओळखतो. आजोबा-आजी, मामा-मावशी कोण असतात? अनोळखी आहे सगळ्यांपासून! कुणाला मानत नाही. आयाच आंघोळ घालते, आयाच जेवू घालते. टिफिनसुद्धा रोज तीच तयार करते. युनिफॉर्म घालून स्कूल- कॅबमध्ये बसवते. सुट्टी झाल्यावर त्याच कॅबमधून परत आणते. झोप येते तेव्हा आयाच अंगावर घेते. जशी येईल तशी लोरी म्हणते. त्याला झोपवताना तीही झोपी जाते. कधी त्रासला की टीव्ही दाखवते नाहीतर मोबाईल खेळ म्हणते. मॅडम जे शिकवतात तेच तो मानतो. देशी खाणं सोडून पिझ्झा- बर्गर खातो. वीकेंडला मॉलमध्ये पिकनिक करतो. संडेची सुट्टी त्यांचा मूड असेल तर मॉम-डॅडसोबत घालवतो.

आता उद्याची गोष्ट. काळ थांबत नाही, वेगाने निघून जातो. तो शाळेतून कॉलेजात पोहोचतो. कॉन्व्हेंटमध्ये शिकल्यामुळे भारत आवडत नाही. पुढील शिक्षणासाठी विदेशात जातो. नवे मित्र करतो, नवी व्यसने जोडतो, त्यांच्यात रमतो. आई- बाबांच्या पैशांवर खर्च भागवतो. हळूहळू तिथल्या संस्कृतीत रंगतो. मॉम-डॅडसोबतचं नातं पैशापुरतं राहतं.काही दिवसांतच काम मिळतं. लग्न करतो आणि तिथेच स्थायिक होतो.आई-वडिलांच्याच मार्गांवर तोही चालतो. त्याच्या डोक्यातही फक्त करीअर राहतं. वृद्धापकाळी आई-वडील एकटे पडतात, जसा तो लहानपणी पडला असतो.

ज्यांची उपेक्षा केली त्यांच्याच हे आता नजरा चुकवतात. ''कशाला इतकं कमावलं'' असं म्हणत खंतावतात. घुसमटून जगतात, स्वतःलाच लाजतात. हातपाय सैल होतात, चालता येत नाही, दात गळतात, जाडजूड चष्मे लागतात. कंबर वाकते, कान बहिरे होतात. हे भारतात वृद्धाश्रमात दाखल होतात, नाही तर पोरांनी एजन्सीकडून आणलेल्या नर्ससोबत जगत जगत मरतात. कारण मुलगा लंडनला, मुलगी न्यू यॉर्कला! ब्राईट मुलांमुळे झालं म्हातारपण डार्क! मुलगा मुलगी डॉलर्समध्ये अडकले, साता समुद्रापार चिता पेटवायला वडिलांचे शेजारी गेले. मुलगा-मुलगी ऑनलाईनवर आले. सारे अंत्यविधी छान पार पडले. मेल्यावर आईबाबांचे खूप लाड झाले, कारण शेवटचे विधी इव्हेंटवाल्यानी केले. जग लहान झालं, पण नाती झाली दूर, बाबा- आईच्या डोळ्यांत दाटतं खारं पाणी! काशीच्या घाटाऐवजी सिडनी झाली अंतिम कहाणी.

**रवी वाघमारे**/नागपूर

### व्यक्तिमत्त्व विकासाकरिता मार्गदर्शक गीता

हल्ली रोजच्या जीवनात, ताणतणाव म्हणजे टेन्शन, स्ट्रेस हे शब्द नित्यनेमाने ऐकायला मिळतात. स्ट्रेस, टेन्शन म्हणजे ताणतणाव हा आता रोजचाच जीवनाचा भाग झालाय.''पूर्वीच्या वेळेस काम होतं पण आम्हाला एवढा स्ट्रेस आला नाही'' हे जुन्या पिढीकडून सतत बोलले जाणारे वाक्य आहे. खरंच त्यात तथ्यही आहे. तेव्हाही काम होतं, वर्क लोड होतं, जबाबदार होत्या. पण तेव्हा आजच्यासारखं स्टेटस, इम्प्रेशन, दिखावा, स्टाईल या शब्दासाठी चढाओढ होत नव्हती. आज पैसा, सुखसोयी आहेत. जग खूप जवळ आले



आहे. त्याचबरोबर तणाव, स्ट्रेस, टेन्शन हे देखील तितकेच जवळ आलेले आहे. आज या तणावमुक्तीसाठी मानव अनेक उपाययोजनाही शोधत आहे. मानवाने मनोरंजनाची अनेक साधने निर्माण केलेली आहे. पण माणूस खरंच या उपायाने तणावमुक्त होतो का? यातून त्याला तात्पुरती तणावमुक्ती मिळते पण जबाबदाऱ्या, वर्क लोड या गोष्टी त्याला ताणतणाव देतातच. यासाठी आपल्याला आपली जीवनपद्धती बदलावी लागेल. पण रोजचं रुटीन जे आता आपल्या जीवनाचा एक भाग झाले आहे, ते आपण तडकाफडकी सोडू शकत नाही. हेही खरे. मग जीवन कसे जगावे? रोजचं रुटीन न बदलता आपल्या जीवनात काय सकारात्मक बदल करावे? म्हणजे तणावमुक्त आयुष्य आपण जगू शकतो? यासाठी प्रत्येकालाच आज योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे.

आजचे रोजचे जीवन जगत असताना ताणतणावमुक्त राहून आपण कसे आनंदी, टेन्शन फ्री राहू यासाठी एक सुलभ मार्ग आपल्याला बघायला मिळतो तो गीतेत. खरं तर गीता हा धार्मिक ग्रंथ मानला जातो. त्यात आपल्या स्वधर्माविषयी ज्ञान आहेच त्याचबरोबर ताणतणावमुक्त जीवन जगण्यासाठी मदत करणारी मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे कृष्ण भावना भावित कार्य याची माहिती आहे. यातील काही तत्त्वे भौतिक जीवनात तणावमुक्तीसाठी उपयुक्त आहेत.

कृष्ण भावना भावित पद्धतच मुळी भौतिक परिस्थितीतून (ताणतणाव, स्ट्रेस, स्पर्धा, चढाओढ) मुक्तता देणारी जीवन पद्धती होय. संयम, पेशन्स शिकवणारी होय. संयमाची शिकवण आपल्याला यातूनच मिळते. खाणे-पिणे, जंक फूड, अनियमित जीवनशैली, मद्यपान, मांसाहार यातून अनेक रोगांना माणूस बळी पडतो हे विज्ञानाने सिद्ध केले आहे. त्याच्या उपायांसाठी चिंता, काळजी, दवाखान्याचे बिल भरण्यासाठी लागणारा पैसा त्यासाठी पुन्हा स्ट्रेस.

आपल्या आई-वडिलांचं, थोरा मोठ्यांचं ऐकण्याची विचारपद्धती असायला हवी. कृष्ण भावना भावित कार्येत गुरू-शिष्य या परंपरेला खूप महत्त्व दिले आहे. तणाव वाढण्याचं प्रमुख कारण म्हणजे मनुष्य भौतिक सुखाच्या मागे जास्त लागलाय. त्याला सर्वस्व मानून बसला आहे आणि ते जर मिळालं नाही तर त्याला तणाव, नैराश्य याला समोर जावे लागत आहे. कुठेही कठोर तप नाही, यज्ञ नाही, साधना नाही तर केवळ एक साधी सरळ जीवनशैली तुमचं आयुष्य बदलू शकते. जे काय आयुष्यात वाईट चांगलं होते ते सर्व कृष्णा अर्पण करून जगणं म्हणजे खऱ्या अर्थाने तणावमुक्ती होय.जे काही झालं ती त्याची इच्छा आहे असं समजून 'पुढे चला' असे म्हणणे आवश्यक आहे.

कृष्ण भावना भावित मार्गदर्शक तत्त्वावर चालून मनुष्याचा आत्मविकास, व्यक्तिमत्त्व विकास होतोच शिवाय त्याला ताणतणावातून मुक्तीही मिळते. शिवाय तो आपल्या पाठीशी आहे ही अमूल्य भावना मनुष्याच्या मनाला आधार देते. म्हणजे कृष्णभावनेचे ज्ञान देणारी गीता हा केवळ पौराणिक किंवा धार्मिक ग्रंथ नव्हे तर आजच्या युगासाठी ती व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असणारी मार्गदर्शिका आहे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

### नक्षलवादाला घरघर, विकासाला नवजीवन

पायाभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव आणि तीव्र सामाजिक असमानता या दुविधांमध्ये फसलेल्या आदिवासी गावकऱ्यांवर नक्षलवाद्यांनी प्रभाव मिळवला. नक्षल्यांच्या दहशतीमुळे प्रत्येक घरातील एकाला नक्षलवादी चळवळीमधे सामील व्हावे लागे. नक्षलवादी चळवळीचा कणा असलेल्या बसवराजूने १५० सैनिकांची हत्या करून माओवाद्यांची सशस्त्र शाखा असलेल्या ''पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी''ला बळकटी देण्याचे काम केले. सरकारने त्याच्यावर १ कोटी रु.चे बक्षीस घोषित केले होते. छत्तीसगढ हे वेगळे राज्य झाल्यावर बाहेरील सर्वसामान्य लोकांवर तेथे जाण्याची जी बंदी होती ती उठविण्यात आली परंतु तोपर्यंत नक्षलवादाची पाळेमुळे खूप खोलवर रुजली आणि सर्वदूर विखुरली होती.

छत्तीसगड येथील बस्तर येथे सुरक्षा दलांनी 'ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट' अंतर्गत २७ माओवाद्यांना घेराव घालून ठार केले तर ५४ माओवाद्यांना अटक केली. या कारवाईत बसवराजूचाही खात्मा झाला. पोलिसांनी असाही दावा केला की या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांत ७००हून अधिक माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले. सरकारच्या मते देशभरातील माओवादग्रस्त जिल्ह्यांची संख्या एप्रिल २०१८ मध्ये १२६ वरून ९०वर आली तर एप्रिल २०२४मधे ही संख्या फक्त ३८वर आली. गेल्या आठवड्यात सुमारे ४०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सामील होण्याची तयारी केली. महाराष्ट्रात ६१ नक्षल्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण केले.

मुख्यमंत्र्यांनी ३ महिन्यांपूर्वी अनेक विकास योजनांचा शिलान्यास आणि उद्घाटन केले. गडचिरोलीला भारतातील पहिले स्टील हब बनवण्याची राज्य सरकारची महत्त्वाकांक्षा आहे. यासाठी ३ लाख कोटी रु. गुंतविले जाणार आहेत. यामुळे स्थानिक १ लाख युवकांना रोजगार मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड'चे अध्यक्ष प्रभाकरन् यांची भेट घेऊन आत्मसमर्पण करणाऱ्या माओवाद्यांना प्रशिक्षण देऊन रोजगार देण्याचे आवाहन केले. त्याला प्रभाकरन् यांनी सहमती दर्शवली. फेब्रुवारी २०२५ मध्ये जेएसडब्ल्यू स्टीलने २५ मिलियन टन प्रतिवर्ष क्षमतेचा एक स्टील प्लांट गडचिरोलीमध्ये स्थापण्यासाठी १ लाख कोटी रु. गुंतविण्याची घोषणा केली आहे.

गडचिरोली प्रशासनाने जिल्ह्याच्या २५ किलोमीटरच्या खनन क्षेत्रात सार्वजनिक सुविधा वाढविण्यासाठी १५० कोटी रु. च्या योजनांचे अनावरण केले आहे. आदिवासी आणि मागास वर्गातील लोकांसाठी विविध सामाजिक सुरक्षा योजना लागू करण्यात आल्या आहेत. गडचिरोलीमध्ये रस्त्यांची स्थिती सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात काम सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी राज्य सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत. यामुळे येथील वाहतूक सोपी झाली. त्यामुळे शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगाराच्या संधींमध्ये सुधारणा झाली. आरोग्यसेवा आदिवासींसाठी फार आवश्यक आहेत. महायुती सरकारने येथील ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांचा विस्तार केला. जिल्ह्यातील शिक्षणाची पातळी सुधारण्यासाठी विविध शाळा आणि महाविद्यालये उभारण्यात आली.

कृषी क्षेत्राच्या विकासासाठी गडचिरोलीतील शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्यात सिंचन सुविधा, बोंडअळी नियंत्रण आणि कृषी विषयक प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. तसेच गडचिरोलीतील पाणी पुरवठ्याचे जाळे मजबूत करण्यासाठी जलसंधारणाचे कार्य सुरू करण्यात आले. गडचिरोलीतील जंगल, निसर्ग संपदा यामुळे येथे पर्यटनाचा पर्यायही उपलब्ध होऊ शकतो हे लक्षात घेऊन जल, जंगल, जमीन वाचवूनच येथे औद्योगिक विकास साधला जाईल याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. गेल्या ४ वर्षांपासून येथील एकही युवक नक्षल चळवळीत सामील झाला नाही. यावरून त्यांचा शासनावर आणि शासनाच्या विकास कामांवर विश्वास असल्याचे दिसून येते.

**कल्पना माहूरकर**/८४५९२७८७८९

### वंदे मातरम् कोट्यवधी लोकांसाठी प्रेरणास्रोत

वंदे मातरम् हा शब्द उच्चारताच प्रत्येक व्यक्तीच्या मनात उस्फूर्तपणे देशभक्तीची भावना प्रकट होते.अन् प्रत्येक भारतीय आणि सच्चा देशभक्त नतमस्तक होतो. वंदे मातरम् म्हणत म्हणत मदनलाल धिंग्रा, खुदीराम बोस यासारखे अनेक क्रांतिकारकांनी देशासाठी स्वतःचे बलिदान दिले. क्रांतिकारक भगतसिंग हे तर नियमितपणे लेखन करणाऱ्या पत्राची सुरुवातच वंदे मातरम् या शब्दाने करीत असत. रवींद्रनाथ टागोर, पं. पलुस्कर, दक्षिणरंजन सेन, दिलीप कुमार राय, पं ओंकार नाथ ठाकूर, केशवराव भोळे, विष्णुपंत पागनीस, हेमंतकुमार, एम. एस. सुब्बा लक्ष्मी, लता मंगेशकर यांनी तर वंदे मातरम् हे गीत वेगवेगळ्या रागात गाऊन या गीताला समृद्ध केले.

बंगालचे सुप्रसिद्ध साहित्यिक बंकिमचंद्र चट्टोपाध्याय (चटर्जी) यांनी वंदे मातरम् हे गीत ७ नोव्हेंबर १८७५ रोजी लिहिले. पाच कडव्यात हे गीत लिहिले गेले. सुरुवातीला या गीताचे पहिले दोन कडवे संस्कृत भाषेत होते तर उर्वरित कडवे बांगला भाषेत होते. बंकिमचंद्र यांनी १८७५ मध्ये लिहिलेले हे गीत १८८२ मध्ये सर्वप्रथम 'आनंदमठ' या प्रसिद्ध कादंबरीत प्रकाशित करण्यात आले. तर सर्वप्रथम १८९६ मध्ये रवींद्रनाथ टागोर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात गायिले. या वंदे मातरम् गीताचा इंग्रजी अनुवाद श्री अरविंद घोष यांनी केला. १९०५ मध्ये आयोजित काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत वंदे मातरम् या गीताला राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला.

वंदे मातरम् हे गीत देशातील हिंदू लोकांना एकत्र आणण्याचे काम करत आहे. या नजरेने पाहत १९२३ मधील काकीनाडा येथे आयोजित काँग्रेस अधिवेशनात तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष मौलाना अहमद अली यांनी प्रखर विरोध केला. प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. विष्णू दिगंबर पलुस्कर हे या अधिवेशनात वंदे मातरम् म्हणत असताना त्यांना मौलाना अहमद अली यांनी मध्येच टोकण्याचा प्रयत्न केला. परंतु पं. पलुस्कर हे खरे राष्ट्रभक्त असल्याने त्यांनी या गीताचा अपमान होण्यापासून वाचवले. पं. पलुस्कर हे वंदे मातरम् पूर्ण झाल्यावरच थांबले.

वंदे मातरम् या गीताला सुरुवातीपासूनच काही व्यक्तींचा विरोध होता. घटनातज्ज्ञ नूराणी यांनी तर फ्रंट लाईन पत्रिका या साप्ताहिकातील एका लेखात वंदे मातरम् म्हणायला सक्ती करण्याच्या विरोधात आपले मत व्यक्त केले. वंदे मातरम् गीताला धार्मिक भावना जुळल्या असल्याने बंकिमचंद्र हे मुस्लिम विरोधी असल्याचे म्हटले. इतकेच नव्हे एम. आर. ए. बेग यांनी एका विश्लेषणात फक्त हे गीतच मुस्लिम विरोधी नाही तर 'आनंदमठ' ही बंगाली कादंबरी मुस्लिम विरोधी आहे असे म्हटले होते. अब्दुल कुदूस रूमी यांनी तर एक फतवा प्रसिद्ध करीत त्यामध्ये, वंदे मातरम् जे मुस्लिम म्हणतील ते नरकात जातील असे म्हटले.

वर्तमानकाळात सुद्धा वंदे मातरम् या गीताला विरोध करणारे लोक आहेत. जे एका विशिष्ट धर्माचे आहेत. त्यांची संख्या कमी असली तरी प्रसारमाध्यमे त्यांच्या विरोधाला सतत प्रसिद्धी देऊन समाजमन भडकवण्याचा त्यांच्याकडून प्रयत्न केला जात आहे. या देशात असेही असंख्य अल्पसंख्यक नागरिक आहेत की त्यांची वंदे मातरम् गीतावर श्रद्धा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आयोजित प्रत्येक अधिवेशनाची सुरुवात वंदे मातरम् या गीतानेच झालेली असल्याचे लक्षात येते. जगातील कोणत्याही देशाच्या राष्ट्रगीतावर 'ते धार्मिकतेवर आधारित आहे' असे म्हणून टीका करता येईल पण वंदे मातरम् हे गीत त्यापेक्षा वेगळे आहे. हे गीत राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाची नेहमीच आठवण देत असते. हे गीत ब्रिटिश सरकारच्या विरोधातील प्रतीक बनले होते. आजही वर्तमान काळात या गीताला जे लोक विरोध करतात त्यांना त्यांची जागा दाखवून आपली देशभक्तीची ज्योत सतत प्रज्वलित राहील हा संदेश पोहोचविणे गरजेचे आहे. तसेच राजकारणाच्या चष्म्यातून पाहत फक्त मतांसाठी, विरोधासाठी विरोध करणाऱ्यांना जनतेने आपला अधिकार बजावत राष्ट्रीयत्वाची जाणीव करून देणे ही आज काळाची गरज बनली आहे.

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४५७०५२
केंद्रीय कार्याध्यक्ष ग्रंथालय भारती

## आजचे संघगीत-९१

रविवार, २३ नोव्हेंबर २०२५

### घुमवित दुंदुभी तुतारिचा ललकार

घुमवित दुंदुभी तुतारिचा ललकार
हा विराट पुरुषा, तुझाच जयजयकार ॥धृ.॥

कोटि कोटि तव स्फुल्लिंगांतुनि शिवशक्तीचा प्रत्यय येउनि
संस्कृतिचा गंगौघ निर्मुनी हा घडे समष्टीजीवन साक्षात्कार ॥१॥

ध्वज भगवा सद्गुरू सनातन फडकत गगनी राहि चिरंतन
केले ज्यांनी जीवन अर्पण हा उठे तयांचा भूमीतूनि पुकार ॥२॥

छातिस भिडली छाती जेथे धूळ चारली शत्रूस इथे
भूमिरक्षणीं पडले जेथे हा तेथुन उठला अंतरिचा हुंकार ॥३॥

अंतःकरणी तेच प्रतिध्वनी तोच एक स्वर उठवू गगनी
होउ सिद्ध या विजयदिनी हा रणचंडीचा रुद्ररूप अवतार ॥४॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला उद्यापासून

## विश्वशांती केंद्र, माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठातर्फे आयोजन

**पुणे, दि.२२ नोव्हेंबर -**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि संतश्री ज्ञानेश्वर-संतश्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने युनेस्को अध्यासना अंतर्गत सोमवार, दि. २४ नोव्हेंबर ते रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ३०वी तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर-तुकाराम स्मृती व्याख्यानमाला एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या संतश्री ज्ञानेश्वर सभागृह, कोथरूड, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ही व्याख्यानमाला सर्वांसाठी खुली ठेवण्यात आली आहे. अशी माहिती एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण, प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी, व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. मिलिंद पात्रे व संचालक डॉ. महेश थोरवे उपस्थित होते. या व्याख्यानमालेचे उद्घाटन सोमवार, दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं ४.०० वा. होईल. या समारंभासाठी स्पेस ॲप्लिकेशन सेंटर इस्त्रोचे माजी संचालक पद्मश्री डॉ.प्रमोद काळे व नवी दिल्ली येथील प्रसिद्ध लेखक, संशोधक आणि




आध्यात्मिक शास्त्रज्ञ डॉ. सी.के.भारद्वाज हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासनाचे प्रमुख विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड असतील. तसेच एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल वि. कराड हे उपस्थित राहणार आहेत. व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वा. होईल. प्रसिद्ध लेखक व ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री.विश्वास पाटील हे प्रमुख पाहुणे असतील. तसेच एमकेसीएलचे मुख्य मार्गदर्शक डॉ. विवेक सावंत हे अध्यक्षस्थान भूषवतील. २५ ते २९ नोव्हेंबर या कालावधीत सायं. ४.०० वा. होणार्या व्याख्यानमालेत वैश्विक स्तरावरील किमया आश्रमचे स्वामी कृष्णा चैतन्य (आधुनिक जीवन पद्धती आणि अध्यात्म), इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू (मेडिसीन २५, पारंपारिक ज्ञानातील मुळे आणि शांतता), पुणे येथील डीआरडीओचे माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर (संरक्षण तंत्रज्ञानातील आत्मनिर्भरता हे विश्वगुरू भारताच्या दिशेने एक पाऊल), ओरिजिनोट वेलनेस चे सीईओ केशव वेल्हाळ (ओम टू क्वांटम कॉम्प्युटिंग-ए पाथवे फॉर वर्ल्ड पीस) आणि सनदी अधिकारी व महाराष्ट्र राज्याचे उपलोकायुक्त डॉ. संजय भाटिया (जनसेवेत विश्वशांती)अशा मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत.

या व्याख्यानमालेला जोडूनच सकाळी ८.४५ ते १२.०० पर्यंत कार्यशाळा होणार आहे. यामध्ये सुप्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये, किंकर विठ्ठल रामानूज व किंकर विश्र्वेशरै आनंदा, एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे सह. अधिष्ठाता डॉ.बी.एस.नागोबा, यशदा पुणेचे संचालक रंगनाथ नाईकडे, फिल्म निर्माता व अभिनेता मुकेश खन्ना, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिच्या एलटीसीचे संचालक सुनील लोढा व दिपाली लोढा, वरिष्ठ अभियंता विष्णू भिसे, सुप्रसिद्ध गीतकार समिर अंजान, अलिगढ मुस्लिम विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रभारी डॉ. ताहेर एच. पठाण, परमपूज्य स्वामी सवितानंद, प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस.एन.पठाण हे विविध विषयांवर विचार मांडतील.

प्रत्येक व्याख्यानानंतर वक्ता व श्रोते यांच्यामधील प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम या व्याख्यानमालांचे वैशिष्ट्य आहे. विशेष म्हणजे या मध्ये २५ ते २९ नोव्हेंबर पर्यंत माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठ संकुलातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांसाठी स. ७.०० ते ८.०० या वेळात योगासन वर्गाचे आयोजन क्रीडा विभागाचे संचालक अभय वाघ व योगगुरु श्री. अनंत कोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे.

'विज्ञान व अध्यात्माच्या समन्वयातूनच जगामध्ये शांतता नांदेल', हे स्वामी विवेकानंदांचे वचन व तत्त्वज्ञ संतश्री ज्ञानेश्वर माऊली व जगद्गुरु संतश्री तुकाराम महाराज यांच्या ज्ञानेश्वरी व गाथेतील ज्ञान-विज्ञानाधिष्ठित तत्त्वदर्शन हा या व्याख्यानमालेचा मुख्य हेतू आहे.

या व्याख्यानमालेसाठी शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, तसेच साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवरांना निमंत्रित केले असून, मानवी आणि आध्यात्मिक मूल्यांचे या व्याख्यानमालेद्वारे संवर्धन व्हावे, हा या व्याख्यानमालेमागील प्रमुख उद्देश आहे. ही व्याख्यानमाला विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या प्रेरणेने तसेच, माईर्स एमआयटीचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल वि. कराड यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत आहे.

## महत्वाचे...

### चौथ्या दिवशीही सराफांची चौकशी सुरूच

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

आयकर विभागाकडून चौथ्या दिवशी सराफांची दुकानं तपासणीचे काम सुरु होते. शनिवारी दुपारून आपटे ज्वेलर्स ग्राहकांसाठी खुल्ले केल्याचे दिसून आले. अपाटे ज्वेलर्स मध्ये ग्राहकांची गर्दी असली तरीही दुकानामध्ये आयकर विभागाचे अधिकारी त्याचे काम करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले. मधला मारूती परिसर व सात रस्ता येथील आपटे ज्वेलर्स ची पाहणी केली असता ग्राहकांची रेलचेल होती. आयकर विभागाकडून बुधवारी शहरातील सराफांसह, वकील, बांधकाम व्यवसायिक यांच्यावर छापा टाकला. आयकर विभागाच्या हाती १५० कोटी घबाड हातील लागल्याची माहिती समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. चार दिवसाच्या कालावधी आयकर विभागाने अनेक कागदपत्रे ताब्यात घेतलेली आहेत. मात्र शनिवारी दुपारी मात्र अपाटे ज्वेलर्स ग्राहकांसाठी खुल्ले केलेले होते. मात्र नारायणपेठेकर ज्वेलर्स मध्ये आयकर विभागाकडून तपासणीचे काम सुरुच आहे.

### मालेगावातील 'त्या' बालिकेच्या कुटुंबाला १० लाखांची मदत : मंत्री आदिती तटकरे

**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर-**



मालेगावमधील डोंगराळे येथील बालिकेवरील अत्याचार आणि निर्घृण हत्येची घटना अत्यंत गंभीर, संतापजनक व मानवतेला काळिमा फासणारी आहे. पीडित कुटुंबावरील मानसिक, सामाजिक व भावनिक हानी अपरिमित असून, त्यांना तात्काळ आधारसाठी मनोधैर्य योजनेतून १० लाख तात्काळ मदत मंजूर करण्यात आली आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. या प्रकारच्या गुन्ह्यांमुळे पीडित कुटुंबावर ओढवणारी वेदना आणि मानसिक आघात अमाप असतो. मंजूर मदत ही केवळ तत्काळ दिलासा देणारी असून वास्तविक झालेली हानी कोणत्याही आर्थिक सहाय्याने भरून न येणारी आहे. तथापि, या कठीण प्रसंगी शासन त्यांच्यासोबत ठामपणे उभे आहे, असे मंत्री तटकरे यांनी नमूद केले.यापुढील काळात या प्रकरणाच्या तपास प्रक्रियेत आवश्यक समन्वय, कायदेविषयक मार्गदर्शन, पुनर्वसनासंदर्भातील सहाय्य, तसेच पीडित कुटुंबाच्या रक्षण आणि हिताविषयीच्या सर्व आवश्यक उपाययोजना करण्यासाठी विभाग पूर्णतः कटिबद्ध असून, संबंधित यंत्रणांना याबाबत सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

### चिमुकलीला श्रध्दांजली वाहत 'त्या' घटनेचा छत्रपती ब्रिगेडने केला निषेध

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

संपूर्ण महाराष्ट्राला काळीमा फासणारी मालेगाव येथील चार वर्षाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ छत्रपती ब्रिगेडच्या वतीने शिव प्रताप चौक आसरा चौक येथे तीव्र निदर्शने करून चिमुरडीला श्रद्धांजली वाहण्यात आली. चिमुरडीच्या प्रतिमेस ओवी डिंगणे या बालिकेचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी छत्रपती ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आरोपीला फाशी द्या, त्या चिमुकलीला न्याय द्या या घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला. यावेळी छत्रपती ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष श्याम कदम, अरविंद शेळके, नागेश शिंदे, सिताराम बाबर, सुलेमान पिरजादे, बबन डिंगने, रमेश भंडारे, सिद्धाराम कोरे, आकाश बनणे आदी उपस्थित होते.

# मतदार यादीतील तक्रारी आयुक्तांकडे करा : निवडणूक आयोग

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२२ नोव्हेंबर-**

महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावर करण्यात आले आहे., त्याबाबत हरकती व सूचना किंवा तक्रारी असल्यास त्या २७ नोव्हेंबर पर्यंत संबंधित महानगरपालिकेत दाखल कराव्यात, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाने शनिवारी केले.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्यांकरिता १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला आहे. त्यादिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहेत. या मूळ मतदार याद्या भारत निवडणूक आयोगाने तयार केल्या आहेत. त्यांचे प्रभागनिहाय विभाजन संबंधित महानगरपालिका स्तरावर आयुक्तांच्या देखरेखीखाली करण्यात आले आहे. त्यानुसार २० नोव्हेंबर रोजी संबंधित महानगरपालिकेच्या ठिकाणी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. त्यातील आपले नाव https://mahasecvoterlist.in/ObjectionOnClick/SearchName या संकेतस्थळावर शोधता येईल. त्यावर २७ नोव्हेंबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील.

प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदारसंघाच्या यादीप्रमाणेच मतदार याद्यांमध्ये मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करणे, नावे वगळणे अथवा नावे किंवा पत्त्यांमध्ये दुरूस्ती करणे इ. स्वरूपाची कार्यवाही केली जात नाही. मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन करताना लेखनिकांकडून होणाऱ्या चुकांसंदर्भात; तसेच मतदाराचा चुकून प्रभाग बदलणे, विधानसभेच्या यादीत नाव असूनही प्रभागाच्या यादीत नाव नसणे आदींसंदर्भातील हरकती व सूचना महानगरपालिका आयुक्तांकडे दाखल करता येतील, असेही राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

# 'त्या' आरोपीच्या पोस्टरला दगडाने ठेचत महिलांचा आक्रोश

## आरोप सिध्द झाल्यानंतर त्या आरोपीला अटक व कोर्टात न नेता तात्काळ फाशी देण्यात यावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

नाशिक येथील साडेतीन वर्षाच्या मुली बरोबर घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ सोलापुरात चार हुतात्मा पार्क चौक येथे खैरनार या आरोपीच्या पोस्टरला दगडाने ठेचून ते पोस्टर जाळत संभाजी ब्रिगेड महिला आघाडीने आक्रोश व्यक्त केला.

कौटुंबिक कारणातून यज्ञाला चॉकलेटचे आमिष दाखवून, तिला घेऊन जाऊन तिच्या चेहऱ्यावरती दगडाने ठेचून तिचा जीव घेण्यात आला. ही घटना निंदनीय आहे. देशातील आणि राज्यातील गृह खाते हे काय करतेय. येणाऱ्या काळात अशा आरोपींवरील आरोप सिद्ध झाल्यानंतर त्याला अटक करून कोर्टात घेऊन जाण्याऐवजी तात्काळ त्याला फाशी देण्यात यावी अशी मागणी महिला आघाडीच्या अध्यक्षा मीनल दास यांनी केली.



ज्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महिलांकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांना शिक्षा दिली जायची त्याच पद्धतीने या काळात देखील त्या आरोपींना शिक्षा दिली पाहिजे अन्यथा महाराष्ट्र पेटल्याशिवाय राहणार नाही.
**-संभाजी भोसले, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष**

यावेळी शेखर भोसले, वकील आघाडी गणेश कदम, बबन माने, जिल्हा उपाध्यक्ष संजीवनी सलबत्ते, शहराध्यक्ष मनीषा कोळी,पूजा कलागाते, राधा घुले, सुनंदा सूर्यवंशी, सुनिता कारंडे, गीता अंजीखाने, विद्या देशमुख, मनीषा डोंगरे, संगीता डोंगरे, सविता मिरगाळे, सिद्धावा हत्यानुर, लक्ष्मी किरंगी, सिद्धाराम सावळे आदी उपस्थित होते.

# टेम्पोला आडवून जबरदस्तीने रक्कम काढल्याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा

## न्यायालयाने सुनावली पाच दिवसाची कोठडी

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

कर्नाटक राज्यात जाणाऱ्या टेम्पोच्या आडवी कारगाडी लावून टेम्पोमधील दोघांना लाकडी दांडक्याने मारहाण करुन जबरदस्तीने खिशातील तीन हजार रुपये काढून घेतले. तसेच यूपीआय स्कॅनरवर पाच हजार रुपये ऑनलाईन पाठविण्यास भाग पाडल्या प्रकरणी सागर अशोक भोरकडे (वय २३), अविनाश कृष्णा भोरकडे (वय २३), अर्जून राजू उर्फ शेट्याप्पा माने (वय २०), तुकाराम कलाप्पा रुपटक्के (वय २१) (सर्व रा.हुलजंती), भिमाशंकर बजंत्री (वय २२ रा.करजगी), बिरुदेव देवीदास शिकतोडे (रा.हुलजंती) आदी सहा



जणाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान पोलीसांनी आरोपींना अटक करुन न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पोलीस सुत्रांच्या माहितीनुसार यातील फिर्यादी गणेश भिमाशंकर कुंभार (रा.वेळापूर) हे दि.२१ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० ते दि.२२ नोव्हेंबरच्या १२.१५ च्या दरम्यान फिर्यादी व फिर्यादीचा मित्र महेश कोळपे, निखील पिसे यांचा कामगार केतन जगदाळे आदी निखिल पिसे यांचे जनावरे फिर्यादीच्या गाडीत भाड्याने आयशर टेम्पो मध्ये भरुन ती विक्री करण्याकरिता बेंगलोर कर्नाटक मधील चिंतामणी या गावी घेवून जात असताना सोड्डी फाटा येथे निळ्या रंगाची टाटा झेड फोर व्हिलर गाडी मध्ये आरोपींनी पाठीमागून येवून टेम्पोच्या आडवी गाडी लावून थांबविली. तसेच आरोपीने महेश कोळपे, केतन जगदाळे यांना लाकडी दांडक्याने मारहाण करुन जबरदस्तीने खिशातील रोख तीन हजार रुपये काढून घेतले व युपीआय स्कॅनरवर पाच हजार रुपये ऑनलाईन पाठविण्यास भाग पाडले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पोलीसांनी आरोपींना अटक करुन मंगळवेढा न्यायालयात उभे केले असता दि.२६ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# थकबाकीमुळे हिवाळी अधिवेशनाची तयारी रखडली

## १५० कोटींच्या बिलासाठी कंत्राटदार आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २२ नोव्हेंबर -**

राज्य सरकारचे नागपूरमध्ये होणारे हिवाळी अधिवेशन पंधरवड्यावर आले असताना त्याची तयारी रखडली आहे. कंत्राटदाराची गेल्या वर्षाच्या कामाची १५० कोटीची बिले रखडल्याने त्यांनी कामावर बहिष्कार टाकला आहे.त्यामुळे ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशनावर संकट काम बंद आंदोलनाचे घोंगवले आहे.

रविभवन, आमदार निवास, हैदराबाद हाऊस, देवगिरी आदी ठिकाणी सुरू असलेली कामेप पूर्णपणे थांबवली जातील. असा इशारानागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन'चे अध्यक्ष सुबोध सरोदे यांनी दिला आहे. मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंत्यांनी थकबाकी लवकर देण्याचे आश्वासन दिले होते. पण आतापर्यंत केवळ २० कोटीची बिले दिली असून ही रक्कम वीज-पाण्याची बिले देण्यालाही पुरणार नाहीत, असे त्यांनी सांगितले. त्याबाबतसार्वजनिक बांधकाम विभागानं काढलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, इमारत देखभाल, दुरुस्तीच्या कामासाठी विभागाच्या नागपूर मंडळाकडे सुमारे १९४ कोटीचा निधी वितरित केला असून यापैकी १५१. १९ कोटी निधी गेल्या वर्षीच देण्यात आला आहे. तर नागपूरचे हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी २० कोटी आणि इमारत देखभाल, दुरुस्तीसाठी आणखी २२. ७६कोटी असे एकूण ४२. ७६ कोटी श्र निधी नागपूर विभागाला वितरित केल्याचे त्यात म्हटले आहे.

### अधिवेशनाची रखडलेली कामे

सध्या नागपूर सिव्हिल लाईन परिसरातील हैदराबाद हाऊसच्या बॅरेकचे छत पूर्णपणे उघडे आहे, रविभवनातील चार कॉटेजची नवीन छतं बांधली जात आहेत. मंत्र्यांच्या केबिनचे काम अपूर्ण आहे, तर वनविभाग चौक ते बोर्ड ऑफिस चौक रस्त्याचे कामही अर्धवट आहे. ही सर्व कामं १ डिसेंबरपर्यंत पूर्ण करायची आहेत. कामबंद झाल्यास अधिवेशनावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्र्यांना साकडे कंत्राटदारांनी विभागाचे म्हणणे खोडून काढले असून सुबोध सरोदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षीचा निधी हा नियमित देखभालीचा होता. अधिवेशनाच्या विशेष कामांचे पैसे अद्याप थकीत आहे. त्यामुळे आम्ही ही बाब मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत पोहोचवली आहे. शुक्रवारी त्याबाबत निवेदन देऊन काम बंद आंदोलनाचा इशारा दिला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# ताडोबा परिसरातील ८०० एकर जागेचे होणार पुनरुज्जीवन

## मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला 'झिरोधा'चा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई. दि. २२ नोव्हेंबर -**

विदर्भातील विविध विकास कामांबरोबरच तेथील जंगल संपदा राखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला झिरोधा कंपनी व रेन मॅटर फाऊंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य करणार आहेत.

रिवाईल्डिंग म्हणजे जंगल, गवताळ प्रदेश किंवा जलक्षेत्रात मानवी हस्तक्षेप कमीत कमी ठेवून तेथील नैसर्गिक भूभाग, वन्यजीव आणि जैवविविधतेचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करणे होय. या संकल्पनेनुसार ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकर क्षेत्राचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबविण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्या सहकार्याने झिरोधा व रेनमॅटर फाऊंडेशन ही संस्था काम करणार आहे. यासाठी सुमारे १०० कोटी रुपयांच्या झिरोधा रिवाइल्डिंग फंड हा विशेष निधी तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासंदर्भातील औपचारिक घोषणा लवकरच होणार आहे.

झिरोधा आणि 'रेनमॅटर फाऊंडेशन' या संस्थांच्या माध्यमातून पर्यावरणीय व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. रेनमॅटर फाऊंडेशनमार्फत हवामान बदल व पर्यावरणीय ऱ्हास या समस्यांवर कामे करण्यात येतात. यासाठी झिरोधा ही कंपनी आपल्या नफ्यातील १० टक्के निधी सामाजिक उत्तरदायित्व व पर्यावरणीय कामांसाठी राखीव ठेवते. या राखीव निधीतून झिरोझाने संस्थेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त १०० कोटी रुपये गुंतवणुकीचा 'झिरोधा रीवाइल्डिंग फंड' जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत देशातील पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या परिसरातील निसर्गाचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. त्यामध्ये देशात विविध ठिकाणी मोनोकल्चर वृक्षलागवडी ऐवजी जैवविविधता टिकवणाऱ्या पद्धतीने निसर्गाचा समतोल राखण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये विदर्भातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील ८०० एकरच्या प्रकल्पाचा समावेश आहे.

### लेखाशिष -:१५ वा वित्त आयोग

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म की | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गावठाण भागात श्री विठ्ठल बिरुदेव मंदिर येथे पेविंग ब्लॉक बसविणे | ९९,५२७.०० | १०० रु. | ५० रु. | ३ महिने | खुला |
| २ | गावठाण भागात सिमेंट रस्ता करणे | १,९८,२२२.०० | १०० रु. | ५० रु. | ३ महिने | खुला |
| ३ | गावठाण भागात सिमेंट रस्ता करणे | ३,११,३८६.०० | १०० रु. | ५० रु. | ३ महिने | खुला |

टीप-
१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी २४/११/२०२५ सकाळी १० पासून
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक २४/११/२०२५ ते ३०/११/२०२५ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय कुंभेज
३) निविदा उघडण्याचा दिनांक ०१/१२/२०२५ रोजी सकळी ठीक १० वाजता
४) निवेदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील
५) निविदा मंजूर / नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कुंभेज**
**ता. माढा, जि. सोलापूर**

**सरपंच**
**ग्रामपंचायत कुंभेज**
**ता. माढा, जि. सोलापूर**

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. ता. बार्शी पैकी मौजे बार्शी हद्दीतील लोकांना व आसपासचे तालुक्यातील सर्व जनतेस आमचे खालील सही करणार अशिलानी कागदपत्रे दाखवून जाहीर नोटीस प्रसिध्द करणेस सांगीतलेवरुन कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील प्लॉट / मिळकत त्याचा तपशील याचा जुना गट नंबर ८६३, याचा नवीन गट नंबर ८६९ यापैकी प्लॉट नंबर १० पैकी प्लॉट याचे क्षेत्रफळ २१८.४१ चौ.मी. चे चौ. फूट २३५०.०९ आहे. असा संपूर्ण खुला प्लॉट यासी चतुः सिमा पूर्वेस- सदर गट नंबर पैकी श्री. मल्हारी भोईटे यांचा प्लॉट, दक्षिणेस- सदर नंबर पैकी श्री. मल्हारी भोईटे यांचा प्लॉट, पश्चिमेस - श्री. अंबऋषी थोरात यांचा प्लॉट व उत्तरेस-२०.०० फूट रुंदीचा रस्ता आहे. याचे पाणी व वागणूक हे उत्तर बाजूच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक प्लॉट आतील दगड, माती वगैरे सर्व तगंदभूत वस्तूसह वहिवाटीचे हक्कांसह प्लॉट.

सदर प्लॉट हा महाराष्ट्र शासन गुंठेवारी विकास अधिनियम २००१ चे कलम ४ पोटकलम ३ अन्वये बार्शी नगरपालिका बार्शी यांचेकडील जावक क्रमांक/स्थापत्य/७१४७ नियमाधिन परवाना क्रमांक ७३/३३ दिनांक १०/१२/२०१५ अन्वये मूळ मालक सरुबाई दत्तात्रय धुमाळ वगैरे यांचे नावे गुंठेवारी नियमाधिन झालेला प्लॉट आहे.

वरील नमूद केलेली मिळकत ही श्री. सूरज गोरख वैद्य, रा. उपळाई (ठों), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे स्वसंपादित खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीस आहे. त्यांनी त्याच कायदेशीर कौटुंबिक गरजेपोटी सदरची मिळकत विसारा दाखल रोख रक्कम घेऊन आमचे पक्षकारास कायम खूशखरेदी देण्याचा ठराव केलेला आहे. खरेदी देणार यांनी सदरची मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याची खात्री व भरवसा आमचे पक्षकारास दिलेला आहे. याहीउपर सदर मिळकतीबाबत कोणाचे काही गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, मुदतखरेदी, हक्कसोडपत्र, फेडपत्र, अग्रहक्क, भाडेपट्टा, कुळ, लायसेन्सी, वारसा, हिस्सा, कोर्ट मॅटर, बँक लोन, ॲटॅचमेंट, जप्ती, इजमेंट, मृत्यूपत्र, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार इत्यादी स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार, हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (०७) दिवसांचे मुदतीत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत खालील पत्यावर द्यावी. मुदतीत कोणाची काही न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचे प्रामाणिकपणे गृहीत धरुन सदर खरेदी देणार यांचेबरोबर आमचे पक्षकार ठरलेल्या अटी व शर्तीप्रमाणे खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ही जाहीर नोटीस दिली. दिनांक २३/११/२०२५.

**सही/-**
**ॲड. श्री. विक्रम प्रभाकर जाधव**
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मोबाईल नं. ९४२३८३७७७७
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ३२



### रेस्टिंग हार्ट रेट

हृदयगती (हार्ट रेट) हे आपल्या फिटनेसच्या प्रगतीचे एक अतिशय महत्त्वाचे सूचक आहे. जेव्हा आपण नियमित प्रशिक्षण घेतो, विशेषतः एंड्युरन्स रनिंगसारख्या व्यायामात, तेव्हा शरीरातील अनेक जैविक बदल घडतात. त्यापैकी एक महत्त्वाचा बदल म्हणजे रेस्टिंग हार्ट रेट, म्हणजेच विश्रांती घेत असताना प्रति मिनिट होणारे हृदयाचे ठोके, यात घट येणे. जेव्हा आपण धावणे, सायकलिंग, पोहणे यांसारखा कार्डिओ व्यायाम सातत्याने करतो, तेव्हा हृदय अधिक मजबूत बनते. ते अधिक कार्यक्षमतेने रक्त पंप करू लागते आणि प्रत्येक ठोक्याबरोबर आधीपेक्षा अधिक प्रमाणात रक्त शरीराच्या विविध भागांपर्यंत पोहोचवते. याला स्ट्रोक व्हॉल्यूम वाढणे (इनक्रेज्ड स्ट्रोक वोलूम) असे म्हणतात. परिणामी, समान प्रमाणात रक्त पुरवण्यासाठी हृदयाला जास्त वेगाने ठोके द्यावे लागत नाहीत. म्हणूनच, प्रशिक्षित धावपटूंचा रेस्टिंग हार्ट रेट साधारण ४५-५५ बीट्स प्रति मिनिट एवढा कमी असतो, तर सामान्य व्यक्तीचा ७०-८० दरम्यान असतो.

हृदयगतीतील हा बदल हा फिटनेस सुधारत असल्याचा स्पष्ट संकेत असतो. म्हणजेच, कमी हृदयगती म्हणजे हृदय अधिक शक्तिशाली, कार्यक्षम आणि कमी ऊर्जेचा वापर करून अधिक काम करत आहे.

तथापि, सकाळचा हृदयगती दर हा देखील एक महत्त्वाचा निर्देशक आहे. दररोज सकाळी उठल्यानंतर हृदयगती मोजल्यास शरीराच्या थकव्याची, ओव्हरट्रेनिंगची किंवा आजारपणाची कल्पना मिळू शकते. जर हा दर नेहमीपेक्षा जास्त दिसत असेल-उदा. सामान्यतः ५० असणारा दर अचानक ६०-६५ झाला - तर ते शरीरावर ताण असल्याचे सूचक आहे. अशावेळी विश्रांती घेणे किंवा हलके प्रशिक्षण घेणे उचित ठरते.

कधी कधी उच्च हृदयगती ही झोपेचा अभाव, निर्जलीकरण, तापमानातील बदल, ताणतणाव किंवा आहारातील बदल यांच्यामुळेही होऊ शकते. त्यामुळे नियमितपणे हृदयगती मोजून त्याचा मागोवा ठेवणे (ट्रॅकिंग) आवश्यक आहे. एकूणच पाहता, हृदयगती ही रनरच्या शरीरस्थिती, प्रशिक्षणाची तीव्रता आणि पुनर्बलन (रिकव्हरी) याचे अचूक मापन करणारी जैविक खूण आहे. योग्य प्रशिक्षण आणि विश्रांतीच्या संतुलनामुळे हृदय अधिक मजबूत होते आणि रनिंग परफॉर्मन्स सातत्याने सुधारत जातो.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# गोलंदाजांमुळे भारताचे वर्चस्व

## दक्षिण आफ्रिका ६ बाद २४७ ● कुलदीप यादवचे ३ बळी

**◆ गुवाहाटी, २२ नोव्हेंबर**

गुवाहाटीच्या बारसपारा क्रिकेट स्टेडियमच्या खेळपट्टीवर प्रथमच कसोटी क्रिकेट सामना खेळला जात असताना दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत पहिल्या दिवशी गोलंदाजांमुळे भारताने वर्चस्व गाजविले. वाईट प्रकाशामुळे पहिल्या दिवसाचा खेळ लवकर आटोपला. फिरकीपटू कुलदीप यादवने ४८ धावांत ३ बळी घेत भारताच्या चिकाटीच्या कामगिरीमुळे दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव ८१.५ षटकांत ६ बाद २४७ धावांवर रोखला.



कुलदीप यादवची प्रभावी फिरकी

एडन मार्कराम व रियान रिकेल्टनने २६.५ षटकांत ८२ धावांची भागीदारी करून दक्षिण आफ्रिकेच्या डावाची चांगली सुरुवात केली. याचवेळी बुमराहने मार्करामचा त्रिफळा उडविला, पुढे याच धावसंख्येवर कुलदीप यादवने रिकेल्टनला पंतकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. मार्करामने ३८ धावांचे, तर रिकेल्टनने ३५ धावांचे योगदान दिले. पुढे ट्रिस्टन स्टब्स व कर्णधार टेम्बा बावुमाने संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, मात्र अशातच बावुमा जडेजाच्या गोलंदाजीत जयस्वालकडून झेलबाद झाला. बावुमाला (९२ चेंडूत ४१) बाद करणे हा पहिल्या दिवसाच्या खेळाला कलाटणी देणारा ठरला. बावुमाने ट्रिस्टन स्टब्ससोबत ८४ धावांची भागीदारी केली. नंतर वैयक्तिक अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असलेला स्टब्स कुलदीपच्या फिरकीला बळी पडला. स्टब्सने ११२ चेंडूंचा सामना करत ४ चौकार व २ षट्कारांच्या मदतीने ४९ धावांची भर घातली. नंतर कुलदीप यादवने वियान मुल्डरच्या (१३) रुपाने आपला तिसरा बळी मिळविला. वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने टोनी डी झोर्झीला (२८) यष्टीमागे पंतकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. कसोटीत ४० पेक्षा जास्त सरासरीने धावा काढणारा एकमेव फलंदाज टोनी डी झोर्झी आणि ७ व्या क्रमांकावर फलंदाज सेनुरम मुथुसामीने सहाव्या गड्यासाठी ४५ धावांची भागीदारी केली.

वाईट प्रकाशामुळे खेळ थांबला तेव्हा दक्षिण आफ्रिकेने ८१.५ षटकांत ६ बाद २४७ धावांपर्यंत मजल मारली होती. सेनुरम मुथुसामी नाबाद २५ धावांवर, तर काईल वेरेमी नाबाद एका धावेवर खेळत होते.

सपाट मैदानावर भारताच्या गोलंदाजीची गुणवत्ता आणि खोली झळकत होती. भारतीय गोलंदाजांनी- विशेषतः कुलदीप (४८ धावांत ३ बळी), रवींद्र जडेजा (३० धावांत १ बळी) आणि जसप्रीत बुमराहने (३८ धावांत १ बळी) अशा खेळपट्टीवर निष्कलंक नियंत्रण आणि प्रभुत्व दाखवले. मोहम्मद सिराजने ५९ धावांत एक बळी मिळविला.

ऋषभ पंतच्या रूपात एक नवीन कर्णधार गेल्या नऊ कसोटी सामन्यांमध्ये भारताला आठवा नाणेफेक गमावण्यापासून रोखू शकला नाही. टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताने नितीश कुमार रेड्डी व साई सुदर्शनला संघात स्थान दिले. ◀(वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेन अंतिम फेरीत



### ऑस्ट्रेलियन ओपन बॅडमिंटन

**◆ सिडनी, २२ नोव्हेंबर**

भारतीय स्टार बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने शनिवारी येथे जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या चीन तैपेईच्या चाऊ तिएन चेनवर तीन गेमच्या रोमांचक विजयासह ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली.

२०२१ च्या जागतिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या लक्ष्यने सुरुवातीच्या गेममधील पिछाडीतून सावरण्यासाठी प्रचंड मानसिक कणखरता दाखवली आणि ८६ मिनिटांच्या उपांत्य फेरीत दुसऱ्या मानांकित खेळाडूला १७-२१, २४-२२, २१-१६ असे पराभूत केले.

या वर्षाच्या सुरुवातीला हाँगकाँग ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या, परंतु या हंगामात अद्याप जेतेपद न जिंकलेल्या २४ वर्षीय खेळाडूचा सामना रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात जपानच्या युशी तनाका किंवा चीन तैपेईच्या पाचव्या मानांकित लिन चुन-यीशी होईल.

लक्ष्य सुरुवातीला अस्थिर दिसत होता तर चेन त्याच्या शॉट निवड व अंमलबजावणीमध्ये अधिक अचूक होता, त्यामुळे चेनला रॅलीवर वर्चस्व गाजवता आले. त्याच्या स्थिर खेळामुळे त्याला खेळाच्या मध्यांतरात ११-६ अशी आघाडी मिळाली. अखेर लक्ष्यने पहिला गेम गमावला, परंतु त्यानंतर लक्ष्य सेनने जोरदार मुसंडी मारली व चेनला सामन्यातून डोके वर काढू दिले नाही. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचा महिला संघ अंतिम फेरीत

## दिव्यांगाची टी-२० क्रिकेट : ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय



**कोलंबो, दि. २२ नोव्हेंबर-**

भारताच्या महिला संघाने ऑस्ट्रेलियावर नऊ गडी राखून दणदणीत विजय मिळवत दिव्यांगांच्या (अंध) विश्वचषक टी-२० क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत त्यांची लढत नेपाळबरोबर होईल. श्रीलंकेतील कोलंबो येथील पिसारा ओव्हल मैदानावर शनिवारी झालेल्या उपांत्य सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करणाऱ्या भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला निर्धारित २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १०९ धावांवर रोखले. हे आव्हान भारतीय संघाने अवघ्या ११.५ षटकांत १ गडी गमावून पूर्ण केले. भारताच्या विजयात सोलापूरच्या गंगा कदम हिचा अष्टपैलू खेळ निर्णायक ठरला. तिने सलामीला येत ३१ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने नाबाद ४१ धावा केल्या. गोलंदाजीत तिने २ षटकात १ निर्धाव टाकत केवळ ५ धावा दिल्या. ओडिसाची बसंती हंसदा सामनावीर ठरली. तिने ४५ धावा करीत दोन खेळाडूंना धावबाद केले.

**दुसऱ्या उपांत्य सामन्यात नेपाळ संघाने पाकिस्तानचा ७ गडी राखून केला पराभव**

- आज भारत - नेपाळ अंतिम लढत
- रविवार सकाळी ११:00 वाजल्यापासून
- स्थळ: पिसारा ओव्हल मैदान कोलंबो, श्रीलंका

# न्यूझीलंडकडून वेस्ट इंडीजचा ३-0 ने धुव्वा

**हॅमिल्टन, २२ नोव्हेंबर**

मॅट हेनरीची प्रभावी गोलंदाजी आणि मार्क चॅपमनच्या दमदार अर्धशतकाच्या बळावर न्यूझीलंडने तिसऱ्या व अखेरच्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडीजवर ११७ चेंडू शिल्लक ठेवित ४ गड्यांनी दणदणीत विजय संपादन केला.

या विजयाबरोबरच न्यूझीलंडने मालिकेत वेस्ट इंडीजचा ३-0 असा सफाया केला आणि घरच्या मैदानावर सलग ११ द्विपक्षीय एकदिवसीय मालिका विजय मिळवले. ४३ धावांत ४ बळी टिपणारा न्यूझीलंडचा मॅट हेनरी सामनावीर, तर मालिकेत एकूण ७ बळी टिपणारा काइल जेमिसन माालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडीजला ३६.२ षटकांत १६१ धावांत गुंडाळल्यानंतर न्यूझीलंडने ३०.३ षटकांत ६ गडी गमावित विजयाासाठी आवश्यक १६२ धावाा पूर्ण केल्या. दुखापतग्रस्त डॅरिल मिशेलशिवाय धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंडने ११ षटकांत आपले अव्वल तीन फलंदाज गमावले. टॉम लॅथम (१०) स्वस्तात गमावल्यानंतर त्यांची धावसंख्या ४ बाद ७० अशी झाली, पण मार्क चॅपमन व मायकेल ब्रेसवेलने मॅथ्यू फोर्ड आणि जेडेन सील्स यांच्या धोक्याचा सामना करत डाव सावरला. चॅपमनने ६३ चेंडूत ६४ धावा केल्या, तर ब्रेसवेलने पाचव्या गड्यासाठी केवळ ४८ चेंडूत ७५ धावांची भागीदारी करून भक्कम साथ दिली.

# खांडवीच्या जिजाऊ गुरुकुलचे आट्यापाट्या स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ नोव्हेंबर-**

सोलापूर जिल्हा शालेय आट्यापाट्या स्पर्धा दि. २१ नोव्हेंबर रोजी जिजाऊ गुरुकुल, खांडवी (ता. बार्शी) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेत १४ वर्षे मुले, १७ वर्षे मुले आणि १९ वर्षे मुले असे मिळून एकूण २१ संघांनी सहभाग नोंदवला.



स्पर्धेतील १९ वर्षे मुलांच्या गटात जिजाऊ गुरुकुल, खांडवी संघाने उत्कृष्ट खेळ करत तावशी संघावर विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. विजयानंतर संघातील खेळाडूंसह मार्गदर्शक गणेश वडेकर, दत्ता झांबरे व वैभव कंधारे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास सोलापूर जिल्हा आट्यापाट्या असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे, सचिव राजकुमार मुंबरे, जिजाऊ गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, सचिव वर्षा घाडगे, प्रशासकीय अधिकारी किशोर कदम, डायरेक्टर संदेश कदम व फिजिकल कोच जे. बी. शिंदे उपस्थित होते.

स्पर्धेचे झालेले उत्तम आयोजन आणि अनुशासनबद्ध पार पाडलेली स्पर्धा याबद्दल मान्यवरांनी जिजाऊ गुरुकुलचे कौतुक केले. विजयी संघास आगामी स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



# हत्तुर येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांना सुरुवात

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

हतूर येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन केंद्रप्रमुख नागनाथ स्वामी यांच्या हस्ते करण्यात झाले. सोमेश्वर हायस्कूलचे मुख्याध्यापक शिवयोगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

नागनाथ स्वामी यांनी विद्यार्थ्यांना खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात , असे सांगून स्पर्धेत उत्साहाने भाग घेण्याचे आवाहन केले. यावेळी कबड्डी, खो-खो, लंगडी यासह अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



# आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेत सोशल महाविद्यालयाने पटकाविले अजिंक्यपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

अंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धा सोलापूर शहर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर दि.२२ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडली. या स्पर्धेत एकूण तीन संघानी सहभाग घेतला होता त्यात सोशल महाविद्यालयाने अंतिम सामन्यात सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव विरुद्ध १ - 0 ने जिंकून अंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले.

या स्पर्धेत सोशल महाविद्यालयातर्फे कर्णधार अमजद अली शेख, रेहान मुल्ला, अयान कारखंडीकर, अबू हुरेरा सालार, समिउल्लाह आरेवाले व गोल रक्षक मोईन सय्यद यांनी सुरेख खेळाचे प्रदर्शन केले व संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

विजयी संघास महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ.मुश्ताक शेख व श्री. तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघाचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय.जे.तांबोळी व सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# सुशीलकुमार शिंदे बीपीएड कॉलेजला ३ पदके

## महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील कामगिरी



**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत नेहरूनगर येथील श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशनच्या खेळाडूंनी ३ सुवर्ण व १ कास्य पदकाची कमाई केली. दयानंद कॉलेज येथे झालेल्या या स्पर्धेत शुभम जाधवने भाला फेकमध्ये सुवर्ण तर नीरज महानवरने कास्य संपादले. सौरभ घाडगेने हातोडा फेकमध्ये सुवर्णपदक पटकावले. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.कलाश्री देशपांडे प्रा.नागनाथ पुदे. प्रा.विजय तरंगे, सुनील राठोड, अनिल राठोड यांनी अभिनंदन केले.

# भारतीय गोलंदाजांनी दबाव आणल्याबद्दल कुंबळे आनंदी

**गुवाहाटी** : आसाममधील गुवाहाटी येथील बारसापारा क्रिकेट स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताच्या गोलंदाजीच्या प्रयत्नांवर समाधानी असल्याचे माजी कर्णधार अनिल कुंबळे यांनी सांगितले. उपहारानंतर भारतीय गोलंदाजांनी सातत्याने दबाव कायम ठेवला आणि दक्षिण आफ्रिकेला जोखीम घेण्यास भाग पाडले, असे त्यांनी नमूद केले. डावखुरा फिरकी गोलंदाज कुलदीप यादवने ४८ धावांत ३ बळी टिपलो, तर जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी एक बळी घेतला. भारताला त्यांच्या चिकाटीचे फळ मिळाले. शेवटच्या सत्रात चार बळी घेऊन त्यांनी पहिल्या दिवसाच्या खेळात दक्षिण आफ्रिकेला ८१.५ षटकांत ६ बाद २४७ धावांवर रोखले. ■

# अहिल्याबाई महाविद्यालयात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित क्रीडा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ख्यातनाम क्रीडा संघटक भीमराव बाळगे उपस्थित होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य इस्माईल शेख होते.



उद्घाटनाप्रसंगी सर्व मान्यवरांच्या हस्ते मैदान पूजन व क्रीडा मशाल प्रज्वलन करून क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. क्रीडामशालीच्या प्रकाशाने मैदानात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

तसेच खेळाडू यशस्वी होण्यासाठी क्रीडाशिक्षक, प्रशिक्षक (कोच) आणि क्रीडा पत्रकार यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असते, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक प्रा. धनाजी धेंडे यांनी केले तर. कार्यक्रमाच्या शेवटी सहशिक्षिका सना कुरेशी यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

क्रीडा सप्ताहाच्या निमित्ताने रनिंग रेस, गोळा फेक, थाळीफेक, लिंबू चमचा, पोत्यातील उड्या, खो-खो, कबड्डी, डॉज बॉल,संगीत खुर्ची, तीन पायाची शर्यत, लगोरी अशा विविध खेळांचे सामने घेण्यात येत आहेत.

या स्पर्धा पार पाडण्यासाठी क्रीडा शिक्षक रमेश हेगडे,अल्पना जाधव, राजशेखर बमगोंडे, सना कुरेशी, गुलनाज शेख, अर्चना दीक्षित, प्रा.शितल राठोड, प्रा.महेंद्र ढवाण, प्रा.आनंत सुरते आदी परिश्रम घेत आहेत.



# हिंदुस्तानी चर्च हायस्कूल उपविजयी

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

हिंदुस्तानी कॉन्व्हेंट चर्च हायस्कूलने जिल्हा शालेय क्रिकेट स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादले.

हरीभाई देवकरण प्रशाला येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. यशस्वी खेळाडूंना, कोच व क्रीडा शिक्षक ॲनथनी बर्नाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे चेअरमन अनिल विपत, विश्वस्त फिलीप नदवी, प्राचार्या ऐस्तर सी. विनय, पर्यवेक्षक रवी पांडे यांनी अभिनंदन केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## पान १ वरुन....

### महाविकास आघाडीत काँग्रेस एकाकी

आगामी निवडणुकीत काँग्रेस आणि पवार गटाने एकत्र येण्याबाबत चर्चा केली होती. काँग्रेसने मात्र महाविकास आघाडी व्हायची असेल तर मनसे नको, अशी भूमिका घेतली होती. यावर पवार काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष होते. पवारांनी अखेर मनसे आणि उबाठासोबत एकत्र येण्याचे संकेत दिले. दरम्यान, काँग्रेस पक्षात यावर मतभेद असल्याचे स्पष्टपणे समोर आले. मागील आठवड्यात काँग्रेसच्या नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन काँग्रेसराष्ट्रवादी यांनी एकत्र लढण्याची गरज असल्याचे सांगितले होते. दुसरीकडे मात्र, मनसेसोबत एकत्र येण्याला काँग्रेसचा स्पष्ट विरोध दिसून आला. काँग्रेसने दिल्लीतून आदेश आल्याशिवाय मनसेला आघाडीत घेणार नाही, अशी भूमिका स्पष्ट केली. सर्वांनी एकत्र आले पाहिजे : वडेट्टीवार काही ठिकाणी स्थानिक नेत्यांनी मनसेसोबत आघाडी केली. यामुळे मनसेसोबत जाण्याचे संकेत काँग्रेस नेतेविजय वडेट्टीवार यांनी दिले. शरद पवार यांनी आपण आघाडीत लढलो पाहिजे ही भूमिका मांडली आहे. भाजपला हरवण्यासाठी सर्वांनी एकत्रित आलं पाहिजे अशी आमची ही भूमिका आहे. आम्ही त्यासंदर्भात सकारात्मक आहोत, असेही त्यांनी सांगितले.

# बार्शीत महायुतीच्या प्रचाराला दमदार सुरुवात

## माजी आमदार राजेंद्र राऊत आणि वर्षाताई ठोंबरे यांच्या नेतृत्वाला महत्व

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीकडून प्रचाराची प्रभावी सुरुवात होत असून, या निवडणुकीत भाजप व महायुतीकडील सर्व कार्यकर्त्यांचा जोरदार उत्साह पाहायला मिळत आहे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाला बार्शी शहरात विशेष महत्त्व आहे. १९९९ साली माजी आमदार प्रभाताई झाडबुके यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय प्रवासाला सुरुवात करणारे राजेंद्र राऊत आज जिल्ह्याच्या राजकारणातील प्रभावी, संघटित आणि आदरणीय नेते म्हणून ओळखले जातात. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ते विश्वासू व निकटवर्तीय मानले जातात, ही त्यांची राजकीय ताकद मानली जाते.

विधानसभेतील निसटत्या पराभवानंतर देखील राऊत यांच्या नेतृत्वावरील विश्वास कमी न होता उलट जनतेचा पाठिंबा अधिक



दृढ झाल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, माजी आमदार प्रभाताई झाडबुके यांची कन्या वर्षाताई ठोंबरे यांनाही राऊत यांच्या पाठीशी उभे राहत बार्शी नगरपरिषदेतील महायुतीला विजय मिळवून देण्यासाठी मैदानात उतरल्याचे चित्र आहे. 'खांद्याला खांदा देऊन लढणार', असा निर्धार त्यांनी व्यक्त केल्याने एकजूट अधिक मजबूत झाल्याचे मानले जाते. दरम्यान, महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार तेजस्विनी प्रशांत कथले यांच्या प्रचाराचा भव्य शुभारंभ १७ वा पुट्टा येथील श्री गणेशाच्या मंदिरात पूजा-अर्चा करुन, श्रीफळ वाढवून करण्यात आला. शुभारंभाच्या वेळी परिसरात उत्साही वातावरणाचे दृष्य पाहायला मिळाले.

यानंतर प्रभाग क्रमांक ६ मध्ये भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या निनादात, विविध घोषणा, महिलांची मोठी उपस्थिती, युवकांचा जोश आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसादमुळे संपूर्ण परिसर जाहीर प्रचाराने दुमदुमून गेला. शेकडो महिला, पुरुष, स्थानिक नागरिक तसेच भाजप, शिवसेना व इतर महायुती घटक पक्षांचे निष्ठावंत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या पदयात्रेत महायुतीच्या एकजुटीचे प्रदर्शन स्पष्ट दिसून आले. तेजस्विनी कथले यांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, बार्शीच्या राजकारणात महायुतीची ताकद अधिक बळकट होत असल्याचे स्थानिक वर्तुळात बोलले जात आहे. आगामी दिवसांत प्रचाराला आणखी गती देण्याचा संकल्प नेतृत्वाने व्यक्त केला असून महायुतीचा प्रचार अधिक आक्रमक व योजनाबद्ध पद्धतीने राबवला जाईल, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

बार्शी नगरपरिषद निवडणूक जसजशी जवळ येत आहे, तसतसा महायुतीचा एकत्रित व जोरदार प्रचार हा आगामी राजकीय समीकरणांसाठी निर्णायक ठरेल, असा अंदाज राजकीय तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## महत्वाचे...



### टेंभूर्णीकरांनी ५० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा

**टेंभुर्णी, दि.२२ नोव्हेंबर-**

टेंभूर्णी शहरातील नागरीकांनी ग्रामपंचायतीचा मालमत्ता कर, घरपट्टी,पाणीपट्टीचा एक रक्कमी भरणा ३१ डिसेंबर पर्यंत केल्यास ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. त्यामुळे यामध्ये सहभागी होत नागरिकांनी ग्रामपंचायत स्वावलंबी बनविण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन सरपंच सुरजा बोबडे यांनी केले. टेंभूर्णी शहरात एकूण वीस कोटी थकीत येणे बाकी आहे. हाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर` ते ३१ डिसेंबर कालावधीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात थकीत एक रक्कमी कर भरणाऱ्यांना ५० टक्के सवलत दिली आहे. सरपंच बोबडे यांच्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळत असून दररोज दोन ते तीन लाख रूपये कर जमा होत आहे. इतर नागरीकांनीही थकबाकी अभियान कालावधीत कर भरून लाभ घ्यावा. हरित टेंभुर्णी अभियान, आरोग्यदायी गाव अभियान, स्वच्छ हरित करण्यासाठी आत्तापर्यंत स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण महिला सबलीकरण, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यासारख्या गोष्टींना प्राधान्य देण्यात आले आहे. गाव स्वच्छ समृद्ध करण्यासाठी सरपंच बोबडे आणि जिल्हा नियोजन समितीचे सदस्य योगेश बोबडे यांचे गावक-यांचे सहकार्याने प्रयत्न चालू आहेत. यावेळी उपसरपंच राजश्री नेवसे, ग्रामविकास अधिकारी संजय साळुंके, ग्रामपंचायत सदस्य सचिन होदाडे, गौतम कांबळे, सोमनाथ ताबे, नागनाथ वाघे, तुकाराम डोके उपस्थित होते.

### मंगळवेढ्यात पोलिसांनी १५ सायलन्सरवर फिरवला रोडरोलर

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर**

मंगळवेढा पोलीस प्रशासनाने कर्कश आवाज करत जाणार्या १५ मोटर सायकलचे सायलन्सर काढून त्याच्यावर रोडरोलर फिरवून नष्ट केल्याने मोटर सायकलस्वारामध्ये मोठी खळबळ उडाली आहे. यापुढेही कर्कश आवाज करणार्या मोटर सायकलवर कारवाईची मोहिम सुरु राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी सांगीतले. मंगळवेढा शहरात गेल्या अनेक दिवसापासून बुलेट,यामाह,सुझीकी आदी गाड्यांच्या पुंगळ्या काढून कर्कश आवाज करीत काही तरुण मुले फिरत असल्याने पोलीस प्रशासनाने त्यांच्यावर कारवाईची कठोर भूमिका घेतली आहे. डी.वाय.एस.पी.डॉ.बसवराज शिवपुजे,पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार संभाजी यादव,पोलीस अंमलदार मनोज साळुंखे, सुनिल काळेल आदींचे पथक नेमून अशा कर्कश आवाज करत जाणार्या मोटर सायकलवर कारवाईचे सत्र सुरु केले आहे. दरम्यान शनिवारी मंगळवेढा शहरात वाहतूक शाखेच्या पथकाला १५ मोटर सायकली सायलन्सर काढून कर्कश आवाज करीत असताना मिळून आल्या. या सायलन्सरवर पोलीसांनी चक्क रोडरोलर फिरवून त्या नष्ट करण्यात आले. यापुढेही अशीच कारवाई केली जाणार असल्याने मोटर सायकल स्वारांचे धाबे दणाणले आहे. यामध्ये कोणाचीही गय न करता निप:क्षपातीने कारवाई केली जाणार आहे.

# काँग्रेसच्या प्रभाग क्रमांक तीनचे अमर काळे यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२२ नोव्हेंबर-**

बार्शी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रभाग क्रमांक तीनमधून अभियंता अमर औदुंबर काळे यांनी जयशंकर मिल येथील मारुती मंदिर येथे नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला.



प्रभागातील सर्वसामान्य कामगार वर्गातून रमेश इटकर मिस्त्री तसेच मकसूदभाई पठाण यांच्या हातून नारळ फोडून सामाजिक व सर्वसामान्यांप्रती आदर व्यक्त करत प्रचाराला सुरुवात केली, यावेळी काँग्रेस पक्षाचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष जुगल किशोर तिवारी, तालुकाध्यक्ष सतीश पाचपुडवे, शहराध्यक्ष विजय साळुंखे, युवक विधानसभा अध्यक्ष निखिल मस्के, उमेदवार अजित कांबळे, युवक शहराध्यक्ष संतोष शेट्टी, उमेदवार राकेश नवगिरे,उमेदवार संजीवनी बारंगुळे, बप्पा सुतार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बार्शी शहराच्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये प्रथमच अभियंता यांची उमेदवारी हा चर्चेचा विषय ठरत असताना अभियंता अमर काळे यांनी नगरपरिषदेच्या माध्यमातून प्रभागांमध्ये सुव्यवस्थित रस्ते, गटारी याचे योग्य बांधकाम कशाप्रकारे असावे व ते भ्रष्टाचार न करता कायम स्वरुपी सुस्थितीमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करण्यात असल्याचे सांगितले आहे.

तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी म्हणजे महत्त्वाचे हक्काचे पक्के घर हे प्रधानमंत्री आवास योजना, माता रमाई आवास योजना यांच्या माध्यमातून सर्वसामान्यांना त्याचा लाभ मिळावा व कुठेही भ्रष्टाचार न होता त्याचा लाभ थेट लाभार्थी यांना व्हावा त्या हेतूने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. एक सुशिक्षित, उच्चशिक्षित, चारित्र्यवान अभियंता अमर काळे यांच्या रुपाने प्रभाग तीनमध्ये उमेदवार मिळाले असल्याने नागरिकांमधून देखील उत्साहाचे वातावरण आहे.

एक अभियंता म्हणून बार्शीच्या विकास कामांमध्ये पूर्णपणे सहभाग घेऊन प्रयत्नशील राहणार असल्याचे अमर काळे यांनी व्यक्त केले.



# दत्त विद्या मंदिर प्रशालेत विद्यार्थी सुरक्षितता, जागरुकता विषयावर मार्गदर्शन

**तभा वृतसेवा,**
**सुस्ते, दि.२२ नोव्हेंबर-**

श्री दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ, पंढरपूर संचलित, सुस्ते येथील श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत विद्यार्थी सुरक्षितता व जागरूकता याविषयी प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक तैयुब मुजावर पोलिस उपनिरीक्षक विक्रम वडणे साहेब यांनी समाजकंटकापासून विद्यार्थ्यांना प्रवासादरम्यान येणाऱ्या अडचणी,शालेय व सामाजिक जीवनातील अडचणी, पालक, समाज व शिक्षकांनी घ्यावयाची काळजी आणि सुरक्षितता याबद्दल मार्गदर्शन केले. गुड टच- बॅड टच तसेच पोक्सो कायद्याबद्दल माहिती दिली. संस्थेचे जेष्ठ संचालक अनिरुद्ध सालविठ्ठल व प्रशालेचे प्राचार्य अविनाश कटकधोंड यांचे हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव मधील यज्ञा दुसाने या चिमुकलीच्या निर्घृण हत्येचा प्रशालेतर्फे निषेध करण्यात आला व मौन पाळून तीच्या स्मृतींना आदरांजली वाहण्यात आली.यावेळी पोलिस कॉन्स्टेबल सचिन आटपाडकर, योगिराज खिलारे,ज्येष्ठ लिपिक राजकुमार ढगे,शिक्षक प्रतिनिधी श्रीकांत चंदनशिवे, शिक्षकेतर प्रतिनिधी नागनाथ मैंदर्गी, प्रथमेश गावडे उपस्थित होते.

# ठोकळ प्रशालेत विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेटीचे आयोजन



**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्षेत्र म्हणजे काय याची माहिती होण्यासाठी सिद्धनाथ साखर कारखाना तिऱ्हे (ता.उत्तर सोलापूर) येथे विद्यार्थ्यांसाठी क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर क्षेत्र भेटीमध्ये शिवशंकर कोरशेट्टी टेक्निशियन यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साखर कारखाना दाखवून साखर तयार होण्याची प्रक्रिया कोणती? साखर कशाप्रकारे तयार केली जाते? साखर तयार करताना कोणकोणत्या कच्चामाल लागतो? साखर तयार झाल्यानंतर साखरचे वेगवेगळ्या कणानुसार त्याचे वर्गीकरण कसे केले जाते? साखर कारखान्यांमध्ये विद्युत ऊर्जा कशी निर्मिती केली जाते? तयार झालेल्या विद्युत ऊर्जेचे वापर कोणकोणत्या ठिकाणी कसे केले जाते? इत्यादी सर्व बाबींची विद्यार्थ्यांना सखोल माहिती देण्यात आली आणि प्रत्यक्ष साखर कारखान्याचे प्रशासन व बाजारामध्ये साखर कशी आयात केली जाते. अशी सखोल माहिती या क्षेत्रभेटीद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष देण्यात आली.

या क्षेत्रभेटीसाठी प्राचार्य डी. डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. ही क्षेत्रभेट यशस्वी होण्यासाठी अनिल फराडे, रोहित होटकर, अतुल बुनगे, राणी राऊत आदींनी परिश्रम घेतले. आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी शाळेचे कौतुक केले.

### उळे गावावर पसरली शोककळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथून देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या क्रुझर जी-पला टायर फुटून झालेल्या अपघा-तात तिघांचा मृत्यू झाला. हैदराबाद रस्त्यावरील चिवरी फाट्याजवळ झालेल्या या अपघातात पुजा हरी शिंदे (वय ३०, रा. ऊळेगांव), सोनाली माऊली कदम (वय २२, रा. हडपसर), साक्षी बडे (वय १९, रा. हडपसर) यांचा मृत्यू झाला. १२ जण जखमी आहे. जखमीमध्ये लहानग्यांचाही समावेश आहे. हे सर्व उळे येथून जीपने देवदर्शनासाठी चिवरी व तुळजापूरला जात होते. गावातील महिलेसह तिच्या नातेवाईकांच्या मृत्यूमुळे तसेच लहानग्यांच्या जखमी होण्याने गावावर शोककळा पसरली आहे.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज अक्कलकोटमध्ये जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२२ नोव्हेंबर -**

अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट, मैंदर्गी व दुधनी या तीन नगरपरिषदांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर रविवार, दि.२३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता अक्कलकोट येथील जुना राजवाडा येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या



जाहीर सभेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी दिली.

अक्कलकोट नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाचे शिवसेनेचे अधिकृत उमेदवार रईस टिनवाला व नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार, दुधनी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे व नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार प्रचारार्थ या सभेचे आयोजन करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले.

या सभेस शिवसेनेचे राज्य सचिव संजय मोरे, राज्य प्रवक्ता प्रा.डॉ. ज्योती वाघमारे, सोलापूर संपर्कप्रमुख संजय कदम, सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, लोकसभा संपर्कप्रमुख अनिता माळगे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, युवती सेना राज्य सदस्य प्रियंका परांडे, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रविना राठोड, तालुका प्रमुख वर्षा चव्हाण, शहर महिला आघाडीच्या प्रमुख वैशाली हावनुर आदींची उपस्थिती लाभणार आहे, असे तालुका प्रमुख बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

### संभाजी ब्रिगेड पुणे विभाग शिक्षक आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी चव्हाण

**सुस्ते, दि.२२ नोव्हेंबर-**



संभाजी ब्रिगेडच्या वैचारिक,सामाजिक आणि राजकीय चळवळीत सातत्याने योगदान देणारे पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील श्रीकांत चव्हाण (एस. के. चव्हाण) यांची संभाजी ब्रिगेड पार्टी शिक्षक आघाडीच्या पुणे विभाग प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या कामात श्रम, वेळ, बुद्धी, कौशल्य आणि आर्थिक योगदान देऊन सातत्याने कार्यरत असलेल्या चव्हाण यांच्या कार्याची दखल घेत केंद्रीय कार्यकारिणीने त्यांना ही जबाबदारी सोपवली आहे. चव्हाण यांच्या नियुक्तीमुळे संघटनेला नवी दिशा आणि बळ मिळणार आहे.

## निधन वृत्त...

### अरींजय उपाध्ये



**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

जुळे सोलापूर येथील चंद्रलोक नगरतील रहिवासी अरींजय विजयकुमार उपाध्ये (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंड असा परिवार आहे. पाटबंधारे विभागातील निवृत्त अभियंता चंद्रकांत वि. उपाध्ये यांचे ते कनिष्ठ बंधू होत.

### अंजना परदेशी



**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

जुनी पोलिस लाइन येथील रहिवासी अंजना गोकुळसिंग परदेशी (वय ६५) यांचे शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# दौंड आणि किर्लोस्करवाडी स्थानकांवरही वंदे भारत थांबणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

वंदे भारत गाड्यांची वाढती मागणी लक्षात घेता, रेल्वेने प्रायोगिक तत्वावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत आणि पुणे-हुबळी-पुणे वंदे भारत या गाड्यांना अनुक्रमे दौंड आणि किर्लोस्करवाडी स्थानकांवर अतिरिक्त थांबे देण्याचा निर्णय घेण्यात आला.

गाडी क्रमांक २२२२५/२२२२६ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्स्प्रेसचा थांबा दौंड येथे राहील. २०६७०/२०६६९ पुणे-हुबळी-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा थांबा किर्लोस्करवाडी येथे राहील. गाडी क्रमांक २२२२५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेसला २४ नोव्हेंबर पासून दौंड स्थानकावर थांबा असेल. ही गाडी दौंड येथे २०.१३ वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक २२२२६ सोलापूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वंदे भारत एक्स्प्रेसला २४ नोव्हेंबर पासून दौंड स्थानकावर थांबा असेल. ही गाडी दौंड येथे ०८.०८ वाजता



पोहोचेल. गाडी क्रमांक २०६७० पुणे-हुबळी वंदे भारत एक्स्प्रेसला २४ नोव्हेंबर पासून किर्लोस्करवाडी स्थानकावर थांबा असेल. ही गाडी किर्लोस्करवाडी येथे १७.४३ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक २०६६९ हुबळी-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसला २४ नोव्हेंबरपासून किर्लोस्करवाडी स्थानकावर थांबा असेल. ही गाडी किर्लोस्करवाडी येथे ०९.३८ वाजता पोहोचेल. दौंड आणि किर्लोस्करवाडी येथील प्रवासी आता त्यांच्या स्थानकांवरूनच वंदे भारत एक्स्प्रेसमध्ये चढू किंवा उतरू शकतील, असे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.




# मध्य रेल्वेच्यावतीने बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २१ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथील पॉलीक्लिनिक रुग्णालयात बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. सोलापूर विभागाच्या वैद्यकीय विभाग, पॉलीक्लिनिक पंढरपूर यांनी लाईफलाइन मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल आणि महालॅब यांच्या सहकार्याने संयुक्तपणे हा उपक्रम आयोजित केला होता. एकूण ११० लाभार्थ्यांना आवश्यक वैद्यकीय सेवा मिळाल्या.

रक्त तपासणी आणि नियमित आरोग्य तपासणी सेवांसह डॉक्टर, ऑर्थोपेडिक, नेत्ररोग आणि स्त्रीरोग सल्लामसलत यासह विस्तृत आरोग्य सुविधा प्रदान करण्यात आल्या. लाभार्थ्यांनी वजन आणि जीवनावश्यक अवयवांचे मूल्यांकन, रक्तातील साखरेची चाचणी, रक्तदाब देखरेख आणि ईसीजी तपासणीचा देखील लाभ घेतला.

मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंजुनाथ आणि अतिरिक्त मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. कृष्णा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. डॉ. मंजुनाथ, डॉ. रथन, डॉ. देवीलाल, डॉ. भावना आदींनी रुग्णांची तपासणी केली. या कार्यक्रमाचे संचालन मुख्य नर्सिंग अधीक्षक राहुल गंबारे यांनी केले. पंढरपूरचे वरिष्ठ नर्सिंग अधीक्षक अजय कृष्णन आदींनी याकामा परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ▶▶ महत्वाचे...

### घरगुती कारणावरून महिलेने फिनेल प्राशन केले

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

शहरातील जुनी मिल चाळ येथे घरगुती कारणावरून महिलेने फिनेल प्राशन केले. अलिशा बिलाल शेख (वय २३, रा. जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी राहत्या घरी अलिशा शेख या महिलेने घरगुती भांडणाच्या कारणावरून फिनेल प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. यावेळी अलिशा यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना पती बिलाल शेख यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती वादातून महिलेस पतीकडून मारहाण

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

शहरातील हनुमान नगर परिसरात घरगुती वादातून महिलेस पतीकडून मारहाण करण्यात आली. ज्योती नितीन जगझाप (वय ३८, रा. हनुमान नगर, भवानी पेठ, सोलापूर) असे जखमी पत्नीचे नाव आहे. २१ नोव्हेंबर रोजी रात्री आकराच्या सुमारास राहत्या घरी घरगुती वादातून नवरा नितीन जगझाप याने ज्योती यांना लाथाबुक्क्याने व लाकडाने मारहाण केली. यामध्ये ज्योती यांच्या सर्वांगास मुका मार लागून त्या जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


### माकड चावल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

मोट्याळ (ता. अक्कलकोट) येथे महिलेस माकडाने चावल्याने महिलेस उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. अन्नपूर्णा शिवाजी क्षिरसागर (वय ६३, रा. मोट्याळ) असे जखमी महिलेचे नाव आहे. १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अन्नपूणा या शेतात काम करीत होत्या. त्यावेळी त्यांच्या उजव्या हातास माकड चावल्याने त्यांना उपचारासाठी अक्कलकोटच्या कोरे क्लिनिक येथून सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### बीबी दारफळ येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**



बीबी दारफळ (ता. उत्तर सोलापूर) येथे युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. अभिजित उध्दव पवार (वय १६, रा. बीबी दारफळ) असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. २१ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या पूर्वी अभिजित पवार याने राहत्या घरी पत्र्याच्या वाशाला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी अभिजित यास गळफासातून सोडवून खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. अफताब कोल्हारकर यांनी अभिजित यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे ग्रामविकासात केलेले काम प्रेरणादायी

### माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी; मी विकास यात्री पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ नोव्हेंबर-**

एक चांगले प्रशासकीय अधिकारी म्हणून डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे स्वच्छतेत व ग्रामविकासात केलेले काम राज्याला प्रेरणादायी आहे. असे मत सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनी व्यक्त केले.

सोलापूर येथील संगमेश्वर महाविद्यालयात यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी लिखित मी विकास यात्री या आवृत्तीच्या तिसरे आवृतीचे प्रकाशन माजी कुलगुरू इरेश स्वामी यांच्या हस्ते करणेत आले. संगमेश्वर कॉलेज सोलापूर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि माजी विद्यार्थी समिती, द युनिक फाऊंडेशन पुणे यांचे संयुक्त विद्यम ाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी हे होते. याप्रसंगी न्या. प्राची कुलकर्णी, संगमेश्वर महा विदेयालयाचे प्रभारी प्राचार्य ऋतुराज बुवा, माजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी के. डी बोने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, द युनिक फाऊंडेशन चे विवेक घाटोळे, उप प्राचार्य सुहास पुजारी, मल्लिनाथ कलशेट्टी यांचे सुविद्य पत्नी राजश्री कलशेट्टी, प्राचार्य जमादार, प्रा. येळगावकर, प्रा. अंजुनगिकर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, वळसंग चे माजी सरपंच महादेव व्हटकर, असद सैफन, कोल्हापूर हून अमित देशपांडे, केदार देशमुख प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी कुलगुरू इरेश स्वामी म्हणाले, अंतःकरणात प्रांजळता. आईने दिलेले बाळकडू कलशेट्टी यांनी जोपासले. संत तुकाराम महाराज यांचे प्रमाणे बोलावे चाले चालावे. हा नियम त्यांनी पाळला. महात्मा बसवेश्वरांचे आचरण त्यांनी जोपासले.

संगमेश्वर महाविद्यालयाच्या मुशीत तयार झाले. वळसंग मध्ये महात्मा गांधीजींनी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली आहे. या पवित्र भूमीत एक कष्टकरी यांचा मुलगा किती प्रामाणिक असतो त्याचा प्रत्यय डां. मल्लिनाथ कलशेट्टी यांचे कार्यावरून दिसून येतो. कुमार संगमेश्वर ते जिल्हाधिकारी असा प्रवास युवकांना प्रेरणादायी आहे. त्यांनी स्वच्छतेत व सामाजिक केलेले काम राज्याला प्रेरणादायी आहे.



**प्लास्टिक वापर टाळा , कापडी पिशव्या वापरा :** पर्यावरणाचे होत असलेले नुकसान रोखणे साठी एकल प्लास्टिक चा वापर बंद करा. कापडी पिशव्या वापरा. परिसर स्वच्छता ठेवा. स्वच्छतेशिवाय पर्याय नाही असेही त्यांनी ठामपणे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. रश्मी कन्नुरकर व प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी केले. तर आभार प्रा. आण्णासाहेब साखरे यांनी मानले. काशिनाथ भातगुणकी यांनी हुर्डा पार्टीचे नियोजन केले होते. संगमेश्वरचे प्राध्यापक, स्टाफ यांनी या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

### राष्ट्रीय सेवा योजनेतून घडलो शेवटच्या क्षणापर्यंत सेवा कार्य करणार : डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी

मी विकास यात्री या पुस्तकाचे तिसरे आवृत्तीचे पुस्तक प्रकाशना नंतर बोलताना. यशदाचे उप म हासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, संगमेश्वर महाविद्यालय व सी बी खेडेगीज महाविद्यालय माझी कर्मभूमी राहिली. कुमार संगमेश्वर ते आयएएस होणे साठी मी जिद्द सोडली नाही. स्वच्छतेत झोकून देऊन काम केले. महिनेला दोन रूपये घरातून यायचे. गरीब परिस्थितीतून शिक्षण घेतले. प्रा. अंजुगीकर यांनी मला प्रेरणा दिली. प्राध्यापक ते उप मुख्य कार्यकारी अधिकारी व पुढे आयएएस होणे साठी मी चिकाटी सोडली नाही. दोन वेळा अपयश आले. शासनाने माझे कामाची दखल घेतली. कोल्हापूर ला आयुक्त असताना ७५ रविवार स्वच्छता मोहिमेसाठी दिले. माझे सोबत विकासा यात्री होते. राष्ट्रीय सेवा योजनेने मला घडविले. आयुष्याला दिशा दिली.

## 'वारसा फेरी'द्वारे सोलापूरच्या सांस्कृतिक वारशाचा आणि वास्तुकलेचा साक्षात्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २२ नोव्हेंबर-**

भारतीय राष्ट्रीय कला व सांस्कृतिक वारसा न्यास, इंट्याक सोलापूर शाखेच्या वतीने जागतिक वारसा सप्ताह अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'वारसा फेरी'द्वारे 'वारसा फेरी'द्वारे सोलापूरच्या सांस्कृतिक वारशाचा दुर्मिळ ठेवा आणि वास्तुकलेचा साक्षात्कार घडल्याचे यात सहभागी सोलापूरकरांनी सांगितले.



इंट्याकचे समन्वयक प्रा.डॉ. नरेंद्र काटीकर, संवादक डॉ. सीमंतिनी चाफळकर व नितीन अणवेकर यांच्या नेतृत्वाखाली या फेरीचे आयोजन करण्यात आले होते. नवी पेठ येथील बारड वाचनालय येथून फेरीस प्रारंभ करण्यात आला. येथील वाचनालयातील दुर्मिळ पुस्तके, हस्तलिखिते, प्राचीन नाण्यांचा ठेवा, ऐतिहासिक पत्रांची पाहणी करण्यात आली. नवी पेठेतील श्री राम मंदिर वाडाच्या स्थापत्य शैलीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. गोंदवलेकर महाराजांच्या प्रेरणेने हे मंदिर उभे राहिले असून, प्रभाकर महाराजांसारख्या थोर विभूतींनी येथे दर्शनासाठी भेट दिली आहे. मंदिराचे स्थापत्य आणि कलाकुसर विशेष लक्ष वेधून घेणारी होती.

दक्षिण कसबा येथील श्री शुभराय महाराज मठ येथे या फेरीचा समारोप करण्यात येणार आहे. सोलापूरचे प्रख्यात संत, कवी आणि चित्रकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री शुभराय महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या जागेवरच हा मठ उभा आहे. याठिकाणी वारसाप्रेमींना शुभराय महाराजांच्या कला आणि चरित्राची माहिती मिळाली. शनिवारच्या फेरीत डॉ.अनिता ढोबळे, अच्युत काटीकर, अतुल देशपांडे, श्रीधर खेडगीकर, प्रा.सोनाली गिरी, विजय जाधव, कृष्णा माळवेकर आदींनी सहभाग नोंदविला होता. रविवारी डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मृती संग्रहालय, एक्साईज ऑफिस आदी ठिकाणांना भेटी दिले जाणार आहे, असे प्रा.नरेंद्र काटीकर, श्वेता कोठावळे यांनी सांगितले.

### सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्यावतीने
## २६ नोव्हेंबरपासून आंतरराष्ट्रीय दर्जाचे युनिफॉर्म फेअर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २२ नोव्हेंबर-**

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनच्या वतीने बुधवार, दि.२६ ते शुक्रवार, दि.२८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत मुंबईस्थित गोरेगाव येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे युनिफॉर्म फेअर अर्थात महोत्सवचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे महोत्सव हे नववे महोत्सव असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, माजी सहकार मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत या म होत्सवाचे उद्घाटन करण्यात येणार आहे, अशी माहिती महोत्सवाचे चेअरमन अजय रंगरेज व सचिव श्रीकांत अंबुरे यांनी दिली.



सोलापूर जिल्ह्यात सक्षम आणि यशस्वीरित्या युनिफॉर्म गारमेंट कारखाने चालविणारे उद्योजक आहेत. दर्जेदार मशिनरी व कुशल कारागीरद्वारा सर्व प्रकारच्या युनिफॉर्म गारमेंटचे उत्पादन होते. युनिफॉर्म सोर्सिंग प्लॅटफॉर्म फक्त सोलापूरच आहे असा संदेश देत असताना सोलापुरात फक्त युनिफॉर्म गारमेंट यशस्वीरित्या बनवू शकतो असा उद्देश आहे. या फेअरमध्ये युनिफॉर्मचे बाराशे ब्रँड व दहा हजार डिझाइन्स पाहायला मिळतील. शाळा, कॉलेज, हॉस्पिटल्स, रेल्वे आणि कार्पोरेट सेक्टरर्सच्या दृष्टीने सदर फेअर पर्वणी ठरणारी ठरेल.

देशातीलच नव्हे तर जगातील एकमेव युनिफॉर्म सोर्सिंग हब बनण्याच्या उद्देशाने सोलापूर आपले लक्ष निर्धारित करण्यात आले. उत्कृष्ट डिझाइन्स, दर्जेदार कापड व कुशल कामगारांच्या माध्यमातून युनिफॉर्म बनविले जातात. ग्राहकांना ती कमीत कमी दरात उपलब्ध करून दिली जाते. आतापर्यंत संपन्न झालेल्या प्रदर्शनाला केनिया, जॉर्डन, श्रीलंका, थायलंड यांसारख्या देशातील उद्योजकांनी भेट देऊन युनिफॉर्मचे काम करून घेतलेले आहेत, असे सुनील मेंगजी यांनी यावेळी सांगितले.

## निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी जिल्ह्यातील १७ धर्मादाय रुग्णालये कार्यरत

**सोलापूर दि. २२ नोव्हेंबर-**

निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी सोलापूर जिल्ह्यातील १७ धर्मादाय रुग्णालये कार्यरत करण्यात आल्याचे सोलापूर धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय समितीच्या एका बैठकीत सांगण्यात आले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

मुंबई उच्च न्यायलयातील दाखल याचिकेवरील आदेशान्वये राज्यभरातील धर्मादाय रुग्णालयात निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी प्रत्येकी १० टक्के म्हणजे एकूण २० टक्के खाटा आरक्षित ठेवण्यात याव्या असे आदेशात म्हटले आहे. खाटासह सुश्रुषा, अन्न, कापड, पाणी, वीज, नित्य निदान विषयक सेवा सवलतीच्या दरात दिली जाणार आहे. यासाठी रुग्णांना उत्पन्नाचा पुरावा, शिधापत्रिका यापैकी एक दस्तऐवज सादर करावा लागणार आहे. धर्मादाय रुग्णालयाने उपचार करण्यास टाळाटाळ केल्यास धर्मादाय उपायुक्त कार्यालयाकडे तक्रार करण्याचे यावेळी सांगण्यात आले. **सोलापूर जिल्ह्यातील रुग्णालयांची यादी याप्रमाणे** : अश्विनी हॉस्पिटल-कुंभारी, जगदाळे मामा हॉस्पिटल-बार्शी, नर्गीस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल-बार्शी, शेठ सखाराम नेम चंद जैन-बागेवाडीकर रुग्णालय-सोलापूर, यशोधरा हॉस्पिटल-सिध्देश्वर पेठ, सोलापूर, जनकल्याण हॉस्पिटल-पंढरपूर, सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल-सोलापूर, युगंधर हॉस्पिटल-सोलापूर, लोकमंगल हॉस्पिटल-नीलम नगर,सोलापूर, धनराज गिरजी हॉस्पिटल-रेल्वे लाईन, सोलापूर, विठ्ठल हॉस्पिटल-पंढरपूर, मथुराबाई फत्तेचंद हॉस्पिटल-दमाणी नगर, सोलापूर, अल-फैज हॉस्पिटल-सिध्देश्वर पेठ, सोलापूर, गांधीनाथा रंगजी हॉस्पिटल-बुधवार पेठ,सोलापूर, इंडियन कॅन्सर सोसायटी-सोलापूर, वल्याळ डेंटल हॉस्पिटल-पंडित दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय-केगांव, सोलापूर.

## रस्त्यावर राहणाऱ्या बेघर निराधारांची महापालिकेच्यावतीने शोध मोहीम

### १४ लोकांना महापालिकेच्या बेघर निवारा केंद्रात केले दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, २२ नोव्हेंबर-**

महापालिकेच्या वतीने रस्त्यावर, उघड्यावर राहणारे बेघर निराधार लोकांची शोध मोहीम राबविण्यात येत आहे. शहरातील विविध ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली संबंधित लोकांची संवाद साधून अशा १४ लोकांना पालिकेच्या बेघर निवारा केंद्रात दाखल करण्यात आले.



महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या दिशा निर्देशाने व सहायक आयुक्त मनीषा मगर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बेघर भिक्षेकरी मुक्त सोलापूर मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर शहरातील रेल्वे स्टेशन, श्री सिद्धेश्वर मंदिर, जिल्हा परिषद, रंग भवन, डफरीन चौक,मंदिर, दर्गा व मस्जिद परिसर , होम मैदान, सोलापूर बस स्थानक परिसर येथून बेघर लोकांची शोध मोहीम घेण्यात आली. कर्मचाऱ्यांनी लोकांशी संवाद साधला आहे. शहरातील वाढत्या थंडीमुळे व पावसामुळे रस्त्यावर उघड्यावर राहणारे लोक, भिक्षेकरी, घर सोडून आलेले महिला, पुरुष लहान मुले अशा प्रकारचे लोक जे रस्त्यावरच आपला उदरनिर्वाह करतात. रस्त्यावरच राहतात अशा सर्व लोकांना त्यांचा शोध घेऊन त्यांना आपुलकी बेघर आधार केंद्रात दाखल करण्यात येत आहे. अशा लोकांसाठी सोलापूर महानगरपालिका आपुलकी बेघर निवारा केंद्र सुरु करण्यात आले आहे. येथे राहण्याची सुयोग्य व्यवस्था, पोटभर जेवण, औषधी, आरोग्य सेवा, नवीन कपडे, मनोरंजन आदी सेवा देण्यात येतात. अशा प्रकारचे गरजू लोक आढळल्यास सोलापूर महानगरपालिका युसीडी विभाग, समाजविकास अधिकारी अजितकुमार खानसोळे, शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी ,आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र सोलापूर , जय भारत माते सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शशांक वळवाडे, आपुलकी शहरी बेघर निवारा केंद्र, कुमठा नाका, सोलापूर व्यवस्थापक अशोक वाघमारे (९८२२४३३६७०), समूह संघटक वसीम शेख (९९७०३५०९०४) शशिकांत वाघमारे, सत्यजित वडावराव (९८९०९०७२४७) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. महिला काळजी वाहक दिलशाद शेख, शक्तीकुमार जाधव, राजू गदग, बेघर निवारा सदस्य समिती सत्यनारायण मूर्ती, धर्मा कांबळे, राघवेंद्र बोरगावकर, संजय शिरसागर, सुनिता मस्के यांनी परिश्रम घेतले.

# सोलापुरात ७५० वाचकाद्वारे होणार ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण

### ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ नोव्हेंबर-**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त सोलापुरातील होटगी रोडवरील मजरेवाडीच्या गांगजी पार्कवर ७५० वाचकांद्वारे ५ ते १२ डिसेंबर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होणार आहे. यानिमित्तच्या अखंड हरिनाम सप्ताहात नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे.

अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व शहराध्यक्ष हभप संजय महाराज पवार यांच्या नेतृत्वाखाली या नामसप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. पारायणासाठी व्यासपीठ चालक म्हणून श्रीगोंदा येथील ज्ञानेश्वरी कंठभूषण हभप नामदेव महाराज पवार लाभणार आहेत. या सप्ताहात पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ७ ते १० पारायण, सकाळी १० ते १२ गाथा भजन, सायंकाळी ४ ते ५ हरिपाठ, सायंकाळी ५ ते ६ प्रवचन, रात्री ७ ते ९ हरिकीर्तन व नंतर हरिजागर होणार आहे. या सप्ताहाचे संयोजन होटगी रोड, जुळे सोलापूर, हत्तुरे नगर, मजरेवाडी, भारतामाता नगर, कुमठे परिसरातील भजनी मंडळासंह भाविकांनी केले आहे. या नामसप्ताहात दि. ५ रोजी हभप मन्मथ महाराज बहिरमल (उळे), दि. ६ रोजी हभप परूषोत्तम महाराज सुतार (कोंडी), दि. ७ रोजी हभप निळोबा महाराज शिरसट (सोलापूर), दि.८ रोजी हभप माऊली महाराज बचुटे (सोलापूर), दि.९ रोजी हभप अच्युत महाराज मोफरे (सोलापूर), दि. १० रोजी हभप लक्ष्मण महाराज चव्हाण (सोलापूर), दि. ११ रोजी हभप गोपाळ महाराज लोंढे (सोलापूर) यांची दररोज सायंकाळी ५ ते ६ प्रवचनसेवा होणार आहे. तर दि. ५ रोजी हभप सुधाकर महाराज इंगळे (सोलापूर), दि.६ रोजी हभप ॲड. कृष्णा महाराज चवरे (पंढरपूर), दि.७ रोजी हभप प्रकाश महाराज साठे(बीड), दि.८ रोजी हभप उमेश महाराज दशरथे (आळंदी), दि.९ रोजी हभप अनिल महाराज पाटील-बाभळगावकर, दि.१० रोजी हभप रामराव महाराज ढोक (नागपूर), दि.११ रोजी हभप गुरूवर्य प्रभाकरदादा बोधले महाराज (पंढरपूर) यांची दररोज रात्री सात तो नऊ या वेळेत कीर्तनसेवा होणार आहे.

या नामसप्ताहाची सांगता दि.१२ डिसेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत जगद्गुरू तुकाराम महाराजांचे विद्यमान वंशज हभप गुरूवर्य बापूसाहेब महाराज देहूकर (पंढरपूर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. दरम्यान यादिवशी सकाळी सात वाजता ग्रंथदिंडी व नगरप्रदक्षिणा काढण्यात येणार असल्याचे हभप संजय महाराज पवार यांनी सांगितले.



सोलापूर : येथील गांगजी पार्कवरील पारायण सोहळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप उभारणीचा मुहूर्तमेढ पूजन करताना हभप सुधाकर महाराज इंगळे. यावेळी संजय पवार, प्रकाश माने, प्रदिप माने, मनोज कासार व अन्य.

रविवार दि. ७ डिसेंबर रोजी रेस्पायर ल्किनिक यांच्या वतीने महाअरोग्य शिबिर होणार आहे. यावेळी रक्तदान शिबीरही घेण्यात येणार आहे. तसेच शंकर शेठ साबळे नेत्र रूग्णालयातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबीर होणार आहे. त्याचा गरजूंनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या नामसप्ताहात भातंबरे (ता. बार्शी) येथील श्री स्वामी समर्थ वारकरी शिक्षण संस्थेचे ५० बाल वारकरी सहभागी होणार आहेत. हे बाल वारकरी दररोज सायंकाळी ४ ते ५ हरिपाठ करणार आहेत. शिवाय कीर्तन भजनाला साथसंगत करणार आहेत.

या नामसप्ताहात दररोज सुमारे दोन हजार भाविकांना अन्नदान करण्यात येणार आहे. दररोज होणारी अन्नदानसेवा परिसरातील भाविकांनी स्वखर्चातून करण्याचे ठरवले आहे. या अन्नदान सेवेमध्ये खंडाळकर परिवार, महादेव बाळगी, दादाराव ताकमोगे, श्रीशैलमामा हत्तुरे, बालाजी चौगुले, माजी नगरसेवक नागेश ताकमोगे, समाजसेवक विश्वनाथ शेगावकर, माजी आमदार दिलीप माने यांचा मोलाचा वाटा आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तेरखेडा येथील यश घुले आणि हर्षद शिंदे यांची भारतीय सेनेत निवड

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२२ नोव्हेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा गावातील दोन तरुण-यश घुले आणि हर्षद शिंदे-यांनी अभिमानास्पद यश मिळवत भारतीय सेनेत (आर्मी) निवड मिळवली आहे. काही दिवसांपूर्वी पुणे येथे पार पडलेल्या सैन्य भरती प्रक्रियेत त्यांनी उत्तीर्ण होत ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थितीशी झुंज देत दोघांनी कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर हे स्वप्न साकार केले आहे.




त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह मोलमजुरीवर चालत असूनही, त्यांनी अडचणींवर मात करत देशसेवेचा मान मिळवला.

यश आणि हर्षद यांच्या या यशामुळे तेरखेडा गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे.

गावकऱ्यांनी दोघांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### दिनेश कुमार सिंग यांनी घेतले श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन

**तुळजापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे (पश्चिम विभाग) खंडपीठाचे न्यायिक सदस्य न्या. दिनेश कुमार सिंग यांनी सपत्नीक श्री तुळजाभवानी देवींचे मनोभावे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी सपत्नीक श्री तुळजाभवानी देवींची ओटी भरत कुलधर्म-कुलाचार पूर्ण केले. न्या. दिनेश कुमार सिंग हे अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश असून न्यायक्षेत्रात त्यांचा मोठा अनुभव आहे. त्यांनी काही काळ प्रयागराज येथील औद्योगिक न्यायाधिकरणाचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. दर्शनानंतर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने यांनी त्यांचा श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र भेट देत सपत्नीक सत्कार केला. यावेळी सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, सहायक जनसंपर्क अधिकारी अतुल भालेराव तसेच मंदिर संस्थानचे अन्य कर्मचारी उपस्थित होते.

### कृष्णवेणी लिमये यांची एसबीआयमध्ये सर्कल बेस ऑफिसर (वर्ग-१) पदावर निवड

**मुरूम, दि.२२ नोव्हेंबर -**

मुरूम येथील भीमनगरातील कृष्णवेणी विश्वभूषण लिमये यांनी उल्लेखनीय कामगिरी करत स्टेट बँक ऑफ



इंडिया मध्ये सर्कल बेस ऑफिसर (वर्ग-१ अधिकारी) म्हणून निवड मिळवली आहे. त्यांनी हे यश भारताचे महामानव विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अर्पण केले आहे. कृष्णवेणी लिमये यांचे प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण कर्नाटक राज्यातील कलबुर्गी येथे झाले. त्यांचे एम.कॉम. शिक्षणही गुलबर्गा विद्यापीठ, कलबुर्गी येथून पूर्ण झाले आहे. सध्या त्या अक्कलकोट येथील आयसीआयसीआय बँकेत डिप्युटी मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. आयबीपीएस मार्फत घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षा आणि मुलाखत यशस्वीरित्या पार पाडल्यानंतर त्यांची एसबीआयमध्ये निवड झाली आहे. एका महिन्याच्या प्रशिक्षणानंतर त्यांना संबंधित पदस्थापना मिळणार आहे.



### लोहारा युवक काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी प्रकाश होंडराव

**लोहारा, दि.२२ नोव्हेंबर -**

शहरातील काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते प्रकाश शंकर होंडराव यांची युवक काँग्रेसच्या लोहारा शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली. दि.२२ नोव्हेंबर रोजी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी प्रकाश होंडराव यांना निवडीचे पत्र दिले. काँग्रेस पक्षामधील हे संघटनात्मक पातळीवरील नव्या चेहऱ्यांना संधी देऊन युवकांचे संघटन वाढविण्यावर भर देण्यात येणार असून वरिष्ठाच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ह्या निवडी बदल होंडराव यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जेष्ठ नेते रौफ बागवान, शेरू मसुलदार, मालिकार्जुन बनशेट्टी, निशी गोरे, आयुब शेख, प्रभाकर बिराजदार आदी उपस्थित होते.

# नळदुर्ग नगराध्यक्षपदासाठी पंचरंगी लढत; ६ उमेदवार रिंगणात

## निवडणुकीचे तापलेले वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ नोव्हेंबर -**







नळदुर्ग नगरपालिकेची निवडणूक आता चांगलीच रंगात आली असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचे संपूर्ण चित्र स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्ष पदासाठी ६ आणि नगरसेवक पदासाठी ८३ उमेदवार रिंगणात आहेत. त्यामुळे नगराध्यक्षपदाची लढत पंचरंगी, तर नगरसेवक पदांची लढत बहुरंगी होणार आहे.

नगराध्यक्ष पदासाठी भाजपचे बसवराज धरणे, काँग्रेसचे अशोक जगदाळे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे संजय बताले, एमआयएमचे शहेबाज काझी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे महेबुब शेख यांच्यात चुरशीची लढत रंगणार आहे.

निवडणुकीला अवघे दहा दिवस राहिले असून प्रचार युद्धाला आता वेग आला आहे. ही निवडणूक भाजपचे आमदार राणा जगजितसिंह पाटील आणि काँग्रेसचे अशोक जगदाळे यांच्यासाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जात आहे. निकालावरून तालुक्यातील पुढील राजकीय समीकरणे ठरणार असल्याने दोन्ही नेते पूर्ण ताकदीने रणांगणात उतरले आहेत. अशोक जगदाळे हे स्वता नगराध्यक्षपदाचे उमेदवार असल्याने त्यांच्यासाठी ही लढत अधिक महत्वाची बनली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे संजय बताले यांनी निवडणुकीचे गणितच बदलून टाकल्याचे चित्र आहे. त्यांना मिळत असलेल्या पाठिंब्यामुळे त्यांच्या गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

### नळदुर्गमध्ये प्रचार तापला

पदयात्रा, कॉर्नर सभा आणि प्रचार मोर्चे सुरू झाल्याने नळदुर्गचे राजकीय वातावरण तापले आहे. प्रत्येक पक्ष आपापल्या ताकदीने मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असून आगामी काही दिवसांत प्रचार आणखी वेग घेण्याची शक्यता आहे.

एमआयएमचे उमेदवार शहेबाज काझी यांना मुस्लिमबहुल भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे. विशेषतः मुस्लिम युवा मतदार मोठ्या प्रमाणात एमआयएमकडे वळत असल्याने त्यांची बाजू सध्या मजबूत मानली जात आहे. दरम्यान हिंदू मतांचे तीन प्रमुख उमेदवार धरणे, जगदाळे आणि बताले यांच्यामध्ये विभाजन होत असल्याने त्याचा फायदा एमआयएमला मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

काँग्रेस, भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या तिन्ही पक्षांकडेही मुस्लिम मतदारांचा पाया आहे. त्यामुळे या तिन्हींपैकी कोणता पक्ष मुस्लिम मतांचे जास्त प्रमाणात ध्रुवीकरण करतो, यावरही नगराध्यक्षपदाचा निकाल मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे.

# दहिफळ येथे श्री खंडोबा यात्रेला २६ नोव्हेंबरपासून सुरुवात

### तीन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२२ नोव्हेंबर -**


कळंब तालुक्यातील दहिफळ येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी अनुभवायला मिळणार आहे. चंपाषष्ठी (सटी) निमित्त बुधवार, दि.२६ नोव्हेंबर पासून मुख्य यात्रेला सुरुवात होणार असून यात्रेचे तीन दिवस विविध उपक्रमांनी गजबजणार आहेत.



गेल्या १५ वर्षांपासून राजे ग्रुपतर्फे यात्रेकरूंसाठी दिवसभर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत असून, यावर्षीही मोठ्या प्रमाणावर महाप्रसादाची अतिशय उत्तम तयारी करण्यात आली आहे. बुधवारी दि.२६ नोव्हेंबर रोजी पहाटेपासून दंडवतांची सुरुवात, मानाच्या नैवेद्याची मिरवणूक, नंगर मिरवणूक, नंगर तोडणे, पारंपरिक गाडा-बगाडा मिरवणुका, ढोल पथक, लेझीम पथकासह धार्मिक कार्यक्रम सायं. ७ वा. 'एका पेक्षा एक अप्सरा' सांस्कृतिक कार्यक्रम. गुरुवार दि.२७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. भव्य सोंगाचा कार्यक्रम, सायं. ७ वा. रूपाली पुणेकर व किशोर अहिरेकर मंडळ, फलटणकर यांचा लोकनाट्य तमाशा शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वा. भव्य कुस्ती स्पर्धा, सायं. ७ वा. 'गर्जा हा महाराष्ट्र संस्कृतीचा लोककलेचा' आगळावेगळा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

यात्रा कमिटी, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी सर्व भाविकांनी धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचा मनसोक्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# मालेगाव येथील चिमुकलीवरील अत्याचारप्रकरणी लोहारा शहर बंद; आरोपीला फाशीची मागणी तीव्र




**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ नोव्हेंबर -**

मालेगाव डोंगराळे येथील तीन वर्षांच्या चिमुकलीवर झालेल्या अमानुष अत्याचार व निर्घृण हत्येच्या निषेधार्थ लोहारा शहरातील बाजारपेठ आज बंद ठेवण्यात आली. आधुनिक लहुजी शक्ती सेनेने दिलेल्या लोहारा बंदच्या आवाहनास शहरातील व्यापाऱ्यांनी समिश्र प्रतिसाद देत सहभाग नोंदवला.

मानवतेला काळिमा फासणारी ही घटना उघड झाल्यानंतर संतापाची लाट उसळली आहे. विकृत प्रवृत्तीच्या नराधमाने चिमुकलीवर अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. केवळ मेणबत्त्या पेटवून किंवा निषेध व्यक्त करून आता चालणार नाही, तर ३० दिवसांच्या आत फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी आधुनिक लहुजी सेनेने केली आहे.

ही मागणी तहसीलदार मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे देण्यात आली आहे. आरोपीला फाशीची शिक्षा देणे हीच त्या चिमुकलीला खरी श्रद्धांजली ठरेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नराधमांवर कठोरात कठोर कायदा अमलात आणावा, अशा गुन्ह्यांसाठी विशेष व्यवस्था करावी, अशी जनतेतूनही मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे. कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होऊन आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी, यासाठी दि. २२ नोव्हेंबर रोजी शांततेत लोहारा बंद पाळण्यात आला.

दरम्यान, बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी विशेष दक्षता घेतली होती. या आंदोलनात आधुनिक लहुजी सेनेचे दीपक रोडगे, नितीन रोडगे, विकी मोरे, विमल शिंदे, अंबिका डोलारे, पिकां खूषबा, संजीवनी शिंदे, बालाजी कसबे आदी सहभागी झाले.

# अणदूर खंडोबा यात्रेत तरुणांचा स्तुत्य उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२२ नोव्हेंबर -**

येथील ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रेनिमित्त कट्टा ग्रुप यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भक्त भाविकांसाठी मोफत अन्नछत्राचे आयोजन करण्यात आले. जवळपास चार हजार भक्तांनी या प्रसादाचा लाभ घेतला. अन्नछत्राचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजूरे यांच्या हस्ते करण्यात आले.

कट्टा ग्रुपच्या सदस्यांनी भक्तांसाठी शिरा, भात आणि आमटीचा प्रसादरूपी भोजनाचा उत्तम बेत ठेवला होता. खंडोबाच्या प्रसादाचे महत्त्व लक्षात घेऊन भक्तांनी या अन्नदानास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मोठा मंडप उभारून स्त्रियांसाठी स्वतंत्र व्यवस्था, स्वच्छता आणि नियोजन यामुळे दूरवरून आलेले भाविक समाधानाने भोजन करून श्रींच्या दर्शनाचा लाभ घेत होते.

याप्रसंगी डॉ. खजुरे यांच्या हस्ते दोन सर्पमित्रांना साप पकडण्यासाठी लागणारे साहित्य भेट देण्यात आले. कट्टा ग्रुपच्या या सामाजिक उपक्रमाचे गावभर तसेच यात्रेकरूंमध्ये सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

कार्यक्रमाला तंटामुक्त समितीच्या अध्यक्षा कल्याणी मुळे, आप्पू धमुरे, डॉ. नागनाथ कुंभार, बाबुराव मुळे, पप्पू धमुरे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष मनोज मुळे, पत्रकार अजय अणदूरकर, संजीव आलूरे, आण्णा महाराज घोडके, गुरुनाथ गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कट्टा ग्रुपच्या तरुण कार्यकर्त्यांनी उत्तम सेवा बजावल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# जळकोट येथे वृद्धेची हत्या आणि चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

जळकोट (ता. तुळजापूर) येथे अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून वृद्धेची हत्या करत अंगावरील सोन्याचे दागिने चोरण्याची धक्कादायक घटना घडली आहे. फिर्यादी रामशेट्टी एकनाथ पाटील (वय २९, रा. जळकोट) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची आजी सुभद्राबाई रामशेट्टी पाटील यांच्या राहत्या घरात हा प्रकार घडला.

दि.२० नोव्हेंबर रोजी रात्री अंदाजे ९ वाजता ते दि.२१ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश करून सुभद्राबाई यांच्या अंगावरील सुमारे ८ तोळे सोन्याचे दागिने, किंमत अंदाजे ४ लाख रुपये, चोरले.

तसेच त्यांचे तोंड दाबून त्यांची हत्या केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादी रामशेट्टी पाटील यांनी दि.२१ नोव्हेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# सरपंच परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्षा जिनत सय्यद जिल्हा परिषद निवडणूक लढवणार!

### भूम तालुक्यातील सर्वसाधारण आष्टा जिल्हा परिषद गटातून इच्छुक...

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

सरपंच परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्षा जिनत सय्यद या आगामी जिल्हा परिषद निवडणुक लढवणार असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचे नेतृत्व बळकट करण्याच्या दृष्टीने त्यांच्या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित होत आहे.

भूम तालुक्यातील बेलगाव पिंपळगावच्या दुसऱ्या टर्मच्या उच्चशिक्षित विद्यमान सरपंच जिनत कोहिनुर सय्यद यांच्यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला जिल्हा प्रमुख म्हणून महत्वपूर्ण जबाबदारी असून पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि महिला कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांनी केलेल्या कामाची दखल घेऊन त्यांना ही पक्षाकडून जबाबदारी देण्यात आली आहे.



ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता, महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन, पायाभूत सुविधांचा विकास, पाणीपुरवठा आणि सामाजिक उपक्रम अशा विविध क्षेत्रांत त्यांच्या पुढाकारामुळे बेलगाव पिंपळगावने सकारात्मक प्रगती साधली आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वावर स्थानिक नागरिक आणि परिसरातील सरपंच वर्गाचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामामुळे स्थानिक स्तरावर त्यांची चांगली ओळख निर्माण झाली असून आपल्या प्रभावी नेतृत्वाच्या जोरावर त्यांनी ग्रामविकासाच्या अनेक उपक्रमांना गती दिली आहे. गावाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काम करताना त्यांनी राज्यस्तरावर सरपंचांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यातही महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

सरपंच परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्षा जिनत सय्यद यांनी येणारी जिल्हा परिषद निवडणूक लढवण्याचा घेतलेला निर्णय स्थानिक पातळीवर महिला नेतृत्वाला बळ देणारा हा निर्णय मानला जात असून त्यांच्या उमेदवारीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

भूम तालुक्यातील आष्टा जिल्हा परिषद गट सर्वसाधारण वर्गासाठी खुले आरक्षण असून या गटात इडा, अंतरगाव, कानडी, बेलगाव, पिंपळगाव, चिंचपूर ढगे, साडेसांगवी, गोलेगाव, आष्टा, देवांग्रा, आष्टावाडी, वांगी बुद्रुक, वांगी खुर्द, शेकापूर, तांबेवाडी, माणकेश्वर आदी गावांचा समावेश आहे.



जिल्हा परिषद निवडणुकीत जिनत सय्यद या शिवसेना (उबाठा) पक्षाकडून मैदानात उतरण्याची चर्चा अधिकच जोर धरू लागली असून, सरपंच परिषद आणि शिवसेना महिला जिल्हा प्रमुख जबाबदारीमुळे त्यांचे राजकीय बळ आणखी वाढल्याचे दिसून येत आहे.

जिनत सय्यद या ग्रामीण भागातील विविध सामाजिक-विकासकामांमध्ये सक्रिय असून, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक प्रशासनात पारदर्शकता यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय प्रवासाच्या पुढील टप्प्याकडे स्थानिक राजकीय वर्तुळात उत्सुकता असून आगामी निवडणूक अधिक रंगतदार होण्याची चिन्हे आहेत. महिला जिल्हा प्रमुख म्हणून जिनत सय्यद या जिल्हाभरातील महिलांचे प्रश्न, संघटन बांधणी, विविध पक्षकार्यक्रमांचा विस्तार आणि महिला नेतृत्व उभारणीवर लक्ष केंद्रित करणार आहेत. पक्षातील महिला विभाग अधिक मजबूत करण्यासाठी त्यांची निवड योग्य असल्याचे वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मत आहे.

सरपंच परिषदेच्या महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यस्तरीय प्रश्न मार्गी लावण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या जिनत सय्यद यांचा अनुभव, तसेच दुसऱ्या कार्यकाळातील सरपंच म्हणून केलेल्या विकासकामांमुळे त्यांची ओळख एक सक्रिय आणि प्रभावी नेत्री म्हणून झाली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना (उबाठा) पक्षाकडून उतरू पाहत असलेल्या जिनत सय्यद यांच्या या कामामुळे त्यांना ग्रामीण जनतेत आणि सरपंच वर्गात भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे.

### प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित...

१. हिरकणी पुरस्कार : समाजसेवेतील उत्कृष्ट कार्याबद्दल दिला जाणारा सन्मान. २. कोरोना योद्धा पुरस्कार : कोविड-१९ महामारी दरम्यान केलेल्या समाजोपयोगी कामगिरीसाठी. ३. दैनिक एकमत पुरस्कार : स्थानिक वृत्तपत्राद्वारे समाज आणि नेतृत्वात केलेल्या योगदानासाठी. ४. नवदुर्गा पुरस्कार : महिला नेतृत्व आणि सक्षमीकरणासाठी केलेल्या कामाबद्दल. ५. आयबीएन लोकमत राज्यस्तरीय मुक्ता सन्मान पुरस्कार : राज्यस्तरीय कार्यक्षमतेसाठी आणि सार्वजनिक सेवेसाठी.

# पुढील पाच वर्षात कामाची जबाबदारी आमची : उपमुख्यमंत्री अजित पवार

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २२ नोव्हेंबर :** सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा कानमंत्र पक्षाने कार्यकर्त्यांना दिला आहे. हाच मंत्र घेऊन कोणत्याही जाती धर्माला ठेच पोहंचेल. असे कोणतेही काम राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी करु नये. लोकांचे प्रश्न प्रथम प्राधान्याने सोडविण्यासाठी आपली ताकद कामाला लावा. राज्याचे अर्थमंत्रीपद माझ्याकडे असून कोणत्याही योजनेला पैसा कमी पडणार नाही. तसेच नगरपालिकेच्या पुढील पाच वर्षातील विकासकामाची जबाबदारी आमची असल्याचे आश्र्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी औसेकरांना दिले.

औसा येथील किल्ले मैदानावर झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. जिल्हाध्यक्ष डा. अफसर शेख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आ. संजय बनसोडे, आ विक्रम काळे, मकरंद सावे, आंकुश नाडे, दतात्रय कोळपे, अॅड. श्रीकांत सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, लोकसभेची निवडणुक वेगळ्या पध्दतीने लढविली जाते. देशातील सत्तेची सुत्रे कोणाच्या हातात द्यायची. यावरुन मतदान होते. विधानसभेची निवडणुक त्यापेक्षा वेगळ्या पध्दतीने होते. त्यावेळी लोक राज्याचा विचार करुन मतदान करतात. हे सुत्र ठरवले म्हणुन राज्याची सुत्रे आमच्या हाती दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार सर्व जाती, पंताच्या लोकांना एकत्र घेऊन चालणारा आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची फुट येणार नाही. राज्यात महायुती आहे. यात दुजाभाव नाही. केंद्रात एनडीए सरकार आहे. परंतू स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना योग्य न्याय मिळावा. यासाठी स्थानिक पातळीवरील निवडणुका स्वबळावर लढविण्याचा निर्णय आम्ही घेतला असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

> **अफसर शेख यांची संधी हुकली : पवार**
> मी जेव्हा उपमुख्यमंत्री असतो तेव्हा अफसर शेख नगराध्यक्ष असतात. मात्र यावेळी ओबीसी महिला आरक्षणामुळे त्यांची संधी यावेळी हुकली आहे. परंतू त्यांच्या भगिनी यासाठी निवडणुक लढवित आहेत. आणि त्या ही जबाबदारी योग्य पध्दतीने पार पाडतील. असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

सरकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, सहकार चळवळीच्या माध्यमातून आपल्याला राज्यात मोठे काम करायचे आहे. लातूर येथे एक वर्षाच्या आत सहकार भवनाची इमारत उभा करायची आहे. याच्या माध्यमातून महिला व तरुणांच्या हाताला रोजगार मिळणार असून या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला बळ द्या. असे आवाहन केले.

## दोनच दिवसांपूर्वी केलेल्या रस्त्यावर पडले खड्डे

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, २२ नोव्हेंबर :** येरोळ मोड ते पांढरवाडी मोड या मार्गावर दोनच दिवस पुर्वी झालेल्या हॉटमिक्स नवीन डांबरीकरण करण्यात आले होते. सदर रस्त्याचे काम निष्कृष्ट दर्जाचे करण्यात आले असल्याची चर्चा तानाजी महाराज दाडगे, जिवनराव येरोळकर यांच्यासह ग्रामस्थांतून केली जात असून या रस्त्याच्या कामाकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.



येरोळ ते पांढरवाडी नवीन डांबरी रस्त्यावर हॉट मिक्स रस्ता तयार होऊन दोनच दिवस झाले या रस्त्यावर अनेक ठिकाणी जागोजागी खड्डे पडल्याने हा रस्ता किती दिवस टिकणार याची ग्रामस्थांना शंका आहे. सदरील होत असलेल्या रस्त्याच्या कामाची विभागीय वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ भेट देऊन पाहणी करुन सदरच्या रस्त्याचे मजबूत व दर्जेदार काम करण्यात यावे सदर रस्त्यावर मटेरियल व डांबराचा कमी प्रमाणात वापर केला जात आहे. सदरील कामाचा ठेकेदार हा राजकीय आश्रयाचा असल्याने या रस्त्याच्या कामाकडे अधिकारी दुर्लक्ष करित असल्याचे तानाजी दाडगे यांच्या सह नागरीक बोलून दाखवत आहे.

येरोळ गावात प्रमुख रस्त्यावर श्रीराम मंदीर ते जिजामाता विद्यालय जवळपास दीड हजार मिटर रस्ता रुंदीकरण करुन दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम करण्यात येत आहे. सदरचे नाली बांधकाम हि निष्कृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याचे येथील नागरिकांतून बोलले जात आहे. नवीन नाली बांधकामांचे अनेक ठिकाणी पडण्याचे प्रकार घडत आहे. सदर ठिकाणची विभागीय वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ पाहणी करुन नाली व रस्त्याचे काम मजूबत व सुरुळीत करण्यात यावे अशी नागरिकांतून मागणी केली जात आहे.



## इंडियन डेंटल असोसिएशन लातूर शाखेचा गौरव

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** इंडियन डेंटल असोसिएशन लातूर शाखेने २०२४-२५ मधे अनेक उत्कृष्ट उपक्रम राबविले होते. ज्या मध्ये ५ उऊए कार्यक्रम, १९ सामाजिक दंत आरोग्य उपक्रमांमध्ये १०,००० विद्यार्थ्यांची दंत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. विभागस्तरारील दंत परिषद आयोजीत करण्यात आली ज्या मधे ३०० हुन अधिक दंत वैद्यांनी आपली उपस्थिती नोंदवली होती. रक्तदान शिबिर व तसेच १०० हुन अधिक अतिवृष्टी पुरग्रस्त परिवारांना मोफत शिधा वाटप करण्यात आले. अशा सर्व उपक्रमांची दखल घेत लातूर शाखेला या वर्षी महाराष्ट्राचे उत्कृष्ट दंत शाखा या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा कार्यक्रम छ. संभाजीनगर येथे ६४ वे महाराष्ट्र राज्य दंत परिषदेमधे पार पडला. हा गौरव स्विकारण्यासाठी लातूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. शिल्पा लटुरीया, सेक्रेटरी डॉ.शैलेश पडगीलवार, कोषाध्यक्ष डॉ.साफल्य कडतने, उऊए समन्वयक डॉ.आनंद अंबेकर, माझी राज्य अध्यक्ष डॉ.विष्णुदास भंडारी हे उपस्थित होते. हा गौरव सर्वांच मनोबल वाढवणारा तसेच सामाजिक कार्य आणखी जोमाने करण्यासाठी प्रेरणादायी आहे असं मत शाखेचे सेक्रेटरी डॉ.शैलेश पडगीलवार यांनी मांडले .

# औसा न.प.च्या २४ जागासाठी ८४ उमेदवार रिंगणात

### अखेरच्या दिवशी १६ उमेदवारांची माघार । नगराध्यक्ष पदासाठी सहा जण आखाड्यात

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, २२ नोव्हेंबर :** औसा नगरपालिकेच्या एक नगराध्यक्ष व २३ नगरसेवकांच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष, शिवसेना महायुती, राष्ट्रवादी काग्रेस,काँग्रेस, राष्ट्रीय समाज पक्ष, उध्दव ठाकरे शिवसेना, बहुजन समाज पार्टी, एमआयएम, ओबीसी बहुजन आघाडी, वंचित बहुजन आघाडी, समाजवादी पार्टी,अपक्ष व बहुजन समाज पार्टी कडून ८४ उमेदवार नगरसेवक आणि नगराध्यक्ष पदासाठी निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. यामध्ये ६ नगराध्यक्ष पदासाठी निवडणुकीच्या रिंगणात उभा आहेत.

औसा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी सर्वचृ पक्षातील इच्छुकांनी उमेदवारीची मागणी करीत उमेदवारी अर्ज दाखल केले. नेतेमंडळीनी नऊ वर्षानंतर होणाऱ्या



या निवडणुकीतील इच्छुकांच्या गर्दीतील अनेकांची मनधरणी करीत कांही जणांना थांबवले. तर कांहीना उमेदवारी मागे घेण्यात यश मिळवले. यामुळे प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर होर्णाय्रा या निवडणुकीत बंडखोरी टळली आहे. यामुळे आखाड्यातील उमेदवारांची संख्या कमी झाली आहे.

या निवडणुकीत एक नगराध्यक्ष पदासाठी ओबीसी महिला आरक्षण असल्याने यासाठी परवीन नवाबोद्दीन शेख राष्ट्रवादी काँग्रेस, डा. ज्योती महादेव बनसुडे भाजपा, मंजुषा रुपेष माडजे उध्दव ठाकरे शिवसेना, अमृता अविनाश खुरपे राष्ट्रीय समाज पक्ष, संध्या किसन कठारे अपक्ष, खाजाबी महेमुद लोणे बहुजन समाज पार्टी अशा सहा महिलामध्ये लढत होणार आहे.

११प्रभागातून २३ जागासाठी ७८ उमेदवार रिंगणात असून सर्वच प्रभागातून तुल्यबळ लढती पहावयास मिळणार आहे. यामध्ये प्रभाग दोन, प्रभाग चार, प्रभाग सहा, प्रभाग नऊ, प्रभाग दहा यातील लढतीकडे नेतेमंडळीचे लक्ष लागले आहे.

# मयत खातेदारांच्या वारसांना विमा योजनेचा दिलासा

### अपघाती विम्यातून ५० हजारांचा लाभ; महाराष्ट्र ग्रामीण बँक वलांडी शाखेची माहिती

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, २२ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील वलांडी येथील मयत चंद्रशेखर महाजन यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना कार्यान्वित केली होती. त्यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूनंतर या योजनेअंतर्गत त्यांच्या पत्नी सत्यवती महाजन यांच्या खात्यात २ लाख रुपये जमा करण्यात आले आहेत.

याशिवाय, पीक कर्ज घेताना काढण्यात येणाऱ्या अपघाती विमा योजनेतूनही महाजन कुटुंबाला ५० हजार रुपये अतिरिक्त मिळाले आहेत. या दोन्ही विमा रकमेच्या माध्यमातून मृत व्यक्तीच्या कुटुंबाला आर्थिक दिलासा मिळून त्यांच्या संकट काळात मोठा हातभार मिळाला आहे.




महाराष्ट्र ग्रामीण बँक, वलांडी शाखेचे व्यवस्थापक भगवान संवडकर यांनी माहिती देताना सर्व खातेदारांना आवाहन केले की, फक्त २० रुपयांचे प्रीमियम असलेली प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना नक्की कार्यान्वित करा. अचानक अपघात, अपंगत्व किंवा मृत्यू यांसारख्या परिस्थितीत कुटुंब आर्थिक संकटात सापडू नये, यासाठी ही योजना अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. संवडकर यांनी पुढे सांगितले की, बँकेमार्फत ४३६ रुपये मधे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना, तसेच इतर सामाजिक सुरक्षा योजना देखील सुरू आहेत. सर्व खातेदारांनी या योजनांचा लाभ घेऊन आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र ग्रामीण बँक वलांडी शाखेच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागात विमा योजनांचे महत्त्व आणि त्यातून मिळणारे संरक्षण पुन्हा ठळकपणे समोर आले आहे.

## धनेगावमध्ये अभ्यासासाठी अभिनव उपक्रम; मोबाईल कॉलिंग मध्यरात्री

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, २२ नोव्हेंबर :** श्री महादेव विद्यालय, धनेगाव (ता. देवणी) येथील शिक्षक महाजन बळवंत यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अनोखा आणि परिणामकारक असा अभ्यासाची खात्री-मोबाईल कॉलिंग मध्यरात्री हा उपक्रम राबवून उल्लेखनीय उदाहरण निर्माण केले आहे.



विद्यार्थ्यांच्या अभ्यासात सातत्य राहावे, जबाबदारी वाढावी आणि परीक्षेच्या तयारीत शिस्त यावी यासाठी दररोज रात्री बारा ते एक या वेळेत ते विद्यार्थ्यांना फोन करून त्यांच्या अभ्यासाची स्थिती जाणून घेतात. अभ्यास करीत असलेल्या विद्यार्थ्यांना ते प्रोत्साहन देतात, तर कोणतीही अडचण असल्यास त्यांचे त्वरित मार्गदर्शन करतात.

या उपक्रमाबाबत बोलताना महाजन म्हणाले, समाजामध्ये सर्वत्र विद्यार्थी मोबाईल वापराबाबत आरडाओरड सुरू असताना, याच तंत्रज्ञानाचा योग्य वापर देखील करता येऊ शकतो. याच्याच माध्यमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता देखील वाढवता येऊ शकते हे सिद्ध करण्यासाठी हा नवोपक्रम देवणी तालुक्यातील धनेगाव येथे सुरू आहे. विद्यार्थ्यांना शांत वेळेत अभ्यासाची सवय लागावी, तसेच त्यांच्यात जबाबदारीची भावना दृढ व्हावी, हा मुख्य उद्देश आहे. शिक्षकाचा कॉल येणार आहे हे माहित असल्याने विद्यार्थी स्वतःहून वेळ पाळून अभ्यास करतात.

उपक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शिक्षक मध्यरात्री संपर्क साधून मुलांच्या अध्ययनाची चौकशी करतात, ही आमच्यासाठीही प्रेरणादायी बाब आहे. मुलांमध्ये अभ्यासाबाबत गंभीरता वाढली आहे, असे काही पालकांनी सांगितले. शाळेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासातील सातत्य, आत्मविश्वास आणि वेळेचे नियोजन विकसित होत असून परीक्षेच्या निकालावरही याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे.

## साने गुरुजी विद्यालयात नशा मुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** शहरातील अवंती नगर भागातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी नशा मुक्त भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना नशा विरोधी शपथ देण्यात आली.

समाज आणि देशाच्या विकासात युवा पिढीचा वाटा महत्त्वाचा असल्याने विद्यार्थ्यांमध्ये नशा विरोधी जनजागृती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

या प्रसंगी सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहिक हिंदी आणि इंग्रजी भाषेत शपथ घेतली. शपथेत नमूद केल्याप्रमाणे स्वतः, मित्र, कुटुंब आणि समाजाला नशे पासून दूर ठेवण्यासाठी कटिबद्ध राहू व बदलाची सुरुवात स्वतःपासून करू, असा दृढ निर्धार विद्यार्थ्यांनी घेतला.

विद्यार्थ्यांमध्ये नशा विरोधी जनजागृती, जबाबदारी आणि सकारात्मक सामाजिक मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# खानापुरा येथे २६ नोव्हेंबरपासून मैलारा मल्लन्ना देवरा मेळ्याला सुरुवात-महिनाभर विविध धार्मिक कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, २२ नोव्हेंबर :** भालकी तालुक्यातील खानापुरा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही मैलारा मल्लन्ना देवरा मेळा मोठ्या उत्साहात भरत असून, हा भव्य जत्रा महोत्सव २६ नोव्हेंबर ते २६ डिसेंबर या काळात पार पडणार आहे. महिनाभर चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात विविध पालखी उत्सव, देवमूर्तींच्या भव्य मिरवणुका आणि पारंपरिक विधींनी भक्तिमय वातावरण रंगणार आहे.

२६ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजता मल्हारी-मालासकांते आणि भानू यांच्या विवाहसोहळ्याने जत्रेचा औपचारिक शुभारंभ होईल. दरवर्षीप्रमाणे या शुभारंभी कार्यक्रमाला भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित आहे.

महिनाभर विविध धार्मिक कार्यक्रम





मेळ्याच्या कालावधीत खालीलप्रमाणे विशेष मिरवणुका व पालखी उत्सव आयोजित करण्यात आले आहेत: ३० नोव्हेंबर, रात्री ८.३०: पालखी उत्सव आणि नंदीवरील देवमूर्तीची मिरवणूक, ४ डिसेंबर, रात्री ८.३०: मोरावर असलेल्या देवमूर्तीची भव्य मिरवणूक, ७ डिसेंबर, रात्री ८.३०: पालखी उत्सव आणि घोड्यावर असलेल्या देवमूर्तीची मिरवणूक, १४ डिसेंबर: पालखी उत्सव आणि हत्तीवरील देवमूर्तीची मिरवणूक, २१ डिसेंबर: पालखी उत्सव आणि नंदीवरील देवमूर्तीची मिरवणूक या सर्व मिरवणुकांना स्थानिकांसह परिसरातील हजारो भाविक मोठ्या भक्तीभावाने सहभागी होणार आहेत.

या वर्षीच्या मैलारा मल्लन्ना जत्रा महोत्सवाचा समारोप २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.

मल्लण्णा मंदिराचे प्रशासक मुकुल जैन तसेच कार्यकारी अधिकारी अनंतराव कुलकर्णी यांनी सर्व भाविकांना या भव्य जत्रा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मैलारा मल्लन्ना देवाचे दर्शन घेण्याचे आवाहन केले आहे.

## हवाप्पा स्वामी यांचे निधन



**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, २२ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील कवठाळा येथील हवप्पा गुंडाप्पा स्वामी वय ८५ यांचे शनिवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी आज रविवारी दुपारी एक वाजता कवठाळा येथील शेतात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी चार मुली, एक मुलगा सुन, नातवंडे असा परिवार आहे. ते कवठाळा सोसायटीचे गेल्या ४० वर्षापासूनचे सदस्य होते.

# आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे चिरंजीव मल्हार पाटील यांच्या विवाह सोहळ्यास मुख्यमंत्र्यांची उपस्थिती

## मल्हार पाटील, डॉ. साक्षी विवाहबद्ध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले आशीर्वाद...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ नोव्हेंबर -**

तुळजापूरचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे चिरंजीव मल्हार पाटील यांचा विवाह सोहळा शनिवारी तुळजापूर शहरानजीक मुदगलेश्वर मंदिरात मंगलमय वातावरणात संपन्न झाला.

या विवाह सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानसभा अध्यक्ष अँड. राहुल नार्वेकर व पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्रीपंकजा मुंडे यांच्यासह अर्चनाताई पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे यांच्यासह राज्यातील दिग्गज नेते, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवदाम्पत्याला शुभाशीर्वाद दिला तसेच आ. पाटील यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# नळदुर्गमध्ये श्री खंडोबा देवाचे पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी आगमन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२२ नोव्हेंबर -**

सालाबादाप्रमाणे याही वर्षी श्री खंडोबा देवाचे (श्रीक्षेत्र मैलारपुर) पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी दि. २२ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता नळदुर्ग नगरीत वाजतगाजत, अत्यंत भक्तिमय वातावरणात आगमन झाले. देवाच्या आगमनानंतर नळदुर्गकरांनी रोडवर रांगा लावून मोठ्या उत्साहात स्वागत केले.

यापूर्वी रात्री १० वाजता नळदुर्गचे मानकरी व नागरिक वारुंसह अणदुर येथे देवाला आणण्यासाठी रवाना झाले होते. अणदुर मंदिरात नळदुर्ग आणि अणदुर मानकरी यांच्यात ठरलेल्या परंपरेनुसार देव आणण्याचा व परत नेण्याचा लेखी करार आणि मानपानाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर अणदुरच्या मानकऱ्यांनी श्री खंडोबा देव नळदुर्गच्या मानकऱ्यांच्या ताब्यात सोपवला.



यानंतर पालखी सोहळ्यासह, ढोल-ताशांच्या गजरात, वारुंसह मिरवणूक काढत श्री खंडोबा देवाचे श्रीक्षेत्र मैलारपुर येथे आगमन करण्यात आले. पहाटेपासूनच नागरिक मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून देवदर्शनाची प्रतीक्षा करत होते. महिलांनी पारंपरिक पद्धतीने आरत्या ओवाळून स्वागत केले. पहाटे ५ वाजता श्री खंडोबा देवाचे श्रीक्षेत्र मैलारपुर येथील मंदिरात आगमन झाले व तत्काळ मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा पार पडला. आता जवळपास पावणेदोन महिने श्रीक्षेत्र मैलारपुर येथे देवाचे वास्तव्य असणार आहे. या कालावधीत दर रविवारी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळते.

यंदाच्या वर्षी २,३ आणि ४ जानेवारी २०२६ रोजी श्री खंडोबा देवाची यात्रा भरणार असून महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणा राज्यातून ५ ते ६ लाख भाविक येण्याची अपेक्षा आहे.

## गंधोरा येथे शेतातील उसाला आग

**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

गंधोरा शिवारातील गट क्रमांक ४५ मध्ये उसाला आग लावून नुकसान केल्याप्रकरणी तीन जणांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नामदेव धर्मा राठोड, शांताबाई नामदेव राठोड आणि सविता नामदेव राठोड (सर्व रा. गंधोरा) यांनी मागील भांडणाच्या रागातून फिर्यादी सतिश शहाजी भोसले यांच्या सुनेच्या उसाला आग लावून पिक जाळले. या आगीत उसासह पिव्हीसी पाईप व स्प्रिंकलर पाईप जळून अंदाजे ४,००,००० चे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### मुरूम शहराचा भावी नगराध्यक्ष कोण होणार?

# काँग्रेसची सत्तेची परंपरा खंडीत; काँग्रेस प्रेमी कुणाला देणार कौल

**तभा वृत्तसेवा / महेश निंबरगे**
**मुरूम, दि.२२ नोव्हेंबर -**

गेल्या ३९ वर्षांपासून मुरूम नगर परिषदवर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची सत्ता कायम राहिलेली आहे. मुरूम पालिकेचा नगराध्यक्ष म्हणून काँग्रेसच्या उमेदवारानीच पद भूषवले आहेत. मात्र आता काँग्रेसचा उमेदवार नगराध्यक्ष पदाच्या निवडणूक मैदानात नाही. त्यामुळे पालिकेवरील काँग्रेसची सत्तेची परंपरा यावेळी संपुष्टात येणार आहे. मात्र शहरात काँग्रेसला मानणारा गट आहे. त्यामुळे काँग्रेसप्रेमी कुणाला कौल देणार हे पहावे लागेल व नगराध्यक्ष म्हणून कोणत्या पक्षाचा उमेदवार पालिका सभागृहात विराजमान होणार याविषयी चर्चा सुरू आहे.

मुरूम शहर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. मात्र काँग्रेस नेते बसवराज पाटील व बंधू बापुराव पाटील यांनी भारतीय जनता पार्टीत पक्षांतर केल्याने शहरातील काँग्रेस पक्ष निराधार झाली आहे. त्यामुळे शहरातील काँग्रेसप्रेमी मोठ्या नेतृत्वाच्या प्रतिक्षेत आहेत. सध्या नगर परिषदची निवडणूक लागल्याने काँग्रेसचे कार्यकर्ते नगराध्यक्ष पद वगळता केवळ ३ जागेवर नगरसेवक म्हणून निवडणुकीला सामोरे जात आहेत. या तीन उमेदवारांच्या पारड्यात काँग्रेसप्रेमी मतदार किती मते देतील हे पहावे लागेल. तर इकडे पाटील यांनी केलेल्या पक्षांतरामुळे भारतीय जनता पार्टी ही शहरातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. या पक्षाच्या तिकिटावर नगराध्यक्ष पदासाठी बापुराव पाटील स्वतः निवडणूक लढवत आहेत तर २० सदस्यांच्या जागेसाठी भाजपकडून २० उमेदवार मैदानात आहेत. पाटील हे स्वतः निवडणूक रिंगणात आहेत. ते भाजपात प्रवेश केल्याने काँग्रेसला मानणारा व शहरातील विशिष्ट गटात नाराजगी असल्याचे जनता बोलून दाखवत आहे. त्यामुळे पाटील यांना हा विषय सहज हाताळावे लागणार आहे. दरम्यान राजकीय व सामाजिक क्षेत्राचा मोठा अनुभव असल्याने नगराध्यक्ष पद मिळवतील असे त्यांचे कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत.






त्याचप्रमाणे शिंदे गटाच्या शिवसेनाकडून चंद्रशेखर मुदकण्णा नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आहेत. या पक्षाकडून नगरसेवक पदासाठी केवळ ६ उमेदवार असून यामध्ये मुदकणा हे स्वतःही नगरसेवक पदाचे उमेदवार आहेत. मुदकणा यांनी नगर परिषदचे नगरसेवक म्हणून बऱ्याचदा पद भूषवले आहेत. राजकारणाचा अनुभव असलेले राजकीय व्यक्ती आहेत त्यामुळे नगराध्यक्ष पद मिळवण्यासाठी ते कसे प्रयत्न करतात हे पहावे लागेल. इकडे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या तिकिटावर माजी नगरसेवक अजित चौधरी नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक मैदानात आहेत. यापूर्वी नगर परिषदचे नगरसेवक म्हणून काम करत असताना सामाजिक क्षेत्रात अनेक उपक्रम राबवले आहेत. युवा नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. विशेष म्हणजे मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाला शहरातून चांगल्याप्रकारे मतदान मिळवून दिल्याचे त्यांचे कार्यकर्ते सांगत आहेत. त्यामुळे आता होऊ घातलेल्या निवडणुकीत ते स्वतः कितपत यशस्वी होतात हे पहावे लागेल. दरम्यान नगराध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत रंगणार असे चित्र होते. मात्र गेल्या तीन वर्षांपासून शहरात समाजसेवक म्हणून ओळखले जाणारे सिद्धलिंग हिरेमठ यांनी अपक्ष म्हणून नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवत आहेत. त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची पावती जनता देणार आहे, असे गृहीत धरून मतदारांच्या भेटी व प्रचाराला चांगलीच जोर लावले आहेत.

त्यामुळे नगराध्यक्ष पदाची निवडणूक ही चौरंगी लढतीचे चित्र दिसत आहे. आता या लढतीत मतदारांचे मत कोण मिळवणार आणि नगराध्यक्ष कोण होणार? हे मतमोजणी नंतर स्पष्ट होईल.

# धाराशिव येथे जिल्हा युवा महोत्सव उत्साहात संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सन २०२५-२६ चा जिल्हा युवा महोत्सव पुष्पक मंगल कार्यालय, धाराशिव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या महोत्सवात सांस्कृतिक विभागांतर्गत समूह लोकगीत, समूह लोकनृत्य, चित्रकला, कथा लेखन, कविता लेखन, वक्तृत्व तसेच नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी परीक्षक म्हणून प्रा. मिलींद माने, प्रा.डॉ. उमेश सलगर, डॉ. उषा कांबळे, सतिश ओव्हाळ, शशिकांत माने, डॉ. विनोदकुमार वायचळ, प्रा. डॉ. वैभव आगळे, प्रा. सुर्यकांत कापसे, भोसले, गांगुर्डे, डॉ. होळंबे, डॉ. ननवरे, डी.जी. वाघमारे, समीर माने, डी.सी. पौळ व्ही.पी. नागापूरे व एम.ए. चौधरी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

प्रथमः जान्हवी केव्हीजी (टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूर), द्वितीय : आज्ञाशा पंडा, तृतीय : समीर मजनू शेख (तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव). कथा लेखन प्रथम : कोळगे स्वरुपा अशोक (तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय), द्वितीय : उंबरे किरण सूर्यकांत (श्रीपतराव भोसले मावउमावि, धाराशिव), तृतीय : आदमिले वैष्णवी धर्मराज (व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय). कविता लेखन प्रथम : सूर्यवंशी वैभवी तानाजी (व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय), द्वितीय : पडवळ वैष्णवी अमरसिंह (श्रीपतराव भोसले मावउमावि) तृतीय : वाघमारे वैष्णवी युवराज (छ. संभाजीराजे कनिष्ठ महाविद्यालय, बेंबळी). चित्रकला स्पर्धा प्रथम : गुरु रवि देशमुख (शरद पवार हायस्कूल, धाराशिव), द्वितीय : जगदीश बसवराज सुतार (तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय) तृतीय : गौरी हनुमंत सुतार (तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय) समूह स्पर्धा समूह लोकनृत्य प्रथमः के. टी. पाटील कॉलेज ऑफ फॉर्मसी, धाराशिव, द्वितीयः श्री तुळजाभवानी सैनिकी मावउमावि, तुळजापूर. समूह लोकगीत प्रथम : व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव, द्वितीय : के. टी. पाटील कॉलेज ऑफ फॉर्मसी, तृतीय : व्होकेशनल महाविद्यालय, धाराशिव. नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) प्रथम : श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय, तुळजापूर, द्वितीय : शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, धाराशिव, तृतीय : तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव, तृतीयः शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव.

जिल्ह्यातील विविध महाविद्यालये, शाळा व युवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. युवा कलागुणांना व्यासपीठ देणारा व सर्जनशीलतेला चालना देणारा हा महोत्सव अत्यंत यशस्वीपणे पार पडल्याची प्रतिक्रिया आयोजकांनी दिली.

# श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये मुलींच्या सुरक्षतेबाबत जनजागृती निमित्त संवाद



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये प्रशालेतील इयत्ता आठवी ते दहावीच्या तब्बल १००० मुलीसमोर भरोसा सेल तथा महिला व मुलींच्या छेडछाडीविरोधी पथकातील सदस्य दीपक लाव्हरे पाटील यांनी संवाद साधला.

महाराष्ट्रात वारंवार होणाऱ्या महिला व मुलींच्या छेडछाडीच्या तथा अत्याचाराचा घटना या पार्श्वभूमीवर या व्याख्यानाचे आयोजन प्रशाला व पोलीस विभागाच्या यांच्या संयुक्त वतीने करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, पर्यवेक्षिका श्रीमती बी.बी. गुंड, महिला शिक्षिका व विदयार्थिनी मोठया संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

याप्रसंगी मुलींना निर्भय रहा, महिला व मुलीबाबतचे कायदे यांची माहिती घ्या, आपल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवा, पोलिसांशी तात्काळ संपर्क साधवा , पालक व शिक्षकांना आपल्या अडचणी, त्रास सांगावा, पोलीस यंत्रणा आपल्यासाठी २४ तास महिला व मुलीच्या छेडछाडीविरोधी पथकाच्या रुपाने काही मिनिटांत धावून येईल, असे आश्वासन पाटील त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांचे धाराशिवात आगमन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दुपारी १ वाजता धाराशिव विमानतळावर हेलिकॉप्टरने आगमन झाले. आगमन प्रसंगी त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी त्यांच्या समवेत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचेही आगमन झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी पोलीस अधीक्षक रितू खोखर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एन.व्ही. भंडे, कार्यकारी अभियंता केत तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# ढोकीत जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून आंदोलन

## १३ आरोपींसह अज्ञातांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ नोव्हेंबर -**

जिल्हाधिकारी धाराशिव यांनी लागू केलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून बेकायदेशीर जमाव जमवून आंदोलन केल्याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात १३ आरोपींसह इतर पाच अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.५० ते १२.२० या वेळेत ढोकी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात उसाचा दर घोषित करण्याच्या मागणीसाठी आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून रस्त्यावर बसून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केला. जमावबंदी आदेश लागू असताना आदेशाचा भंग करत आंदोलन करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी आरोपींची नावे पुढीलप्रमाणे - रविंद्र भिमाशंकर इंगळे, धनंजय तानाजी पेंदे (दोघे रा. तुळजापूर), निखली संदीप लोमटे, चंद्रकांत सुरेश भोरे, संजय नामदेव लोमटे, व्यंकट महादेव लोमटे, तानाजी रंगनाथ थोडसरे, सतिश लोमटे (सर्व रा. थोडसरवाडी), सचिन शिवाजी देवकते, तानाजी पिंपळे (दोघे रा. तेर),राहुल देटे (रा. रुई ढोकी), विष्णु काळे (रा. शिराढोण) तसेच इतर ५ अज्ञात इसम. फिर्यादी धोंडुतात्या सांगळे, पोलीस अमलदार यांनी दिलेल्या प्रथम खबरीनुसार ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जाहीर प्रगटन

धाराशिव जिल्ह्यातील विशेषतः कळंब तालुका व आसपासच्या परिसरातील तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, जाहीर नोटिस देणार शहाजी आनंतराव डोके हे मूलतः मौजे सापनाई ता. कळंब जि. धाराशिव येथील रहिवाशी असून सापनाई शिवारातील जमीन गट क्र. १७० पैकी ०१ हे १० आर क्षेत्र नोटिस देणार यांचे वडीलोपार्जित व एकत्र कुटुंबाचे क्षेत्र आहे. सदर क्षेत्रावर जाहीर नोटीस देणार व त्यांचे कुटुंबाची उपजीविका अवलंबून आहे.

जाहीर प्रगटण कर्ता शहाजी यांनी त्याचे वैयक्तिक गरजा भागविण्यासाठी सापनाई गावातील नारायण बलभीम कुलकर्णी यांचे कडून व्याजचे मोबदल्यात कर्जाऊ रक्कम घेतली होती. तसेच नारायण कुलकर्णी यांचे अटीप्रमाणे कर्जास तारण म्हणून वरील नमूद क्षेत्रापैकी ०१ हे ०४ आर क्षेत्राचा विनाताबा तारण दस्त/नोंदणीकृत दस्त करून दिलेला होता. जाहीर प्रगटण कर्ता शहाजी यांनी नारायण कुलकर्णी यांचे संपूर्ण कर्ज व्याजासह फेडलेले आहे, परंतु नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबीय विनाकारण अतिरेकी व्याजाची मागणी करत असल्यान नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबीय विरुद्ध जाहीर नोटीस देणार शहाजी यांनी सावकारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही केलेली असून सदर दावा जिल्हा सहनिबंधक साहेब (DDR) धाराशिव याचे समोर न्यायप्रवीष्ठ आहे.

सदर गट क्र. १७० क्षेत्र ०१ हे १० आर या शेतजमिनीवर जाहीर प्रगटण देणार व त्यांचे कुटुंबियांचा ताबा होता व आहे. परंतु वरील नमूद तारण दस्ता आधारे नारायण कुलकर्णी यांनी ७/१२ पत्रकी व महसूल दफ्तरी स्वतःचे नावची खोटी व चुकूची नोंद करवून घेतलेली असून सदर नोंदीचा व दस्ताचा गैरफायदा घेऊन नारायण कुलकर्णी संपूर्ण मिळकत हस्तांतरित करण्याचे प्रयत्नात असल्याचे समजते. तसेच बनावट कागदपत्रा आधारे खाजगी फायनान्स कंपनी कडून कर्ज घेतलेले असल्याचे समजते. सदर कर्ज देणार यांचा व सदर कर्जाचा आमच्याशी वा आमचे मिळकतीशी कसलाही हक्क संबंध नाही वा सदर गैरप्रकारास आम्ही बांधील नाही. परंतु सदर क्षेत्राशी कसलाही हक्कसंबंध नसताना केवळ ७/१२ पत्रकी झालेल्या चुकूच्या नोंदीचा गैरफायदा घेऊन नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबीय सदर मिळकत गुंड व भांडखोर व्यक्तींना विक्रीचे उद्देशाने दाखवत आहे व अश्या व्यक्तींपासून आमचे आशिलाचे जीवितास व मालमत्तेस धोका आहे.

तरी या जाहीर नोटिसद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे सापनाई, ता. कळंब जि. धाराशिव शिवारातील शेतजमीन गट क्र. १७० पैकी ०१ हे ०४ आर क्षेत्राबाबत नारायण बालभीम कुलकर्णी वा त्यांचे कुटुंबीयांशी कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, करार, मदार, इत्यादि कोणत्याही प्रकारचे हस्तांतर अथवा नोंदणीकृत वा अनोंदणीकृत दस्त करू नये, केल्यास तो माझे हक्कावर बंधनकारक राहणार नाही व मला नाइलाजाने आपणाविरुद्धा कायदेशीर कार्यवाही करावी लागेल.

**सबब हे जाहिर प्रगटन दिले असे.**
दि. २३/११/२०२५

तर्फे
**ॲड. ए.ए. देशमुख**
धाराशिव

**जाहीर प्रगटण देणार**
**शहाजी आनंतराव डोके**

## जाहीर प्रगटन

धाराशिव जिल्ह्यातील विशेषतः कळंब तालुका व आसपासच्या परिसरातील तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, जाहीर जाहीर नोटिस देणार बाळकृष्ण आनंतराव डोके हे मूलतः मौजे सापनाई ता. कळंब जि. धाराशिव येथील रहिवाशी असून सापनाई शिवारातील जमीन गट क्र. १७३ पैकी ०१ हे ६० आर क्षेत्र नोटिस देणार यांचे वडीलोपार्जित व एकत्र कुटुंबाचे क्षेत्र आहे. सदर क्षेत्रावर जाहीर नोटीस देणार व त्यांचे कुटुंबाची उपजीविका अवलंबून आहे.

जाहीर प्रगटण कर्ता शहाजी यांनी त्याचे वैयक्तिक गरजा भागविण्यासाठी सापनाई गावातील नारायण बलभीम कुलकर्णी व त्यांचे कुटुंबीय यांचे कडून व्याजचे मोबदल्यात कर्जाऊ रक्कम घेतली होती. तसेच नारायण कुलकर्णी यांचे अटीप्रमाणे कर्जास तारण म्हणून वरील नमूद क्षेत्रापैकी ०१ हे क्षेत्र त्याची मुलगी नामे सिमा देवीदास कुलकर्णी यांचे नावे तर ६० आर क्षेत्र त्याची पत्नी लक्ष्मी नारायण कुलकर्णी हिचे नावे विना ताबा तारण दस्त/नोंदणीकृत दस्त करून दिलेला होता. जाहीर प्रगटण कर्ता बाळकृष्ण यांनी नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबियांचे यांचे संपूर्ण कर्ज व्याजासह फेडलेले आहे, परंतु नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबीय विनाकारण अतिरेकी व्याजाची मागणी करत असल्याने नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबीय विरुद्ध जाहीर नोटीस देणार बाळकृष्ण यांनी सावकारी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही केलेली असून सदरचे दाव्या मध्ये सिमा देवीदास कुलकर्णी व लक्ष्मी नारायण कुलकर्णी यांचे सह नारायण कुलकर्णी हे गैरअर्जदार/प्रतिवादी आहेत. सदर दोन्ही दावे जिल्हा सहनिबंधक साहेब (DDR) धाराशिव याचे समोर न्यायप्रवीष्ठ आहे.

सदर गट क्र. १७३ क्षेत्र ०१ हे ६० आर या शेतजमिनीवर जाहीर प्रगटण देणार व त्यांचे कुटुंबियांचा ताबा होता व आहे. परंतु वरील नमूद तारण दस्ता आधारे सिमा व लक्ष्मी कुलकर्णी यांनी ७/१२ पत्रकी व महसूल दफ्तरी स्वतःचे नावची खोटी व चुकूची नोंद करवून घेतलेली असून सदर नोंदीचा व दस्ताचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी/गैरअर्जदार सिमा व लक्ष्मी ह्या संपूर्ण मिळकत हस्तांतरित करण्याचे प्रयत्नात असल्याचे समजते. तसेच बनावट कागदपत्रा आधारे खाजगी फायनान्स कंपनी कडून कर्ज घेतलेले असल्याचे समजते. सदर कर्ज देणार यांचा व सदर कर्जाचा आमच्याशी वा आमचे मिळकतीशी कसलाही हक्क संबंध नाही वा सदर गैरप्रकारास आम्ही बांधील नाही. परंतु सदर क्षेत्राशी कसलाही हक्कसंबंध नसताना केवळ ७/१२ पत्रकी झालेल्या चुकूच्या नोंदीचा गैरफायदा घेऊन नारायण कुलकर्णी व त्याचे कुटुंबीय सदर मिळकत गुंड व भांडखोर व्यक्तींना विक्रीचे उद्देशाने दाखवत आहे व अश्या व्यक्तींपासून आमचे आशिलाचे जीवितास व मालमत्तेस धोका आहे.

तरी या जाहीर नोटिसद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, मौजे सापनाई, ता. कळंब जि. धाराशिव शिवारातील शेतजमीन गट क्र. १७३ पैकी ०१ हे ६० आर क्षेत्राबाबत नारायण बालभीम कुलकर्णी वा त्याची पत्नी लक्ष्मी नारायण कुलकर्णी, मुलगी नामे सिमा देवीदास कुलकर्णी यांचेशी कोणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, गहाण, दान, करार, मदार, इत्यादि कोणत्याही प्रकारचे हस्तांतर अथवा नोंदणीकृत वा अनोंदणीकृत दस्त करू नये, केल्यास तो माझे हक्कावर बंधनकारक राहणार नाही व मला नाइलाजाने आपणाविरुद्धा कायदेशीर कार्यवाही करावी लागेल.

**सबब हे जाहिर प्रगटन दिले असे.**
दि. २३/११/२०२५

तर्फे
**ॲड. ए.ए. देशमुख**
धाराशिव

**जाहीर प्रगटण देणार**
**बाळकृष्ण आनंतराव डोके**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शहरातील पार्किंगला शिस्त लागणार तरी केव्हा?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** लातूर शहरातील मुख्य बाजारपेठेतील पार्किंगला शिस्त लागणार तरी केव्हा? असा प्रश्न वाहनधारकांतून उपस्थित केला जात आहे. शहराच्या मुख्य बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर म्हणजे हनुमान चौकापासून गंज गोलाईपर्यंत पार्किंगसाठी सम विषम तारखा ठरवून देण्यात आल्या होत्या. त्याप्रमाणे काही काळ शिस्त पाळली गेली. आता पुन्हा समविषमची शिस्त न पाळता रस्त्याच्या दोन्ही बाजुंना वाहने लावली जात असल्याचे दिसून येते. तसेच पार्किंगसाठीच्या जागेवर हातगाडीवालेही बऱ्याच ठिकाणी जागा अडवून बसलेले दिसून येतात. वाहनधारक वाहन लावण्यासाठी जागेचा शोध घेत असतानाही हातगाडीवाले जसे काही ते जेथे थांबतात त्या जागेचे भाडे भरत असल्याप्रमाणे वाहनधारकांना जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्नही करत नाहीत. गंज गोलाईतही अर्ध्याहून अधिक रस्ता अतिक्रमण केलेल्या हातगाडेवाल्यानी बळकावलेला असल्याने पार्किंगसाठी उपलब्ध करून दिलेल्या जागेवरहीवाहने पार्क जिकिरीचे बनल्याचे पाहावयास मिळते. त्यामुळे किमान मुख्य बाजारपेठेतील पार्किंगला तरी लवकरात लवकर शिस्त लावण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाने करावा, अशी मागणी होत आहे.



# विलासराव देशमुख मार्ग बनलाय अनाधिकृत कचऱ्याचे आगार !

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** स्वच्छता आणि लातूर शहराचा दुरान्वयेही संबंध नसल्याचे शहर व परिसरातील एकंदर स्वच्छतेच्या कारभारावरून दिसून येते. शहराच्या चारही बाजुंनी असणाऱ्या वळण रस्त्यावर कचरा टाकून नागरिकांच्या आरोग्यास बाधा पोहोचवण्याचा होत असलेला प्रयत्न ऐरणीवर असतानाच आता शहराच्या अगदी भर वस्तीत विलासराव देशमुख मार्गावर रस्त्यालगत कचरा टाकला जात असल्याचे असंख्य लातूरकर उघड्या डोळ्यांनी पाहत आहेत. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या नावे उभारण्यात आलेला हा मार्गच अनधिकृत कचऱ्याचे आगार बनल्याचे पाहण्याची वेळ लातूरकरांवर येऊन ठेपली आहे.

स्वच्छ लातूर सुंदर लातूर असे बोलताना, सांगताना अतिशय गोड वाटत असले तरी प्रत्यक्षात तसे आहे का? असा प्रश्न कोणीही सुजाण नागरिकाने उपस्थित करावा अशी लातूर शहरातील परिस्थिती आहे. शहर महानगरपालिकेचा आणि स्वच्छतेचाही जणू अर्थाअर्थी काहीही संबंध नसल्याचे जाणवते. लातूर मनपाचा कार्यकाळ समाप्त होऊन आता तीन साडेतीन वर्षे उलटत आहेत. त्यामुळे या दरम्यान मनपाचा कारभार प्रशासकांच्याच हातात आहे. अजूनही मनपाचा निवडणूक कार्यक्रम घोषित होण्यास अवधी असल्याने किमान आणखी चार पाच महिने हे प्रशासकराज कायम राहण्याची शक्यता आहे. तोपर्यंत लातूरवासियांना अशा अनेक प्रश्नांना तोंड देत दिवस काढावे लागणार आहेत.

लातूर शहरातील असा कोणताही भाग, परिसर नाही, ज्या ठिकाणी अनधिकृत ठिकाणी कचरा टाकला जात नाही. शहराच्या अंतर्गत भागात ही बाब फारशी आक्षेपार्ह मानली जात नसली तरी मुख्य रस्ता वा मुख्य रस्त्याला समांतर असणाऱ्या रस्त्यावर, रस्त्यालगत कचरा टाकला जात असेल तर नक्कीच योग्य दिसणार नाही. याचा विचार मनपाच्या स्वच्छता विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी करायला हवा.



लातूर शहरातील मुख्य रस्ता सोडून दुसरा रस्ता जुन्या रेल्वे लाईन परिसरातून काढण्यात आला आहे. या रस्त्याला दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांचे नाव देण्यात आले आहे. या रस्त्यालगत ठिकठिकाणी अस्वच्छता पाहावयास मिळते. हे तर काहीच नाही, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्यालयाच्या अगदी पाठीमागच्या बाजूस शहराच्या अन्य भागातून संकलित करून आणलेलाकचरा टाकला जात असल्याचे पाहावयास मिळते. हा प्रकार मागच्या अनेक दिवसांपासून आहे.

लातूर शहरातील वाहतूक कोंडी वाढल्याने या रस्त्यावरही आता कायम वाहतुकीची वर्दळ असते. पूर्वी हा रस्ता जास्त वापरात नसल्याने कचरा टाकण्याचा विषय फारसा चर्चिला गेला नाही. आता या रस्त्यावरही कमालीची वाहतूक वाढल्याने जिल्हा बँकेच्या मागच्या भागात टाकल्या जाणाऱ्या या कचऱ्याने या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. या भागातून जाताना प्रत्येक वाहनधारकाला नाक बंद करून किंवा नाकाला रुमाल बांधूनच जावे लागत आहे. या वाढत्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्नही निर्माण होण्याची भीती बळावत चालल्याचे दिसून येते.

पावसाळ्यात तर वाढत्या दुर्गंधीमुळे नागरिकांना या रस्त्यावरून जाणे म्हणजे दिव्यच वाटत होते. हे ठिकाण कचरा टाकण्याचे अधिकृत नाही. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणच्या रस्त्यालगत असा कचरा टाकणेही योग्य नाही. त्यामुळे मनपाच्या स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांनी या ठिकाणी कचरा टाकला जाणार नाही, याची खबरदारी घ्यावी, अशी अपेक्षा सामान्य लातूरकर बाळगून आहेत.

अनधिकृत कचरा आगारामुळे या भागात डुकरे, मोकाट कुत्रे तथा अन्य प्राण्यांचा वावरही वाढला आहे. त्याचाही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कचरा टाकण्यासाठी मनपाने संबंधित कर्मचाऱ्यांना जागा निश्चित करून द्याव्यात आणि त्या जागा नागरी वस्तीपासून दूर असाव्यात, अशी मागणी वाढीस लागली आहे.

## मांजरा पट्ट्यातील दहशत मतदारांनी मोडीत काढली : आ. कराड

लातूर दि. २२ - मांजरा पट्ट्यात वर्षानुवर्ष देशमुखांची असलेली दहशत मोडीत काढण्याचे आणि प्रस्थापितांना उलथून टाकण्याचे काम लातूर ग्रामीणच्या मतदारांनी विधानसभा निवडणुकीत

### काटगाव जिप मधून पूर्वादेवी देशमुख यांची तर तांदूळजा मधून दिपक वांगस्कर यांना भाजपाची उमेदवारी जाहीर

केले. ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही असे सांगून भाजपाच्या वतीने काटगाव जिल्हा परिषद गटातून पूर्वादेवी नाथसिंह देशमुख आणि तांदूळजा गटातून दीपक वांगस्कर यांची उमेदवारी जाहीर करून लातूर ग्रामीण मतदार संघातील सर्वच तेराही जागेवर भाजपा विजयी होणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण मंडळाच्या वतीने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने आ. कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा जिल्हा परिषद गटाचा भाजपाच्या विजयाचा संकल्प मेळावा शुक्रवारी झाला.



मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी विष्णूआप्पा मोहिते हे होते तर या मेळाव्यास भाजपाच्या नेत्या डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते नाथसिंह देशमुख, संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, शरद दरेकर, उद्धव काळे, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, सतीश आंबेकर, पद्माकर चिंचोलकर, योगीराज साखरे, श्याम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ यांच्यासह इतर अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मांजरा परिवाराने पहिल्यांदाच उसाचा भाव जाहीर केला, देणार आहेत की नाही माहित नाही. पाच वर्षात बावीशे, पंचेवीशे, सत्तावीशे दिला. गेल्या पाच वर्षात साखरेचा भाव सारखाच असताना आत्ताच ऐकतीशे का भाव जाहीर केला असा प्रश्न उपस्थित करून आत्तापर्यंत झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम विधानसभेतील विजयातून झाले. ही तुमच्या मताची किंमत आहे. अनेक पुरस्कार घेणारे मांजरा परिवारातील कारखाने तोट्यात का आहेत कर्जबाजारी का झाले असा प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे यासाठी माझा संघर्ष असल्याचे बोलून दाखवले. ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपाला बहुमताने विजयी करावे असे आव्हान करून आ. रमेशआप्पा कराड यांनी काटगाव जिल्हा परिषद गटातून पूर्वादेवी नागसिंह देशमुख यांची तर तांदूळजा गटातून दीपक वांगस्कर यांची आणि तांदूळजा गणातून सुचिता अंकुश गणगे गादवड गणातून बाबा भिसे यांची उमेदवारी जाहीर केली. याप्रसंगी दीपक वांगस्कर, प्रशांत नानजकर, महादेवआबा गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करून येणाऱ्या निवडणुकीत मतदार भाजपा सोबत असल्याचे बोलून दाखवले तर भैरवनाथ पिसाळ यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली. सूत्रसंचालन शाम भोळे यांनी तर सचिन कांबळे यांनी आभार मानले.

## ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या एका पथकाने शनिवारी (दि. २२) गंजगोलाई परिसरातील एका गोडाऊन वर छापा टाकून अंदाजे ३०० किलो सिंगल युज प्लास्टिकचा साठा जप्त केला. संबंधितास ५ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला.

सिंगल युज प्लास्टिकच्या वापरास बंदी आहे. असे असतानाही काही लोक प्लास्टिकचा वापर करत असल्याचे निदर्शनास आल्याने मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उपायुक्त श्रीमती वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी रवी कांबळे यांच्या पथकाने छापा मारून ही कारवाई केली.

व्यावसायिक आणि नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर करू नये. यापुढे बंदी असणाऱ्या प्लास्टिकचा वापर केल्याचे आढळले तर ते जप्त करून दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे. या कारवाईत मुख्य स्वच्छता निरीक्षक धोंडीराम सोनवणे, शिवराज शिंदे, अक्रम शेख, स्वच्छता निरीक्षक प्रदीप गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.

## ‘दयानंद’ मध्ये सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या किमान समान कार्यक्रमानुसार सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सायबर पोलीस ठाणे व दयानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच दयानंद कला महाविद्यालय येथे जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, पोलीस निरीक्षक श्रीमती बबीता वाकडकर, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी लातूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. योगेश डी. जगताप, दयानंद कला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक प्रा. डॉ. प्रशांत दीक्षित, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे कर्मचारी व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

गिरवलकर यांनी यावली माहिती तंत्रज्ञान कायदा २००० बाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. सायबर गुन्हा म्हणजे काय, सायबर गुन्हेगार कोण असतात व ऑनलाईन घोटाळा, ऑनलाईन खंडणी हल्ला, सायबर छळवणूक, सायबर पाठलाग, ऑनलाईन अंमल पदार्थ तस्करी, बौद्धीक मालमत्ता उल्लंघन व ऑनलाईन भरती प्रकीया फसवणूक याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पोलीस निरीक्षक श्रीमती बबीता वाकडकर यांनी विद्यार्थ्यांना पीपीटीद्वारे सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन केले. आज सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे तरूण पिढीने सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाचा वापर करूण वेगवेगळ्या प्रकारचे सायबर गुन्हे समाजात घडत आहेत, आर्थिक नुकसान, लैंगिक छळाच्या सायबर गुन्ह्याचे प्रमाण वाढीस लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांनी सायबर गुन्ह्यांबाबत सदैव जागरूक राहण्याचे आवाहन केले.

## आ. देशमुख यांचा बाभळगावमध्ये नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख यांनी आज, शनिवार दि. २२ नोव्हेंबर २५ रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर व जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांच्या भेटी घेतल्या. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आलेल्या नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तात्काळ सूचना केल्या.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, माजी महापौर दीपक सूळ, विलास को-ऑपरेटिव बँक व्हाईस चेअरमन समद पटेल, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर महानगराध्यक्ष सुनील बसपुरे, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य धनंजय देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, पत्रकार नेताजी जाधव, हनमंत पवार, सिकंदर पटेल, दिनेश गोजमगुंडे, व्यंकटेश पुरी, प्रा. बालाजी वाघमारे, रमेश थोरमोठे, प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर, प्रवीण घोटाळे, मोहन माने, ज्ञानेश्वर पाटील, महेश इंगळे, मनोज चिखले, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



## खोटा गुन्हा नोंद करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांसह महावितरण अधिकारी-कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

**श्रीकर फड यांची पत्रकार परिषदेत मागणी**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ नोव्हेंबर :** लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात आपल्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यास भाग पाडणाऱ्या महावितरणच्या मुख्य अभियंत्यासह पोलीस निरीक्षक समाधान चावरे, पोलीस उपनिरीक्षक मुन्ना देशमुख यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी व्यावसायिक श्रीकर त्र्यंबकराव फड यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केली.

आपल्या स्वतःच्या कमर्शियल जागेतील कालबाह्य झालेली कमकुवत विद्युत लाईन स्थलांतरित करण्याकरिता आवश्यक असणारी सर्व प्रक्रिया पार पाडून, नियमाप्रमाणे पूर्ण रक्कम



भरणा करूनही महावितरणचे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत. तसेच या संदर्भातील दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी आपण न्यायालयात याचिका दाखल करून केली होती. आपल्या याचिकेप्रमाणे अंबाजोगाई न्यायालयाने दोषी अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. असे असतानाही कर्तव्यात कसूर करणाऱ्या महावितरणच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न महावितरणचेच अधिकारी, कर्मचारी करत असल्याचे निदर्शनास आले आहे, असे सांगून श्रीकर पुढे म्हणाले की, लातूर एमआयडीसी परिसरातील महावितरणच्या कार्यालयात मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी आपल्याला त्यांच्या कार्यालयात ते स्वतः हजर नसताना जावक क्रमांक नसलेला अहवाल घेऊन जाण्यास बोलावले होते. आपण त्यांची भेट घेऊन चर्चा करण्याच्या उद्देशाने कार्यालयातील त्यांच्या केबिनमध्ये बसलो असताना तेथून जबरदस्तीने पोलीस बळाचा वापर करून आपल्याला एमआयडीसी पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चावरे व पोलीस उपनिरीक्षक मुन्ना देशमुख यांनी आपल्याला एखाद्या सराईत गुन्हेगारांसारखी वागणूक दिली. आपल्याला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून कोठडीत बेकायदेशीरपणे डांबून ठेवल्याचा आरोपही श्रीकर फड यांनी यावेळी केला. तसेच या पत्रकार परिषदेत श्रीकर यांनी त्यांच्यावर समाधान चावरे यांच्याकडून करण्यात आलेल्या मारहाणीचा, शिवीगाळीचा व्हिडिओही पत्रकारांना दाखविला.

पोलीस अधिकारी चावरे यांच्या सारख्या फिर्यादीलाच आरोपी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोल्स अधिकाऱ्यांमुळे संपूर्ण लातूर पोलीस दलाची प्रतिमाच मलीन होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणी आपण मानवाधिकार आयोग, नांदेडचे पोलीस उपमहानिरीक्षक, लातूरचे पोलीस अधीक्षक, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकडेही रितसर तक्रार करून पोलीस निरीक्षक समाधान चावरे व महावितरणच्या संबंधित दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्याची मागणी केल्याचे सांगितले. पोलीस दलात सामान्यांना मदत, सहकार्य करणारे अनेक पोलीस अधिकारी आहेत. मात्र, चावरे यांच्यासारख्या बोटांवर मोजण्याइतक्या प्रवृत्तीच्या अधिकाऱ्यांमुळे पोलीस दलाची प्रतिमा डागाळली जात असेल तर त्यावर वरिष्ठानी वेळीच उचित कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे श्रीकर यांनी स्पष्ट केले. यावेळी ॲड. अनंत केंद्रे यांचीही उपस्थिती होती.